चौकशीत उघड झाले की, चंदु बोरकर व नागलकर कुटुंबातील जुन्या वादातून हा खून करण्यात आला. अक्षय नागलकरचा भाऊ शुभम नागलकर याला एमपीडीए अंतर्गत शिक्षा झाल्यामुळे अक्षयने चंदु बोरकरला धमकावले होते. याच वैमनस्यातून चंदु बोरकरने काही महिन्यांपासून अक्षयच्या खुनाचा कट रचला होता. त्याने ब्रम्हा भाकरेमार्फत बंद हॉटेल भाड्याने घेतले व शेतात प्रेत जाळण्यासाठी टिनपत्राचे खोली बांधली होती. खुनानंतर मृतदेह जाळून राख नदीत टाकून पुरावे नष्ट करण्यात आले. गुन्ह्यात वापरलेली टाटा इंडिगो कार, तीन दुचाकी, सात मोबाईल जप्त करण्यात आले असून आरोपींकडून दोन देशी पिस्तुले आणि सहा जिवंत काडतुसेही सापडली आहेत. सर्व आरोपींना शनिवारी (१ नोव्हेंबर २०२५) न्यायालयात हजर केले असता त्यांना ५ नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली. या गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील हे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक व अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली करीत असून स्थानीक गुन्हे शाखेचे प्रभारी पो.नि. शंकर शेळके, स.पो.नि. अभिषेक अंधारे, गोपाल ढोले, विजय चव्हाण तसेच गुन्हे शोध पथकातील अधिकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. पोलिसांच्या या जलद आणि अचूक कारवाईमुळे शहरातील या खळबळजनक खून प्रकरणाचा अखेर पर्दाफाश झाला असून पोलिस प्रशासनावर नागरिकांचा विश्वास आणखीन दृढ झाला आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत अज्ञात इसमाचा मृत्यू

■ प्रतिनिधी | मालेगाव ■



राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ वर मालेगाव-वाशिम दरम्यान झोडगा गावाजवळील जलधारा हॉटेलसमोर गुरुवारी (दि. ३० ऑक्टोबर) रात्री सुमारे आठ वाजताच्या सुमारास घडलेल्या अपघातात एका अज्ञात पादचारी इसमाचा मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पादचारी इसम रस्ता ओलांडत असताना अज्ञात वाहनाने त्याला जोरदार धडक दिली. धडकेनंतर वाहन चालक घटनास्थळावरून पसार झाला. अपघातात गंभीर जखमी झालेल्या इसमाचा जागीच मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच मालेगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे.

मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. तो रंगाने सावळा, मजबूत बांध्याचा असून वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे दरम्यान आहे. त्याने अंगात पांढऱ्या रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट व निळ्या रंगाची जीन्स परिधान केली आहे. पोलिसांनी नागरिकांना या इसमाची ओळख पटविण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान, अज्ञात वाहन व त्याच्या चालकाचा शोध सुरू असून पुढील तपास ठाणेदार संजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेड कॉन्स्टेबल प्रशांत वानखेडे करीत आहेत.

# ४०६ आंदोलकावरील दाखल केलेले गुन्हे मागे घ्या; तांडा सुधार समितीची मागणी

■ प्रतिनिधी | किन्हीराजा ■

बंजारा समाजाला एस टी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी सकल बंजारा समाज बांधव, व आरक्षण कृती समीती वाशीम च्या वतीने दी ३० आक्टोम्बर गुरूवार ला मालेगाव पोलीस स्टेशन हद्दीतील समृद्धी महामार्ग व हैद्राबाद अकोला महामार्गावर गोर बंजारा समाजाकडून रास्ता रोखो आंदोलण करण्यात आले.

या आंदोलनात नैसर्गिक किंवा वित्तीय वित्तीय हानी झाली नाही तरी ओळख पटलेले सहा व ओळख न पटलेल्या ४०० अशा एकूण ४०६ जनावरील दाखल केलेले गुन्हे मागे घ्यावी अशी मागणी तांडा सुधार समितीकडून शासनाकडे करण्यात आली आहे

बंजारा समाजाला एस टी मधुन आरक्षण मिळावे यासाठी महाराष्ट्रात विविध ठिकाणी आंदोलण अमर उपोषण, रास्ता रोखो रेल रोखो आंदोलण करण्यात येत आहेत याच पद्धतीचे रास्ता रोखो आंदोलण दी ३० आक्टोंबर गुरूवार ला मालेगाव तालुक्यातील समृद्धी रोडवर करण्यात आला व त्यानंतप हैद्राबाद अकोला रोडवर ही रास्ता रोखो आंदोलण करण्यात आले या आंदोलनाची लेखी माहिती यापूर्वीच आरक्षण कृती समितीने मालेगाव पोलीस स्टेशनला दिली होती या बाबत मालेगाव व वाशीम जिल्ह्यातील पोलिसांना या बाबत सर्व माहिती व संपर्क आंदोलन कर्त्यांनी ठेवला होता सर्वांनी पोलिसांना सहकार्य केले लोकशाही पद्धतीने हे आंदोलन झाले व त्यात कोणाचेही काही नुकसान तोडफोड काहीही झालेले नाही आधीच निवेदन देवुन ही व पोलिसांना पासुन कोणतीही माहिती न लपवता आंदोलकांनी आपल्या हक्काच्या मागणीसाठी आंदोलन केले तरीही मेयालेगांव पोलिसांनी दी ३१ आक्टोम्बर शुक्रवार ला समृद्धी महामार्ग चॅनल क्रमांक २३९ वरील उडानपुलाखाली ४० ते ५० कार्यकर्तो चढले व नागपूर मुंबई महामार्गा वरील वाहतुक काही काळ ठप्प झाली व त्यानंतप राषेटीय. महामार्ग १६१ हैद्राबाद अकोला रोडवरही रास्ता रोको आंदोलन केले त्यामुळे ओळख पटलेले ६ व अनोळखी ४०० अशा एकूण ४०६आंदोलकावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून हे गुन्हे त्वरित मागे घेण्यात यावे अशी मागणी तांडा सुधार समितीच्या वतीने सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्रावण जाधव,सेवानिवृत्त प्राचार्य वसंत राठोड, पत्रकार भीमराव पवार, जगदेव आडे, रोहिदास राठोड, इश्वर जाधव, बाळू जाधव, यांनी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांचेकडे निवेदन पाठवून केली आहे

# रिपब्लिकन पक्षाचा ६९ वा वर्धापन दिन सोहळा उद्या महाड येथे साजरा होणार

## उपस्थित राहण्याचे जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे यांचे आवाहन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाचा वर्धापन दिन ३ नोव्हेंबर रोजी दुपारी तीन वाजता रायगड जिल्ह्यातील महाडच्या क्रांती भूमीत चांदे मैदान येथे आयोजित करण्यात आलेला आहे. रिपब्लिकन पक्षाच्या ६९ व्या वर्धापन दिना सोहळ्याचे उद्घाटक म्हणून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री,संघर्ष नायक रामदास आठवले उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्याचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष राजाभाऊ सरवदे आहेत प्रमुख उपस्थितीत केंद्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर, राज्य सरचिटणीस गौतम भाई सोनवणे, कार्याध्यक्ष बाबुरावजी कदम यांची उपस्थिती राहणार आहेत. रिपब्लिकन पक्षाचा ६९ वा वर्धापन दिन सोहळ्यात सर्व जिल्हाप्रमुख उपस्थित राहणार असून जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे यांची सुद्धा उपस्थिती राहणार आहे.

रिपब्लिकन पक्षाची स्थापना ३ ऑक्टोबर १९५७ रोजी झाली असून रिपब्लिकन पक्षाच्या ६९ वा वर्धापन दिन सोहळा दि. ३ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला होता. त्यामुळे वर्धापन दिनाचा ३ ऑक्टोबर चा कार्यक्रम रद्द करून येत्या दि.३ नोव्हेंबर रोजी साजरा करण्याचा घेतला आहे.

# शेतात पाणी सोडून शेतकरी कुटुंबाला त्रास देण्याचा प्रयत्न

## पिकासह सुपीक माती वाहून जात असल्याने उपासमारीची पाळी



■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील शेतकरी नैसर्गिक आपत्तीने मागील अनेक वर्षांपासून ग्रस्त असून काही शेतकऱ्यांना मानवनिर्मित आपत्तींचा सामना करावा लागत असल्याने अशा कुटील कारस्थान करणाऱ्या दृष्ट प्रवृत्तींचा बंदोबस्त करावा अशी मागणी विठोली शिवारात शेत असलेल्या शेतकऱ्याच्या शेतात पाणी सोडून या शेतकरी कुटुंबावर उपासमारीची पाळी आणल्या जात असल्याने पुढे येत आहे.

कारखेडा गावचे रहिवासी असलेले युवा शेतकरी ज्ञानेश्वर तुळशीराम जाधव यांची विठोली शिवारात पाच एकर शेत असून शेतात पिकणाऱ्या कृषीमालावरच जाधव यांच्या कुटुंबातील सदस्यांचे उदरनिर्वाह चालते.शेतकरी जाधव यांच्या शेताच्या वरच्या भागावर असलेल्या शेतशिवारातून ज्ञानेश्वर जाधव त्याच्या शेतातील उभी पिके खराब व्हावी या कुटील हेतूने मागील अनेक वर्षांपासून शेतातील पाणी सोडल्या जात असल्याने जाधव यांच्या शेतातील पिके व सुपीक माती वाहून जात असल्यामुळे मोठ्या नुकसानीला ज्ञानेश्वर जाधव यांना सामोरे जावे लागत असल्याची माहिती प्रस्तुत प्रतिनिधीला दिली. वाईट हेतूने शेत शिवारात पाणी सोडल्या जात असल्याने हातात पिके येत नसल्याने शेतकरी जाधव यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची पाळी येत असल्याने या परिस्थितीला कायमची बदलण्यासाठी प्रशासनाने हस्तक्षेप करण्याची मागणी शेतकरी ज्ञानेश्वर जाधव यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# राष्ट्रवादी ओबीसी आघाडीचे प्रदेश सरचिटणीस पदी हरिभाऊ वाघोडे यांची निवड



■ प्रतिनिधी | अकोट ■

'माझ्या कामावर विश्वास ठेवल्याबद्दल मी आभारी आहे. ओबीसी समाजाच्या उन्नतीसाठी आम्ही एकत्र येऊन काम करू,' असे हरिभाऊ वाघोडे यांनी निवडीच्या नंतर सांगितले.राष्ट्रवादी ओबीसी आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते त्यांचा स्वागत करत आहेत आणि ओबीसी समाजाच्या प्रश्नांसाठी त्यांनी दिलेल्या वचनाला प्राधान्य देण्याचे आश्वासन दिले आहे.

राष्ट्रवादी ओबीसी आघाडीच्या प्रदेश सरचिटणीस पदी हरिभाऊ वाघोडे यांची निवड करण्यात आली आहे. ओबीसी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि समाजातील विविध समस्या सोडवण्यासाठी हरिभाऊ वाघोडे यांची निवड एक महत्वपूर्ण पाऊल आहे.

त्यांच्या निवडीमुळे आघाडीला आणखी बळ मिळेल आणि ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी ते अधिक प्रभावीपणे काम करतील, अशी आशा व्यक्त करण्यात आली आहे.

हरिभाऊ वाघोडे यांची ओबीसी समाजात विशेष ओळख असून, त्यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाच्या दिशेने नेहमीच कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली आघाडीचे कार्य अधिक सक्षम आणि प्रभावी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# पायाभूत सुविधांसाठी अनुदान प्रस्ताव आमंत्रित

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शासन परिपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग, अविवि–२०२५/प्र.क्र. ११३/का.६, दिनांक २८ ऑक्टोबर २०२५ नुसार, अल्पसंख्याक बहुल शासनमान्यता प्राप्त खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका / नगरपरिषद शाळा तसेच अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयीसुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना सन २०२५–२६ राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत अनुदान मिळवू इच्छिणाऱ्या पात्र संस्थांनी शासन निर्णय दि.०७/ १०/ २०१५ व ०७/१०/२०२४ अन्वये परिपूर्ण प्रस्ताव कार्यालयात दि.१४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

# गगन मलिक यांच्या हस्ते बुद्ध मूर्ती दान समारोह संपन्न

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

परित्राण बुद्धिस्ट फौंडेशन मालेगाव च्या वतीने दि ३० आक्टोबर रोजी विशाल धम्म चक्र परिवर्तन सोहळा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान अमृत महोत्सव निमित्याने आदर्श बुद्ध विहाराला सिने अभिनेता बुद्ध ची भूमिका साकारणारे गगन मलिक यांनी मोलाचे मार्गदर्शन करून त्यांचे हस्ते अष्ठधातूची बुद्धमूर्ती दान समारोह मोठ्या थाटात पार पडला.



प्रारंभी सकाळी १ वाजता ?ड. संदीप ताजने यांच्या निवासस्थाना पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थीकलश रथ मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत ठीक ठिकाणावरून आलेले पूज्य भिक्कू गण मोठ्या संख्ये रॅलीत सहभागी झाले होते तसेच जवळपास २० हजार जनसमुदाय पुरुष महिला बालक युवक मोठ्या संख्येने शुभ्र वस्त्रे परिधान करून सहभागी होऊन अस्थी कलश चे दर्शन घेतले. ही मिरवणुक संदीप ताजने यांच्या घरापासून तहसील कार्यालय जवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फलक चित्रला हार अर्पण करून पुढे लहुजी वस्ताद यांच्या पुतळ्या समोरून शिव चौक मेन रोडने ते जुने बसस्टॅण्ड वरून सभा स्थळी एम सी सी क्रिकेट मैदान या ठिकाणी समारोप करण्यात आला. या मिरवणुकीचे मराठा सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांनी शिव चौकात स्वागत केले व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी कलशाला नमन केले. त्या नंतर भन्ते पय्यथेरो नांदेड यांनी त्यांच्या समवेत बहुसंख्य भिक्खू गण यांनी उपस्थित जनसमुदाय यांना धम्म देसना दिली यांनी मार्गदर्शन केले दुसऱ्या सत्रात सिने अभिनेता बुद्ध ची भूमिका साकारणारे गगन मलिक यांनी मोलाचे मार्गदर्शन करून बुद्ध मूर्ती दान यांचे हस्ते करण्यात आला या वेळी उपसिका कौशल्या विक्रमशिंधे श्रीलका, माजी न्यायमूर्ती सी एस थुल यांनीही मार्गदर्शन केले. तसेच जेष्ठ नेते गोपाळराव आटोटे गुरुजी यांनी भाषण करून कार्यक्रम मुख्य आयोजक अॅड. संदीप ताजने यांचे भव्य दिव्य आयोजनाचे कौतुक केले.

# बाळापूरात काँग्रेस नेते प्रकाश तायडे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

## मोफत नेत्र तपासणी शिबीर व चष्मे वाटप; आमदार साजिद खान पठाण यांची उपस्थिती

■ प्रतिनिधी | बाळापूर ■

***काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव व खामगाव विधानसभा प्रभारी प्रकाश तायडे यांचा वाढदिवस बाळापूर शहरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन बाळापूर शहर काँग्रेस कमिटीतर्फे करण्यात आले होते.***



कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून आमदार साजिद खान पठाण उपस्थित होते. बाळापूर शहरातून मुख्य रस्त्याने मोटरसायकल रॅली काढण्यात आली, ज्यामधून आमदार पठाण आणि प्रकाश तायडे यांना कार्यक्रमस्थळी आणण्यात आले.कार्यक्रमात वाढदिवसानिमित्त केक कापून आणि शाल-श्रीफळ देऊन प्रकाश तायडे यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी तायडे यांनी बाळापूरकरांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबीर व मोफत चष्मे वाटप कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत झालेल्या या शिबिरात तब्बल १,००० हून अधिक नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली.

वाढदिवसानिमित्त ८५ किलो लाडूचे वाटप करून आमदार साजिद खान पठाण यांची 'लाडू तुला' करण्यात आली. यावेळी प्रकाश तायडे म्हणाले, 'बाळापूर नगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत काँग्रेसला पाठिंबा द्या. जनतेच्या सेवेसाठी मोफत नेत्र तपासणी, चष्मे वाटप आणि लवकरच मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करण्यात येतील. अशा सेवा देण्याची ताकद फक्त काँग्रेस पक्षात आहे.'

आमदार साजिद खान पठाण यांनी आपल्या भाषणात सांगितले, 'बाळापूरकर नागरिक समजदार आहेत. येत्या नगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेसला सत्ता देणे हेच प्रकाश तायडे यांना दिलेले सर्वोत्तम वाढदिवसाचे गिफ्ट ठरेल.'

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. फैयाज अन्सारी (अल्पसंख्यांक काँग्रेस जिल्हाध्यक्ष) यांनी केले. मोहम्मद जमीर, अध्यक्ष बाळापूर शहर काँग्रेस, यांनी काँग्रेसच्या पाठीशी राहण्याचे आवाहन केले. मोहम्मद अकरम, कार्याध्यक्ष बाळापूर शहर काँग्रेस, यांनी येणाऱ्या निवडणुकीत विजयाचा आत्मविश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मो. मसीह सर यांनी केले, तर साजिद इकबाल, युवक काँग्रेस अध्यक्ष यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाचे आयोजन मोहम्मद जमीर शेठ, मोहम्मद अकरम आणि डॉ. फैयाज अन्सारी यांनी केले होते. या कार्यक्रमाला बाळापूर तालुका काँग्रेस अध्यक्ष सत्यनारायण घाटोळे, अॅड. दीपक काळपांडे, सचिन धानोकर, सुश्रुत भुस्कुटे, श्रीकांत मसणे, योगेश धानोकार, जयराम सोनवणे, हाजी मोहम्मद मुताहिर, रईस अहमद कुरेशी, रफिक पहिलवान, मुन्ना खान, फहीम राझीक सर, बिस्मिल्ला शाह, हाजी रशीद कुरेशी, नगरसेवक आशिक भाईजान, जावेद इकबाल शेख, चांद फैज, हाफिज साजिद, डॉ. निसार, सै. जीशान, मो. सलमान, मो. रिहान, अतिकोदिन, तौसीफ खान, जावेद खान, शेख रहमान, शेख बाबर, हरिभाऊ अवचार, सूरज उमाळे, विवेक शेगोकर आणि हजारो नागरिकांची उपस्थिती होती.कार्यक्रमात उत्साह, ऐक्य आणि समाजसेवेचा सुंदर संगम पाहायला मिळाला.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३३३ ■ रविवार, २ नोव्हेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# अखेर... बजाज चौकातील उड्डाण पुलावरील पथदिवे झाले सुरु

## खा.अमर काळे यांच्या प्रयत्नाला यश



**वर्धा जनमाध्यम :** शहरातील हिंगणघाट-यवतमाळ व रेल्वे लाईनच्या पलीकडील जोडणाऱ्या मार्गावरील आचार्य विनोबा भावे उड्डाण पुलावरील पथदिवे अखेर शनिवारी सुरू झाले,

खासदार अमर काळे यांनी नागरिकांच्या तक्रारी वरून सार्वजनिक बांधकाम विभागाला बजाज चौकातील विनोबा भावे उड्डान पुलावरील पथदिवे सुरु करण्याचे निर्देश दिले, आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने लगेच खासदार अमर काळे यांच्या आदेशाचे पालन केले,

सन २०१३ मध्ये या पुलाला नूतनी करण्यासाठी मंजूरी दिली गेली. एका प्रदिर्घ तपानंतर मोठ्या प्रयत्नाने या उड्डाण पुलाचे काम १२ वर्षानंतर म्हणजे २०२५ मध्ये पूर्ण झाले. या उड्डाण पुलाच्या कामासाठी लोकप्रतिनीधी तसेच सर्वसामान्य जनतेकडून सतत पाठपुरावा केला जात होता. पुलाचे काम झाल्यानंतर बरेच दिवस हा पुल लोकार्पणाच्या प्रतिक्षेत होता. परंतु या पुलावरुन सकाळी व सायंकाळच्या वेळेस होत असलेली वाहतुकीची कोंडी व त्यामुळे लोकांना होणारा मनस्ताप यामुळे अनेक नागरीकांकडून पुलावरुन वाहतुक सुरु करण्याबाबत सतत दबाव निर्माण होत होता. याबाबत खासदार अमर काळे यांनी सुध्दा पुल तात्काळ वाहतुकीकरीता सुरु करण्याबाबत अनेकदा अधिकाऱ्यांकडे तगादा लावला. शेवटी त्यांनी या पुलाच्या लोकार्पणाच्या कार्यक्रमाला मी हजर राहणार नाही पण एखाद्या सर्वसामान्य नागरीकाच्या हाताने यापुलाचे लोकार्पण करण्यात यावे व पुल वाहतुकीकरीता सुरु करण्यात यावा असे वक्तव्य त्यांनी पुलावर भेट दिली असता केले. त्यावेळी त्यांना अनेक लोकांनी या पुलावरुन वाहतुक केव्हा सुरु होणार ? पुल बांधून तयार असतांनाही वाट कशाची पाहता ? असे एक ना अनेक प्रश्न त्यांना नागरीकांनी केले. त्यावेळी त्यांनी वरील घोषणा केली. त्यानंतरही सार्वजनिक बांधकाम विभागाची झोप उघडता उघडेना. अखेर गणपती विसर्जनाच्या वेळी पुलावर होणारी वाहतुक कोंडी व लोकांना होणारा त्रास याची दखल घेऊन या जिल्हयाचे माजी खासदार दत्ता मेघे यांनी गणपती विसर्जनाचे वेळी नारळ फोडून या पुलावरुन गणपतीच्या मिरवणुकीने शुभारंभ करून हा पूल वाहतुकीकरीता खुला करून दिला. या गोष्टीला जवळपास चार महिन्यांचा कालावधी झाला. पुलावर अद्यापही लाईट लागले गेले नव्हते. त्यामुळे पुलावर रात्रीचे वेळी पूर्णतः अंधाराचे साम्राज्य असल्याने. या अंधाराचा फायदा घेऊन समाजातील काही टवाळखोरांकडून स्त्रीयांना अडविण्याचे प्रकार सुध्दा घडले होते अशी लोकांकडून माहीती प्राप्त झाल्यानंतर खासदार अमर काळे यांनी तात्काळ सा.बां. विभागाला पत्र लिहीले व दुरध्वनीवरुन सुध्दा संपर्क साधला व पुलावरील पथदिवे तीन दिवसांचे आत सुरु करावे असे निर्देश दिले. आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने विलंब न करता तात्काळ पथदिवे सुरू केले, नागरिकांनी खासदार अमर काळे यांचे अभिनंदन केले,

### ■ जुन्या पुलाचे काय?

बारा वर्षाच्या तपानंतर नव्या पुलाचे लोकार्पण तर झाले, मात्र येणाऱ्या मार्गावरील जुन्या पुलाचे काय ? असा प्रश्न उपस्थित होत आहे, जुन्या पुलावर खड्डेमय तसेच अंधारमय पूल अशा अनेक तक्रारी या पुलावरून येणाऱ्या नागरिकांनी केली आहे, याकडे खासदार लक्ष देतील काय? असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.

# जिल्ह्यातील खातेदारांची ४३ कोटी परत देण्यासाठी बँकांची विशेष मोहिम

## -पहिल्या टप्प्यात १०१ खातेदारांना ९० लाख मंजूर

### -आपला पैसा-आपला अधिकार ३१ डिसेंबर पर्यंत विशेष मोहिम



**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील विविध बँकांकडे जमा असलेल्या आणि दहा वर्षांपासून दावा न केलेल्या रक्कमा खातेदारांना परत मिळण्यासाठी भारत सरकारच्या वित्तीय सेवा विभाग तसेच रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या वतीने विशेष मोहिम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत पहिल्या टप्प्यात आज १०१ लाभार्थ्यांना ९० लाखांच्या दावा मंजूरी पत्राचे वितरण करण्यात आले.

मोहिमेंतर्गत बँक ऑफ इंडिया जिल्हा अग्रणी बँकेच्या वतीने नियोजन भवन येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्यात मंजूरी पत्र देण्यात आले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले, बँक ऑफ इंडियाचे विदर्भ आंचलिक प्रबंधक कुश गणहोत्रा, इंडियन ओव्हरसीज बँकेचे मुख्य रिजनल मॅनेजर शरद मिश्रा, युनियन बँक ऑफ इंडियाचे डेप्युटी रिजनल मॅनेजर कुणाल कुमार, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे रिजनल मॅनेजर माधव पालेपाड, कॅनरा बँकेचे डेप्युटी रिजनल मॅनेजर जितेंद्र भालेराव, आयसीआयसीआय बँकेचे रिजनल मॅनेजर राकेश छाब्रिया, ?क्सिस बँकेचे क्लस्टर हेड अजय पितोरे, एलआयसीच्या मॅनेजर क्लेम नंदिनी काळे, निकोन इंडिया म्युचल फंडच्या टेरिटरी मॅनेजर शुभांगी तोंडरे, एलडीओ आरबीआयचे हर्षल चितालीकर, जिल्हा अग्रणी प्रबंधक चेतन शिरभाते तसेच इतर बँकेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्ह्यात १ लाख ३३ हजार ३४१ खात्यांमध्ये ४३ कोटी १३ लाख इतकी रक्कम दावा न केलेल्या स्वरूपात पडून आहे. यासाठी संबंधित ग्राहकांनी किंवा ग्राहक हयात नसल्यास त्यांच्या वारसदारांनी आवश्यक कागदपत्रासह दावा सादर केल्यास ती रक्कम परत देण्यासाठी बँकांमध्ये ३१ डिसेंबर पर्यंत ही विशेष मोहिम राबवण्यात येत आहे.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले म्हणाले की, दावा न केलेल्या रकमेची खातेदारांना परतफेड होणे हा उपक्रम संबंधित खातेदारांसाठी किंवा त्यांच्या वारसांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. खातेदारांनी प्राप्त रकमेचा योग्य उपयोग करावा आणि भविष्यासाठी त्याची गुंतवणूक करावी. तालुकास्तरावर व गावागावात या उपक्रमाची माहिती पोहोचवण्यासाठी विविध उपाययोजना कराव्या. बँकांनी व्हाट्सअप एसएमएस व अन्य माध्यमातून खातेदारांना मोहिमेची माहिती द्यावी. ग्राहकांनी आपले मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी बँक रेकॉर्डला अद्यावत करावे, जेणेकरून भविष्यात बँकांकडून संपर्क सुलभ होईल, असे त्यांनी सांगितले. बँक ऑफ इंडियाचे कुश गणहोत्रा यांनी गेल्या दहा वर्षापासून व्यवहार नसलेले बँक खाते निष्क्रिय होतात व अशा खात्यातील रक्कम भारतीय रिझर्व बँकेच्या निर्देशानुसार डीफ ठेवीमध्ये जमा केली जातात. अशा परिस्थितीत आपला पैसा आपला अधिकार मोहिमेंतर्गत नागरिकांना त्यांचे हक्काचे पैसे मिळवण्यासाठी ही एक सुवर्णसंधी आहे. खातेदारांनी आपल्या खात्यात वारसदारांची नोंद करावी जेणेकरून त्यांना त्यांची रक्कम वेळेत मिळेल, असे सांगितले.

जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक चेतन शिरभाते म्हणाले, ग्राहकाने दोन वर्षापर्यंत व्यवहार न केल्यास खाते निष्क्रिय होते. तसेच दहा वर्ष व्यवहार न केल्यास डीफ होते. त्यामुळे प्रत्येक खातेदाराने आपल्या खात्यात वेळोवेळी व्यवहार करून सक्रीय ठेवावे. तसेच आपल्या डीफ खात्यांची माहिती आपण बँकेच्या अधिकृत वेबसाईटवरुन तसेच आरबीआयच्या ळअउॅश पोर्टल वरुन घेवू शकता, असे सांगितले.

यावेळी विविध बँका, वित्तीय संस्था तसेच एलआयसीच्या स्टॉलच्या माध्यमातून ग्राहकांना निष्क्रिय खात्यांविषयी माहिती आणि तत्काळ निवारणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच मान्यवरांच्याहस्ते पात्र १०१ लाभार्थ्यांना जवळपास रुपये ९० लाखाच्या विविध बँकाकडून दावा मंजुरी प्रमाणपत्राचे वितरण करून या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या सार्ध शताब्दी वर्षानिमित्त केवडिया (गुजरात) येथे महाराष्ट्राचा चित्ररथ

## -१ ते १५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान केवडिया गुजरात येथे होणाऱ्या भारत पर्व महोत्सवात

**मुंबई जनमाध्यम :** ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या सार्ध शताब्दी (१५० व्या) जयंती निमित्त केंद्रीय गृह मंत्रालयामार्फत केवडिया, गुजरात येथे आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय संचलन कार्यक्रमात यंदा प्रथमच महाराष्ट्र राज्याचा चित्ररथ सहभागी होणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे यावर्षी 'स्वराज्य: एकतेचा धागा' या संकल्पनेवर हा चित्ररथ साकारण्यात आला आहे. या चित्ररथात अग्रभागी छत्रपती शिवाजी महाराज सिंहासनावर विराजमान असल्याचे दर्शन घडते. त्यांच्या मागे वारकरी संप्रदायातील वारकरी यांची मूर्ती तर पार्श्वभूमीवर मराठा आरमारातील प्रसिद्ध गुराब नौका दर्शविण्यात आली आहे. या माध्यमातून राज्याच्या वैभवशाली इतिहासाची आणि एकतेची झलक दर्शविण्यात आली आहे.





या चित्ररथासोबत १४ कलाकारांचा चमू सांस्कृतिक सादरीकरण करणार असून, महाराष्ट्राच्या विविधतेतून एकतेचा संदेश देणारे हे सादरीकरण राष्ट्रीय स्तरावर राज्याची सांस्कृतिक ओळख अधोरेखित करेल. तसेच, १ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत भारत पर्व अंतर्गत महाराष्ट्र व गोवा राज्यांच्या सांस्कृतिक कार्य विभागांद्वारे संयुक्त सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरण करण्यात येणार आहे. या महोत्सवाचा मुख्य कार्यक्रम ७ -८ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडेल. महाराष्ट्र राज्याकडून या कार्यक्रमात राज्यातील समृद्ध लोकपरंपरेचे दर्शन घडविण्यासाठी गोंधळ नृत्य, कोळी नृत्य, लावणी, तसेच वारी परंपरेवर आधारित सादरीकरणे यांचा समावेश असलेले सुमारे १५ ते २० कलाकारांचे पथक सहभागी होणार आहे.

या कार्यक्रमाची संकल्पना सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ?ड. आशिष शेलार यांची असून यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी यांचे मार्गदर्शन आहे

या उपक्रमांद्वारे महाराष्ट्र राज्याचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि लोकपरंपरेचे वैभव राष्ट्रीय तसेच आंतरराज्यीय पातळीवर प्रभावीपणे सादर होणार आहे.

# महिला सक्षमीकरणासाठी जीवनोन्नती अभियान एक प्रभावी व्यासपीठ : आमदार समिर कुणावार

## -वाघोली शाश्वत प्रभाग संघाची वार्षिक सभा उत्साहात संपन्न



**हिंगणघाट जनमाध्यम :** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) अंतर्गत तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, हिंगणघाट आणि शाश्वत प्रभाग संघ, वाघोली यांच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक सर्वसाधारण सभा आज पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी विधानसभा क्षेत्राचे आमदार समिर कुणावार होते.सभेत मागील आर्थिक वर्षातील कामकाजाचा तसेच आर्थिक आढावा सादर करण्यात आला. मागील वर्षभरात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांतून महिलांच्या आत्मनिर्भरतेसाठी केलेले प्रयत्न अधोरेखित करण्यात आले. बचत गट बळकटीकरण, सूक्ष्मउद्योग उभारणी, डिजिटल साक्षरता प्रशिक्षण, कृषीपूरक व्यवसाय आणि सामाजिक मोहिमांवर सविस्तर चर्चा झाली.आमदार कुणावार यांनी आपल्या मनोगतात महिलांचे आर्थिक सक्षमीकरण हे समाजाच्या प्रगतीचे खरे अधिष्ठान असल्याचे सांगितले. त्यांनी जीवनोन्नती अभियानाद्वारे अधिक प्रभावी उपक्रम राबविण्यासाठी सर्वार्थाने सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.या प्रसंगी डॉ. प्रणाली सायंकार, पोलिस उपनिरीक्षक कुमुदिनी पाटोडे, तालुका अभियान व्यवस्थापक साचिन सावरकर, प्रभाग संघ अध्यक्षा भारती महाकाळकर, सचिव नंदाताई कामडी, उपाध्यक्षा प्रीती परमोरे, भारत हेमके, आशा कोल्हे, श्रीमती बी.एम. लोखंडे, नलिनीताई सयाम तथा ग्रामसेवक नितीन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. वाघोली शाश्वत प्रभाग संघाच्या अनेक महिला भगिनींनी उपस्थिती लावून सभेला उत्साही प्रतिसाद दिला.

# शेतकरी महिलांची सोन्याची पोत हिसकावणारे दोन्ही आरोपी अटकेत

## -पोलिसांची दक्ष कारवाई; दीड लाखांचा मुद्देमाल हस्तगत



**दहेगाव गोसावी (सेलू) :** शेतात काम करणाऱ्या महिलांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून पळणाऱ्या दोन इसमांना दहेगाव गोसावी पोलिसांनी मोहीम राबवत अटक केली. पोलिसांनी आरोपींकडून सोन्याचा दागिना, मोटारसायकल, मोबाईल आणि कपड्यांसह सुमारे दीड लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.२७ ऑक्टोबर रोजी दुपारी चारच्या सुमारास दहेगाव गोसावी ते जुनोना मार्गावर आणि चारमंडळ शिवारात दोन महिलांवर ही चोरीची प्रकरणे घडली होती. पहिल्या घटनेत चंदा केशव पाटील तर दुसऱ्या घटनेत मायाबाई चोखाजी चाटे यांच्या गळ्यातील एकूण ५५ हजारांच्या सोन्याच्या पोती दोन्ही आरोपींनी हिसकावून घेत मोटारसायकलवरून पसार झाले होते. या प्रकरणी दहेगाव गोसावी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला होता.गुन्ह्याचा तपास गतीने करून पोलिसांनी रूपेश विनोद राठोड (२४) व मुकेश विनोद राठोड (२६), दोघेही रा. मसाळा, ता. सेलू, जि. वर्धा, या दोन्ही भावांना अटक केली. त्यांच्याकडून २४ कॅरेट सोने (५.५ ग्रॅम), होंडा युनिकॉर्न मोटारसायकल (एमएच-३२-एयू-९५४६), ओपो मोबाईल व कपड्यांसह एकूण १.७५ लाख रुपयांचा माल हस्तगत करण्यात आला.ही कारवाई पोलीस हवालदार आनंद भस्मे, बम्हानंद मुन, अंमलदार भारत सातपुते व अनिल चिलगर यांनी केली.





**लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशे व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिनाचे औचित साधून शहरात गांधी जिल्हा फोटोग्राफर्स असोसिएशन, वर्धा च्या सर्व सदस्यांनी कार्यक्रमात विशेष सहकार्य केले.**

# आर्वीत वॉक फॉर युनिटीमधून देशभक्तीचा संदेश





**आर्वी :** सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आर्वी पोलिस विभागातर्फे वॉक फॉर युनिटीचे आयोजन करण्यात आले. राष्ट्राच्या ऐक्य व अखंडतेचा संदेश देण्यासाठी झालेल्या या एकता पदयात्रेत सुमारे अनेक नागरिक सहभागी झाले. कार्यक्रमाला आर्वी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सतीश देहंनकर व त्यांचे सहकारी, व विविध क्षेत्रातील सामाजिक समाजसेवक तसेच विद्यार्थी कर्मचारी व नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

# एकता पदयात्रा:सिंदीकरांचा उत्स्फूर्त सहभाग



**सिंदी (रेल्वे) :** सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त सिंदी (रेल्वे) पोलिस विभागाने वॉक फॉर युनिटीचे आयोजन करून राष्ट्रातील ऐक्य आणि एकात्मतेचा संदेश दिला. बसस्टँड चौकातून पिपरा पुलापर्यंत चार किमी अंतराच्या या पदयात्रेत सुमारे २५० नागरिकांनी सहभाग घेतला. पुरुष गटात सचिन झाडे, महिला गटात रोशनी ढोबळे, प्रौढ गटात सुधाकर वाघमारे आणि बाल गटात उत्कर्ष मडावी विजेते ठरले. कार्यक्रमात पोलिस अधिकारी, नगरपरिषद अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निमित्ताने देशभक्तीच्या घोषणांनी वातावरण दुमदुमले.

# मैथिली पालीवाल' फेक फेसबुक अकाऊंट प्रकरणात रोहन हिवाळे अटक

## -धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्यावर आर्वी पोलिसांची तत्काळ कारवाई

**आर्वी जनमाध्यम :** समाजमाध्यमांवर धार्मिक आणि जातीय तेढ निर्माण करणाऱ्या 'मैथिली पालीवाल' या नावाने चालविल्या जाणाऱ्या फेक फेसबुक अकाऊंट प्रकरणी आर्वी पोलिसांनी रोहन हिवाळे याला अटक केली आहे. आज, १ नोव्हेंबर रोजी ही कारवाई करण्यात आली.गेल्या काही महिन्यांपासून या फेक अकाऊंटवरून महापुरुष आणि देवदेवतांचा अवमान करणाऱ्या, तसेच धार्मिक भावना दुखावणाऱ्या पोस्ट शेअर केल्या जात असल्याची तक्रार नागरिकांनी केली होती. या पोस्टमुळे शहरात तसेच समाजमाध्यमांत तणाव निर्माण झाला होता. एका महिलेच्या नावाने खोटं अकाऊंट तयार करून समाजात विषारी विचार पसरवण्याचा आरोप आहे.या संदर्भात आर्वी शहरातील नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त करत पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीची गंभीर दखल घेत पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला आणि आरोपी रोहन हिवाळे याला शोधून ताब्यात घेतले. प्राथमिक तपासात आरोपीने सोशल मीडियावरून भडकाऊ पोस्ट प्रसारित केल्याचे समोर आले आहे. पुढील तपास आर्वी पोलीस करत असून तांत्रिक तपासणी सुरू आहे .दरम्यान, या फेक अकाऊंटच्या माध्यमातून हिंदू देवी-देवतांविषयी अवमानकारक मजकूर प्रसारित झाल्याने भाजयुमो आर्वी शहर अध्यक्ष स्वप्नील कठाळे यांच्यासह विविध हिंदुत्ववादी संघटनांनी याप्रकरणी दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली होती.

# ग्रामसभेतून दिला भ्रष्टाचार मुक्त भारत निर्मितीचा संदेश

**वर्धा जनमाध्यम :** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यालयाच्या वतीने शनिवारी रोठा व येळाकेळी येथे ग्राम सभा आयोजित करून भ्रष्टाचार मुक्त भारत निर्मितीचा संदेश दिला.

भारत सरकारच्या वतीने २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर दरम्यान सतर्कता जागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. याचाच एक भाग म्हणून लोकांना जागृत करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येते. यातून नागरिकांमध्ये प्रामाणिकता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची भावना प्रोत्साहित करण्यात येते. विश्वविद्यालयाच्या वतीने येळाकेळी ग्रामपंचायतच्या सरपंच श्रीमती रेखाताई ठाकरे यांनी लोकांना सत्यनिष्ठेची शपथ दिली. रोठा येथे सरपंच श्रीमती भारतीताई चलाख यांनी नागरिकांना सत्यनिष्ठेची शपथ देत लोकांना भ्रष्टाचार मुक्त देश घडविण्यासाठी पुढे येण्याची गरज व्यक्त केली. यावेळी दोन्ही ग्रामपंचायतीचे सदस्य आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी विश्वविद्यालयातील वर्धा समाजकार्य संस्थेचे सहायक प्रोफेसर डॉ. शिवसिंह बघेल, डॉ. गजानन निलामे, डॉ. शिवाजी जोगदंड, विद्यार्थी धनंजय सिंह , मनीष चौधरी, भारतीय खडतकर, रणवीर कुमार व हर्ष यांनी ग्रामवासियांना विकसित भारत घडविण्यासाठी एकत्रित काम करण्याचे आवाहन केले. विश्वविद्यालयाच्या या पुढाकाराची सरपंच आणि नागरिकांनी प्रशंसा केली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त

## दिल्लीचे नामांतर 'इंद्रप्रस्थ' करा

### ■ अमित शाहांना भाजप खासदाराचे पत्र ■

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्लीतील चांदणी चौक मतदारसंघाचे भाजपचे खासदार प्रवीण खंडेलवाल यांनी दिल्लीचे नामांतर करण्याची मागणी केली आहे. दिल्लीचे



नाव इंद्रप्रस्थ करण्यात यावे, अशी मागणी खंडेलवाल यांनी केली आहे. त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र दिले आहे. भाजप खासदार खंडेलवाल यांनी जुन्या दिल्लीतील रेल्वे स्थानकाचे नावही बदलून इंद्रप्रस्थ जंक्शन आणि दिल्ली विमानतळाचे नाव बदलून इंद्रप्रस्थ आंतरराष्ट्रीय विमानतळ करण्याची मागणीही केली आहे. दिल्ली विमानतळाचे नाव इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. भाजप खासदार खंडेलवाल यांनी म्हटले आहे की, दिल्लीचा इतिहास थेट पांडव्यांच्या काळाशी जोडलेला आहे. दिल्लीची संस्कृती, सभ्यता, वारसा आणि परंपरा इंद्रप्रस्थ नावाशी जोडलेली आहे. खंडेलवाल यांनी म्हटले आहे की, पांडवांनी यमुनेच्या काठावरच राजधानी इंद्रप्रस्थ वसवली होती. त्यामुळे दिल्लीतील प्रमुख ठिकाणी पांडवांच्या मूर्ती बसवल्या जाव्यात. यातून तरु ण पिढीला पांडवांची संस्कृती आणि परंपरांविषयी कळेल. मौर्य ते गुप्त काळापर्यंत इंद्रप्रस्थ व्यापार, संस्कृती आणि प्रशासनाचे प्रमुख केंद्र राहिलेले आहे. ११व्या आणि १२व्या शतकात राजपूत कालखंडात तोमर राजांनी इंद्रप्रस्थचा उल्लेख डिल्लिका असा केला. त्यानंतर दिल्ली हे नाव पुढे रु ळले. 'देशातील प्रयागराज, अयोध्या, उज्जैन, वाराणसी ही शहरे प्राचीन संस्कृतीशी जोडली जात आहेत. या ऐतिहासिक शहरांप्रमाणे दिल्लीलाही तिचा मूळ सन्मान मिळाला पाहिजे. इंद्रप्रस्थ म्हणून हा सन्मान मिळाला पाहिजे. हे परिवर्तन ऐतिहासिक न्याय असेल. सांस्कृतिक पुनरु त्थानाच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाउल असेल', असे खंडेलवाल यांनी अमित शाह यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. विश्व हिंदू परिषदेनेही काही दिवसांपूर्वी दिल्लीचे नाव इंद्रप्रस्थ करण्याची मागणी केली होती. दिल्लीचे सांस्कृतिक मंत्री कपिल मिश्रा यांना नामांतर करण्याचे पत्र दिले होते.

## पीएसआय बदने, प्रशांत बनकरच्या न्यायालयीन कोठडीत वाढ

**सातारा** : फलटणमधील डाक्टर महिलेच्या आत्महत्या प्रकरणात अनेक धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. याप्रकरणी पोलिस चौकशी करत आहेत, तर दुसरीकडे विरोधक आणि सत्ताधारी यांच्यामध्ये याप्रकरणात आरोप-प्रत्यारोप होताना दिसत आहेत. अशातच फलटण उपजिल्हा रु ग्णालयातील महिला डाक्टर आत्महत्या प्रकरणातील संशयित आरोपी पीएसआय गोपाल बदने आणि प्रशांत बनकर या संशयित आरोपींची आज पोलिस कोठडी संपली आहे. परिणामी त्यांना आज फलटण न्यायालयात हजर केले असता, त्यांना आज न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. पीएसआय गोपाल बदने आणि प्रशांत बनकरला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. या दोघांना काही वेळातच सातारला हलवण्यात येणार आहे, अशीही माहिती समोर आली आहे. फलटण प्रकरणासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. फलटण प्रकरणी महिला आयपीएस अधिका-यांच्या नेतृत्वाखाली एक एसआयटी गठित करावी, असे स्पष्ट आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिस महासंचालकांना दिले आहेत.

## सोन्याच्या दरात घट, चांदीला मात्र तेजी

**जळगाव :** नोव्हेंबर महिन्याची सुरु वात सोने खरेदीदारांसाठी संमिश्र ठरली आहे. महिन्याच्या पहिल्याच दिवशी, १ नोव्हेंबर २०२५ रोजी, सोन्याच्या दरात घसरण झाली आहे, ज्यामुळे ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला. मात्र, दुसरीकडे चांदीच्या किमतीने उसळी घेतली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील नरमाईचा परिणाम देशांतर्गत दरांवर दिसून येत आहे.१ नोव्हेंबर रोजी शनिवारी, सराफा बाजारात सोन्याच्या दरात घट नोंदवण्यात आली. २४ कॅरेट सोन्याच्या भावात २८० रु पयांची, २२ कॅरेट सोन्यात २५० रु पयांची आणि १८ कॅरेट सोन्यात २१० रु पयांची घसरण झाली. या घसरणीनंतर, प्रति १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा भाव १,२३,००० रु पयांवर आला आहे.तर, २२ कॅरेट सोन्यासाठी १,१२,७५० रु पये आणि १८ कॅरेट सोन्यासाठी ९२,२५० रु पये मोजावे लागत आहेत.सोन्याच्या किमती कमी होत असतानाच, चांदीच्या दराने मात्र उसळी घेतली आहे. चांदीच्या दरात कालच्या तुलनेत १००० रु पयांची वाढ झाली. शुक्रवारी १,५१,००० रु पये प्रति किलो असलेला चांदीचा दर आज १,५२,००० रु पये प्रति किलोग्रॅमवर पोहोचला आहे.

## राज्यात पावसाचा मुक्काम वाढला; बळिराजाच्या चिंतेत वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात पावसाचा मुक्काम वाढला आहे. नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या दिवशी देखील राज्यातील काही भागात पावसाने हजेरी लावली आहे. आज सकाळपासून मुंबई, पुणेसह उपनगरात ढगाळ वातावरण असून काही भागात पावसाच्या रिमझिम सरी कोसळत आहेत. आजही भारतीय हवामान विभागाने पावसाचा इशारा दिला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी विजांसह पावसाची शक्यता आहे. तर उर्वरित राज्यात ढगाळ हवामानासह कमाल आणि किमान तापमानात चढ-उतार होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. कोकण, मुंबई, नाशिक आणि धुळेसह अनेक जिल्ह्यांमध्ये अतिमुसळधार पाउस पडण्याची शक्यता असल्याने भारतीय हवामान विभागाने यलो अलर्ट आणि हाय अलर्ट जारी केला आहे. दिवाळीनंतरही राज्यात पाउस सुरू असल्याने शेतकरी राजा चिंतेत आहे. अतिवृष्टी, रोगकिडी आणि आता अवकाळी पाउस यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत. आज १ नोव्हेंबर रोजी मुंबई आणि उपनगरासह कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मध्य महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, कोल्हापूर, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, लातूर, नांदेड या जिल्ह्यांत विजांसह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर काही ठिकाणी ढगाळ वातावरण राहणार आहे. दुसरीकडे, आंध्र प्रदेशात मोंथा चक्रीवादळाचा मोठा फटका बसल्याचे बघायला मिळाले. या वादळामुळे कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला असून पाउस पडत आहे. दरम्यान, समुद्रातील कमी दाब क्षेत्रांचा प्रभाव कमी झाल्याने राज्यात पावसाचा जोर कमी होणार आहे. मात्र पावसाचा जोर ओसरला असला तरी येत्या ५ नोव्हेंबरपर्यंत पाउस पडणार असल्याचे हवामान खात्याने सांगितले आहे.

## रेल्वेची मोठी कारवाई; एका दिवसात ११ लाखांहून अधिक दंड वसूल



**नागपूर /प्रतिनिधी** : दिवाळी आणि छठ पुजे दरम्यान रेल्वेगाड्यांमध्ये प्रचंड गर्दी होते. अनेक प्रवासी गावी जाण्यासाठी मोठ्या प्रवास करतात. परंतु, आरक्षण मिळणे कठीण झाल्याने काही प्रवासी सर्वसाधारण तिकीट घेउन आरक्षित डब्यांमध्ये प्रवास करतात, तर काहीजण विनातिकीट प्रवास करत असल्याचे आढळून आले. अशा प्रवाशांवर कारवाई करण्यासाठी मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने २९ ऑक्टोबर रोजी व्यापक तिकीट तपासणी मोहीम राबविली. या मोहिमेत रेल्वेने तब्बल ११ लाख ८९ हजार ८७५ रु पयांचा दंड वसूल केला. या विशेष मोहिमेचा उद्देश प्रवाशांमध्ये वैध तिकीट घेउन प्रवास करण्याची सवय निर्माण करणे आणि रेल्वेच्या महसुलात वाढ करणे हा होता. नागपूर विभागातील २२ गाड्यांमध्ये तपासणी करण्यात आली. या मोहिमेत ८० तिकीट तपासक, एक रेल्वे सुरक्षा दलाचा कर्मचारी आणि चार चीफ इन्स्पेक्टर सहभागी झाले होते. संपूर्ण कारवाईवर वाणिज्य विभागातील वरिष्ठ अधिका-यांनी देखरेख केली.तपासणीदरम्यान तिकीटविना प्रवास करणारे, चुकीचे तिकीट वापरणारे तसेच नियमांचे उल्लंघन करणा-या प्रवाशांवर कठोर कारवाई करण्यात आली. एकूण १,९०७ प्रकरणांमध्ये दंड आकारण्यात आला असून, प्रत्येक तिकीट तपासकाने सरासरी २४ प्रकरणे निपटवून सुमारे १४,८७३ रु पये इतकी रक्कम वसूल केली.

# दुबार मतदार दिसले तर तिथेच फोडून काढायचे-राज ठाकरे

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईसह महाराष्ट्रात अनेक दुबार मतदार याद्यांमध्ये समाविष्ट आहेत. निवडणूक आयोगाच्या कटकारस्थानाने मॅच फिक्सिंग केली जाते. उन्हात उभ्या राहणा-या मतदारांचा अपमान केला जातो. उद्या निवडणूक होईल तेव्हा जर दुबार मतदार दिसले तर तिथेच फोडून काढा असा घणाघात मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केला. विरोधी पक्षांच्या सत्याचा मोर्चा यात ते बोलत होते. या मोर्चात राज ठाकरे यांनी दुबार मतदारांच्या याद्यांचा गठ्ठा जनतेसमोर दाखवला. यावेळी राज ठाकरे म्हणाले की, आजचा मोर्चा हा राग दाखवण्याचा आणि ताकद दाखवण्याचा मोर्चा आहे. दिल्लीपर्यंत समजण्याचा आणि समजावून सांगण्याचा हा मोर्चा आहे. मोठ्या ताकदीने आज तुम्ही मोर्चाला जमला त्याबद्दल आभारी आहोत. मतदार यादीत



दुबार मतदार आहेत. सर्व पक्षांचे लोक यादीत दुबार मतदार असल्याचे बोलतायेत मग निवडणूक घेण्याची घाई का? मतदार याद्या पारदर्शक केल्यानंतर सगळ्या गोष्टी स्पष्ट होतील. कल्याण ग्रामीण, डोंबिवली, मुरबाड, भिवंडीतील साडेचार हजार मतदारांनी मलबार हिल मतदारसंघातही मतदान केले आहे. प्रभाकर तुकाराम पाटील, राम भोईर, पुंडलिक भोईर या लोकांनी त्यांच्या मतदारसंघातही मतदान केले, मलबार हिलमध्येही मतदान केले. अशाप्रकारे लाखो मतदार आहेत असा आरोप त्यांनी केला. तसेच उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघात १७ लाख २९ हजार मतदारांपैकी ६२३७० मतदार दुबार आहेत. दक्षिण मुंबईत १५ लाख १५ हजार ९९३ मतदारांपैकी ५५ हजार मतदार दुबार आहेत. मावळमध्ये १ लाख ४५ हजार ६३६ दुबार मतदार, पुणे १ लाख २ हजार दुबार मतदार, ठाणे २ लाख ९ हजार दुबार मतदार आहेत. या सर्वांचे आकडे सांगतानाच संपूर्ण मतदारांचा डेटा राज ठाकरेंनी दाखवला. एवढे मतदार दुबार असताना जानेवारी महिन्यात निवडणूक कशाला घेता? १ वर्ष निवडणुका लांबल्या तर फरक काय पडतो, मतदार याद्या पारदर्शक केल्या पाहिजेत अशी मागणी राज ठाकरे यांनी केली. दरम्यान, अत्यंत लाजिरवाणी गोष्ट मतदार याद्यातून समोर येत आहे. मी २०१७ पासून ईव्हीएम मशिनबाबत सांगतोय. २३२ आमदार निवडून आल्यानंतर महाराष्ट्रात सन्नाटा असेल, मतदार गोंधळलेले होते. ही सगळी कारस्थाने निवडणूक आयोगाच्या कटकारस्थानातून केली जातायेत. मॅच आधीच फिक्स आहे. मतदारांचा अपमान केला जातो. तुम्ही घराघरात जा. सर्वांचे चेहरे मतदार यादीनुसार पाहा. जेव्हा कधीही निवडणूक होईल जर दुबार मतदार दिसले तर तिथेच फोडून काढायचे. बडवायचे आणि मग पोलिसांच्या हाती द्यायचे. त्याशिवाय हा महाराष्ट्राचा कारभार वठणीवर येणार नाही असा इशारा राज ठाकरे यांनी दिला आहे.

# बिहारमध्ये कुणाचे सरकार

## भाजपाला किती जागा मिळणार?; समोर आला ताजा सर्व्हे

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बिहार विधानसभा निवडणुकीसाठी २ टप्प्यात मतदान होणार आहे आणि त्यानंतर १४ नोव्हेंबरला निकाल जाहीर होत[illegible] निवडणुकीत एनडीए[illegible] महाआघाडीशिवाय प्रशांत किशो[illegible] जनसुराज पक्षही मैदानात आहे यंदाची बिहार निवडणूक रंगतदार होत आहे. राज्यात निवडणूक प्रचाराचे वारे वाहत आहे त्यातच एक ओपिनियन पोल समोर आला आहे. ज्यात बिहारमध्ये कुणाचे सरकार बनू शकते याचा अंदाज वर्तवला आहे.



पोलनुसार, एनडीए पुन्हा एकदा बिहारमध्ये सत्ता स्थापन करू शकते. त्यात एनडीएला १२०-१४० जागा मिळण्याचा अंदाज आहे तर महाआघाडीला ९३ ते ११२ जागांवर समाधान मानावे लागू शकते. या सर्व्हेत भाजपाला ७०-८१, जेडीयू ४२-४८, एलजेपी ५-७, हम - २ आणि आरएलएमला २ जागा मिळण्याची शक्यता आहे. जेवीसी ओपिनियन पोलमधून ही माहिती समोर आली आहे. महाआघाडीत आरजेडीच्या वाट्याला ६९-७८ जागा मिळू शकतात. काँग्रेसला ९ ते १७ जागा, सीपीआय (एमएल) १२-१४ जागा तर इतरांना प्रत्येकी १-२ जागा मिळण्याचा अंदाज आहे.

तसेच ज्या प्रशांत किशोर यांच्या जनसुराज पार्टीची चर्चा आहे. त्यांना सर्व्हेत केवळ एकाच जागेवर विजय मिळताना दिसत आहे. सोबतच एआयएम, बसपा इतरांच्या खात्यात ८ ते १० जागा जाउ शकतात असं सर्व्हेत म्हटलं आहे. मतांच्या टक्केवारीच्या बाबतीत, एनडीएला महाआघाडीपेक्षा दोन टक्के जास्त मते मिळण्याचा अंदाज आहे. एनडीएला ४१-४३ टक्के मते मिळण्याची अपेक्षा आहे तर महाआघाडीला ३९-४१ टक्के मते मिळण्याची अपेक्षा आहे. जनसुराजला सहा ते सात टक्के मते मिळू शकतात तर इतरांना १०-११ टक्के मते मिळू शकतात असा सर्व्हे रिपोर्ट सांगतो.

दरम्यान, बिहार विधानसभेत एकूण २४३ जागा आहेत तर बहुमताचा आकडा १२२ आहे. पाच वर्षांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत एनडीएने बहुमत मिळवले, ज्यामध्ये आरजेडी सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला. आरजेडीने ७५ जागा जिंकल्या, तर भाजपाने ७४, जेडीयूने ४३, काँग्रेसने १९, एलजेपीने १ आणि इतरांनी ३१ जागा जिंकल्या होत्या. मात्र यंदाच्या निवडणुकीत कोण बाजी मारते याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

## राज्यात कुष्ठरोग आता 'नोटिफायबल डिसीज' सर्व रूग्णांची नोंदणी बंधनकारक

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात कुष्ठरोगाचा प्रसार रोखण्यासाठी आणि रु ग्णांना वेळेत उपचार मिळावेत या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने कुष्ठरोगाला नोटिफायबल डिसीज घोषित केले आहे. यानुसार कुष्ठरोगाचे निदान झालेल्या सर्व रु ग्णांची नोंद दोन आठवड्यांच्या आत संबंधित जिल्हा आरोग्य कार्यालय, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा ,कुष्ठरोग तसेच स्थानिक नागरी आरोग्य अधिका-यांकडे करणे आता सर्व ड?क्टर आणि आरोग्य संस्थांसाठी बंधनकारक आहे. कुष्ठरोग हा मायक्रोबॅक्टेरीयम लेप्री या जंतुमुळे होणारा संसर्गजन्य आजार असून त्वचा, परिघीय नसा, डोळे आणि इतर अवयवांवर त्याचा परिणाम होतो. या आजाराबद्दल समाजात अजूनही भीती, गैरसमज आणि भेदभाव कायम आहेत. लवकर निदान न झाल्यास आणि उपचारात विलंब झाल्यास रु ग्णांमध्ये विकृती (दर्जा २ डिसॅबिलिटी) निर्माण होते. त्यामुळे वेळेत निदान आणि संपूर्ण औषधोपचार हे कुष्ठरोग नियंत्रणाचे प्रमुख घटक असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.राज्य शासनाने सन २०२७ पर्यंत कुष्ठरोगमुक्त महाराष्ट्र हे उद्दिष्ट ठेवले आहे. यामध्ये संसर्गाची साखळी पूर्णपणे तोडणे, प्रसार शून्यावर आणणे, मुलांमधील विकृतीचे प्रमाण शून्य करणे आणि कुष्ठरु ग्णांविषयी समाजातील भेदभाव नष्ट करणे या बाबींचा समावेश आहे. कुष्ठरोग नियंत्रणासाठी सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील सर्व डाक्टर, पॅथालाजिस्ट, सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ, आरोग्य कर्मचारी आणि क्षेत्रीय अधिकारी यांनी निदान झालेल्या सर्व रु ग्णांचा योग्य उपचार, पाठपुरावा तसेच त्यांच्या संपर्कातील व्यक्तींना पोस्ट एक्सपोजर प्रोफिलॅक्सिस (पीईपी) देणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत, सप्टेंबर २०२५ अखेर राज्यात ७,८६३ नव्या कुष्ठरु ग्णांची नोंद झाली असून उपचाराखालील रु ग्णांची संख्या १३,०१० आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने सर्व वैद्यकीय व्यावसायिकांना कुष्ठरोग निदान व नोंदणीसंबंधीच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे.राज्यातील सर्वसामान्य नागरिकांनीही कुष्ठरोगाबाबत भीती बाळगू नये, लक्षणे आढळल्यास तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात संपर्क साधावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. कारण हा आजार पूर्णपणे बरा होउ शकतो फक्तवेळेत निदान आणि उपचार आवश्यक आहे.

## तरूणांना पाच वर्षांत पाच लाख रोजगार-नितीन गडकरी

**नागपूर /प्रतिनिधी** : देशात बेरोजगारी वाढत असल्याचा आरोप वारंवार विरोधी पक्षातील नेत्यांकडून केला जातो. परंतु केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी टाटा कंपनीला कौशल्य प्रशिक्षणातून पाच वर्षांत पाच लाख तरु णांना रोजगाराचे लक्ष्य दिले आहे. यासाठी अनेक कल्पनाही गडकरी यांनी शनिवारी हॉटेल रेडिसन ब्लू येथे झालेल्या कार्यक्रमात मांडल्या.कार्यक्रमाला मंचावर प्रामुख्याने आमदार



अभिजित वंजारी, चरनसिंग ठाकूर, माजी आमदार अनिल सोले, महापालिका आयुक्त अभिजीत चौधरी, टाटा स्ट्राइव्ह कंपनीचे अमेय वंजारी उपस्थित होते. नितीन गडकरी म्हणाले, टाटा स्ट्राइव्ह कंपनीसोबत एक सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्यानुसार कंपनी येथील पाच लाख तरु णांना कौशल्य प्रशिक्षणातून रोजगार उपलब्ध करून देण्याचे ध्येय दिले गेले आहे. हे ध्येय खूप मोठे आहे. परंतु योगायोगाने मी देत असलेले ध्येय नेहमी पूर्ण होतात. या प्रकल्पानुसार विदर्भातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघातून प्रत्येक आमदार ५ हजार तरु णांना येथे विविध क्षेत्रातील कौशल्य विकासाकरीता पाठवतील. या सगळ्यांना रोजगार देण्याचे ध्येय मी टाटा कंपनीला दिल्याचेही गडकरी यांनी सांगितले. गडचिरोली जिल्ह्यात स्टिल हब होउ बघत आहे. येथे ७.५० लाख कोटी रु पयांची गुंतवणूक होत आहे. त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होणार आहे. येथे ६५ ग्रेडचे स्टिल सापडले आहे. हे स्टिल जगातील सर्वोत्तम असल्याचेही गडकरी यांनी सांगितले.एमएससी बॉटनी शिक्षण घेतलेले आरबीआयमध्ये नोटा मोजतात. बी. कॉम., एम. कॉम., एम. एससी. शिक्षण घेण्यात काही गैर नाही. परंतु वनस्पती शास्त्र विषयात (एम एससी बॉटनी) शिक्षण घेतलेले व भारतीय रिझर्व बँकेत (आरबीआय) नोकरी करणारे लोक नोटा मोजण्याचे काम करतात, असे विनोदाने गडकरी म्हणाले. यात गैर नाही. परंतु कौशल्य शिक्षण घेतलेल्या विषयात काम केल्यास उत्पादन क्षेत्रात चांगले दर्जेदार उत्पादन तर इतर क्षेत्रात कौशल्यपूर्ण मनुष्यबळामुळे कामाचा दर्जा सुधारत असल्याचेही गडकरी यांनी सांगितले. जर्मनीमध्ये बारावीपर्यंत समान शिक्षण तर त्यानंतर कौशल्यावर आधारीत शिक्षण घेतले जाते. त्यामुळेच जर्मनी दर्जेदार वस्तूंच्या उत्पादन क्षेत्रात सर्वात पुढे असल्याचेही गडकरी यांनी सांगितले.स्मार्ट सिटीप्रमाणेच आपल्याकडे स्मार्ट व्हिलेज योजना राबवण्याची गरज आहे. याकडे लक्ष न दिल्यास शहरी भागात ग्रामीण भागातून येणा-या तरुणांची संख्या वाढून झोपडपट्टी वाढेल.

## शेगावात काळ्या व्यवसायाने गाठला कळस; साडेसतरा लाखांची रोकड जप्त

**बुलढाणा:** वरील यादी वाचून कुणीही बुचकळ्यात पडणे स्वाभाविक आहे. बातमीचे शीर्षकच तसे असल्याने कुणीही गोंधळून जाण्यात गैर काहीच नाही. ही महायादी आहे पोलिसांनी एका महा अड्डयावर केलेल्या महाकारवाईची. वर्षभर अध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमानी गजबजणा-या विदर्भ पंढरी शेगाव ची काळी बाजू दाखविणारी आणि संतनगरीत काळ्या व्यवसायाने किती कळस गाठला हे दर्शविणारी ही मोठी आणि सर्वांनाच थक्क करणारी ही महा कारवाई आहे.

अपर पोलीस अधिक्षक (खामगांव ) .श्रेणिक लोढा यांच्या पथकाने शेगाव येथील जुगार अड्यावर मोठी कारवाई केली आहे. शेगाव येथील जुगार अड्यावर मोठी कारवाई करीत नगदी १७ लाख ५२ हजार ३२० रु पयासह १२ महागड्या चारचाकी ( कार), ५ मोटार सायकल, ५२ मोबाईल सह तब्बल ६२ लाखापेक्षा जास्त रु पयाचा मुदेमाल जप्त केला आहे. काल शुक्रवारी ३१ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री अपर पोलीस अधिक्षक (खामगांव) श्रेणिक लोढा यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी ६१ धन दांडग्या आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहे. यामध्ये शेगाव मधील आदर्श रिस र्ट चे मालक विलास प्रल्हाद घाटोळ यांच्यासह जळगाव खान्देश, अकोला व बुलढाणा




जिल्ह्यातील जुगार शोकीन आरोपीचा समावेश आहे. यामध्ये बहुसंख्य आरोपी जळगाव खान्देश जिल्ह्यातील आहेत.

काही आरोपी अकोला जिल्ह्यातील आहे. श्रेणिक लोढा यांना या जुगाराची टीप मिळाली होती. श्रेणिक लोढा यांच्या सह अपर पोलीस अधिक्षक, कार्यालय खामगांव येथील सहायक पोलीस निरीक्षक सचिन पाटील, पोलीस हवालदार प्रभंजन जोशी, शिवशंकर वायाळ तसेच खामगांव शहर पोलीस ठाण्याचे येथील सहायक फौजदार बाळू डाबेराव, पोलीस हवालदार गोपाल सातव, शेख मुजीब, नितीन पाटील, संदिप गवई, पोलीस जमादार अमरदीप ठाकूर, आशीष ठाकूर यांनी काल ३१ ऑक्टोबर रोजी रात्री ११.५० वाजता आदर्श रिसोर्टवर छापा घातला.यावेळी एकाच वेळी तब्बल ६० आरोपी जुगार खेळतांना आढळून आले.त्यांचे कडुन नगदी १७ लाख ५२ हजार ३२० रु पयासह १२ कार वाहन, ५ मोटार सायकल, ५२ मोबाईल सह एकुण ६२ लाख २ हजार रु पयाचा मुदेमाल जप्त करण्यात आला आहे. रिस र्ट मालकासह एकुण ६१ लोकांच्या विरु ध्द जुगार कायदयान्वये पोस्टे शेगांव शहर येथे कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायदयाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही निलेश तांबे, पोलीस अधिक्षक, बुलडाणा यांचे मार्गदर्शनाखाली श्रेणिक लोढा, अपर पोलीस अधिक्षक, खामगांव, प्रदिप पाटील. उपविभागीय पोलीस अधिकारी, खामगांव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या खळबळजनक कारवाईचा पुढील तपास शेगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनात पोलीस उप निरीक्षक संदिप बारींगे हे करीत आहे.

## यवतमाळात विदर्भ साहित्य संमेलन, भाषा जपली तरच संस्कृती जगते- डॉ.कोलते

**यवतमाळ :** भाषेविना संस्कृतीचा दिवा विझतो आणि भाषेचा मृत्यू झाला की, देशही मरतो, असे प्रतिपादन ६९व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष रमाकांत कोलते यांनी केले.ते शनिवारी यवतमाळ नजिकच्या जांब गावात आयोजित स्मृतिशेष राजानंद गडपायले साहित्य नगरी येथे आयोजित दोन दिवसीय विदर्भ साहित्य संमेलनात बोलत होते. मंचावर संमेलनाचे पूर्वाध्यक्ष वि.स. जोग, उद्घाटक विद्या प्रकाश मानगावकर, आमदार बाळासाहेब मांगुळकर, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, स्वागताध्यक्ष पांडुरंग खांदवे, वैशाली देशमुख, माजी आमदार संदीप धुर्वे आदी उपस्थित होते. कोलते पुढे म्हणाले, मराठी भाषेची समृद्धी आणि तिच्या जपणुकीचा विचार करण्यासाठी मराठी माणसालाच वेळ नाही, ही दुर्दैवी बाब आहे. इंग्रजी भाषेच्या मोहात आपण आपली ओळख हरवून बसलो आहोत. संत ज्ञानेश्वर, नामदेव, चक्रधरांची पूजा करतो, पण त्यांनी दिलेला भाषेचा विचार विसरून गेलो आहोत, लेखक व्हायचे असेल तर आधी चांगला वाचक व्हा. पुस्तकांवर प्रेम करा, कारण पुस्तक संस्कार घडवते.



मातृभाषेचे संस्कार विसरले तर आपली अस्मिता हरवते. संमेलनाचे पूर्वाध्यक्ष वि.स. जोग यांनी साहित्य हे सामाजिक सलोख्याचे माध्यम असल्याचे सांगितले, तर आमदार मांगुळकर यांनी ग्रामीण भागातील शेतक-यांच्या व्यथा साहित्यातून उमटाव्यात, असे मत व्यक्त केले. वैशाली देशमुख यांनी या संमेलनातून विचारांचे सृजन घडते, असे मत मांडले.या संमेलनाचे प्रास्ताविक हेमंत कांबळे यांनी, संचालन मंगला माळवे, आणि आभार मनोहर शहारे यांनी मानले. या दोन दिवसीय संमेलनात विविध परिसंवाद, कवी संमेलन, गझल संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलन गावाच्या बाहेर आयोजित करण्यात आल्याने रसिकांची गैरसोय झाली.या विदर्भ साहित्य संमेलनास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार होते. मात्र त्यांनी संमेलनास उपस्थिती दर्शवली नाही. त्यांनी पाठविलेल्या संदेशाचे यावेळी वाचन करण्यात आले. यवतमाळ ही सामाजिक आणि सांस्कृतिक जाणिवेची भूमी आहे, असा संदेश त्यांनी पाठविला. तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी हे संमेलन नव्या विचारांना दिशा देईल आणि सृजन प्रक्रियेला मोलाची चालना मिळवून देईल. असा संदेश पाठवला.

## डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेसाठी प्रस्ताव 14 पर्यंत पाठविण्याचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** अल्पसंख्याक विकास विभागामार्फत डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राबविण्यात येत आहे. राज्यातील धर्मादाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत आणि मुंबई शहर जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातील मदरसांनी या योजनेंतर्गत सुधारित प्रस्ताव सादर करण्यासाठी विहित अटी व शर्तीची पूर्तता करून विहित नमुन्यातील अर्जासह पूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई शहर (जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१) येथे १४ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत सादर करावे असे आवाहन मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.अधिक माहिती https://mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निर्धारित दिनांकानंतर प्राप्त होणारे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत, याची संबंधित मदरसांनी नोंद घ्यावी. मदरसांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५जिल्हाधिकारी कार्यालयाने शासनास प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक १५ डिसेंबर, २०२५ आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर येथे अथवा,दूरध्वनी: ०२२-२२६६०१६७, ई-मेल: dpomumbaicity@gmail.com यावर संपर्क साधावा असे प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

## सुधारीत अनुदान योजनेसाठी 14 नोव्हेंबर पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई** -अल्पसंख्याक विकास विभागामार्फत अल्पसंख्याक बहुल शासनमान्य प्राप्त खासगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी सुधारीत अनुदान योजना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत अनुदान मिळवू इच्छिणा-या अटी व शर्तीची पूर्तता करून विहित नमुन्यातील अर्जासह संपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई शहर (जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१) येथे १४ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे. अर्जाचा नमुना https://mdd.maharashtra.gov.in यावर उपलब्ध आहे. निर्धारित दिनांकानंतर प्राप्त होणारे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## निर्बंधांचा भारताला फटका

रशियन कंपन्यांवर निर्बंध लादण्याच्या डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयाकडे युक्रेन युद्ध संपवण्यासाठी रशियावर दबाव आणण्याचे पाऊल म्हणून पाहिले जात आहे. ट्रम्प प्रशासनाची ही आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई आहे. ट्रम्प प्रशासनाने रशियावर थेट आर्थिक दबाय आणण्याची ही पहिलीच वेळ आहे. भारत आणि चीन हे रशियन तेलाचे सर्वात मोठे खरेदीदार आहेत. ट्रम्प यांच्या निर्णयामुळे भारताच्या अडचणी वाढल्या आहेत. परिणामी, भारतातील रिलायन्स इंडस्ट्रिज आणि नायरा एनर्जी या दोन मोठ्या कंपन्यांना फटका बसणार आहे. या कंपन्यांनी रशियाकडून कच्चे तेल खरेदी थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेच्या या पायलामुळे भारताकडून रशियाला मिळणारी परकीय चलनाची रसद बंद झाल्यानंतर रशिया युक्रेनविरोधातील युद्ध थांबवेल, असा विश्वास ट्रम्प यांना आहे. गेल्या काही दिवसांपासून भारत रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणे बंद करेल, असा दावा ट्रम्प वारंवार करत होते, ते त्यामुळेच. रशियावर थेट निर्बंध लादण्याऐवजी ट्रम्प प्रशासनाने 'किंमत मर्यादा' प्रणाली स्वीकारली. म्हणजेच, तेलासाठी कमाल किंमत निश्चित करण्यात आली. त्यामुळे रशियाचा महसूल कमी होईल परंतु पुरवठा कायम राहील. जुन्या टँकरच्या ताफ्याच्या मदतीने आणि समांतर बँकिंग प्रणालीच्या मदतीने, रशिया अजूनही समुद्रमार्गे दररोज अंदाजे आठ लाख पिंप कच्चे तेल विकतो. युद्धापूर्वीही रशियाची तेवढीच निर्यात होत होती. युद्धापूर्वी युरोप तसेच अन्य देश खरेदीदार होते. युक्रेन युद्धानंतर रशियावरील निबंध झुगारून भारत आणि चीन मोठ्या प्रमाणात कच्चे तेल खरेदी करायला लागले. भारताची नायरा एनर्जी आधीच युरोपीय महासंघाच्या निर्बंधांना तोंड देत आहे. 'ब्लूमबर्ग'च्या अहवालानुसार भारतातील प्रमुख रिफायनरीजनी म्हटले आहे की रशियन तेल खरेदी करणे आता जवळजवळ अशक्य आहे. आतापर्यंत भारताने असा युक्तिवाद केला होता, की किंमत मर्यादेखाली रशियन तेल खरेदी करणे कायदेशीर आहे; परंतु अमेरिकेच्या नवीन निर्बंधांमुळे ती परिस्थिती बदलली आहे. ट्रम्प यांनी दोन कंपन्यांवर निर्बंध लादले असले, तरी अप्रत्यक्षपणे सर्व रशियन तेल कंपन्यांवर ही बंदी आहे. अमेरिकेने भारतीय निर्यातीवर अतिरिक्त २५ टक्के शुल्क लादले आहे. भारतावर रशियन तेलाचा वापर करून 'युद्धाचा हेतू' असल्याचा आरोप केला आहे. हा दंड केवळ 'रोझनेफ्ट' किंवा 'ल्युकोइल' सारख्या मंजूर कंपन्यांकडून खरेदी केलेल्या तेलावरच नाही, तर इतर रशियन कंपन्यांच्या कच्च्या तेलावरही लागू होतो. आता भारतासमोर एक महत्त्वाचा प्रश्न आहे. भारताने 'रोझनेफ्ट' आणि 'लुकोइल' कडून तेल खरेदी करणे थांबवल्यास २५ टक्के कर रद्द केला जाईल का की रशियाकडून येणारे सर्व तेल सोडून द्यावे लागेल? पहिला पर्याय भारताला अमेरिकेच्या निबंधांच्या अधीन करतो, तर दुसरा पर्याय भारताला रशियाकडून तेल आयात करण्यापासून रोखतो.आपल्या गरजेच्या ८५ टक्के तेल आयात करणाऱ्या देशासाठी हे जवळजवळ अशक्य आहे. तेलाच्या वाढत्या किमती ट्रम्प यांच्यासाठी आव्हान निर्माण करू शकतात, कारण त्यांनी महागाई कमी करण्याचे आश्वासन दिले आहे. भारतीय रिफायनरी अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार 'रोजनेफ्ट' आणि 'लुकोइल' वरील अमेरिकेच्या नवीन निर्बंधांमुळे भारतात रशियन तेलाचा प्रवाह जवळजवळ थांबेल. त्यामुळे तीन वर्षांपासून अस्तित्वात असलेला दोन्ही अर्थव्यवस्थांमधील एक महत्त्वाचा ट्या तुटेल. यामुळे रशियाच्या तेल उत्पादनात किती घट होईल किंवा भारताने माघार घेतली तर रशियाला नवीन खरेदीदार सापडतील का हे स्पष्ट नाही. वस्तुतः ट्रम्प यांच्या भारतावरील कारवाईचे हे खरे कारण नसून काही तरी वेगळे कारण आहे, असे रशियन मीडिया सुचवत आहे. अमेरिकेच्या निबंधांना तोंड देत असलेले 'रोझनेफ्ट' आणि 'लुकोइल' या रशियाच्या सर्वात मोठ्या तेल उत्पादक कंपन्या आहेत. एकत्रितपणे, त्या देशाच्या जवळजवळ पन्नास टक्के कच्चे तेलाचे उत्पादन करतात. अमेरिकेच्या रशियावरील निर्बंधांपूर्वी भारताने रशियन तेलाची खरेदी खूपच कमी केली; परंतु २०२२ च्या अखेरीस परिस्थिती बदलली. जी ७ देशांनी निर्बंध लादले आणि अनेक देशांनी रशियन तेल खरेदी करणे बंद केले. त्यानंतर भारताने रशियाकडून तेल खरेदी सुरू केली. २०२१-२२ मध्ये भारताच्या आघाडीच्या दहा कच्च्या तेल पुरवठादारांमध्ये रशिया, इराक, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, अमेरिका, ब्राझील, कुवेत, मेक्सिको, नायजेरिया आणि ओमान यांचा समावेश होता. रशियन अर्थ मंत्रालयाच्या मते, तेल आणि वायूचे उत्पन्न देशाच्या संघीय बजेटच्या अंदाजे एक चतुर्थांश आहे. निर्यात आणि महसुलात घट झाल्याने रशियाच्या युद्धक्षमतेवर थेट परिणाम होईल. ट्रम्प यांच्या घोषणेनंतर ब्रेंट क्रूड ऑइलची किंमत ३.४० डॉलरने (५.४ टक्के) वाढून ६५.९९ डॉलर प्रति पिंप झाली, तर 'यूएस वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट' (डबल्यूटीआय) क्रूड ऑइलची किंमत ३.२९ डॉलरने (५.६ टक्के) वाढून ६१.७९ डॉलर प्रति पिंप झाली. यावरून बाजार निर्बंधांच्या परिणामाबद्दल चिंतित असल्याचे दिसते. अमेरिकेच्या निर्बंधामुळे पुरवठा विस्कळीत होऊन कच्च्या तेलाच्या किंमती ७० डॉलर प्रति पिंपापेक्षा जारत वाढू शकतात. बाजार प्रत्यक्ष परिणामाचे मूल्यांकन करण्याचा प्रयत्न करत आहे; परंतु दररोज वीस लाख पिंपापेक्षा जास्त पुरवठा खंडित झाला, तर तो किमतीचा दबाव वाढवेल. अमेरिकेने रशियन कंपन्यांशी व्यवहार करणाऱ्या वित्तीय संस्थांवर दुय्यम निबंध लादण्याची धमकी दिली आहे. याचा अर्थ असा, की रशियन तेल खरेदी करणाऱ्या कोणत्याही कंपनीला हे ठरवावे लागेल की तिला अमेरिकन बाजारपेठेत प्रवेश मिळवायचा आहे की रशियन कंपन्यांशी व्यापार करायचा आहे. बहुतेक प्रकरणांमध्ये कंपन्या अमेरिकेची निवड करतात. यामागे डॉलरमध्ये मिळणारा निधी गमावण्याचा आणि पाश्चात्य वित्तीय व्यवस्थेपासून तोडले जाण्याचा धोका मोठा आहे. ट्रम्प यांनी इराणवर निबंध लादले, तेव्हा भारताने इराणकडून तेल खरेदी करणे बंद केले. त्यामुळे भारताला इराण आणि अमेरिका यापैकी एक निवडण्यास भाग पाडले गेले. आताही भारताला रशिया व अमेरिका यापैकी एक पर्याय निवडायला भाग पाडले जात आहे. आपला देश अत्यंत सावधपणे हा प्रश्न हाताळत आहे. मात्र 'कोणता झेंडा घेऊ हाती' असा प्रसंग उभा राहिल्यावर तज्ज्ञजन काय करतात, ते आता पहायचे.

# 'देवेंद्र फडणवीस , असे वागणे बरे नव्हे ...'



**एखाद्या शहराला वेठीला धरा आणि मागण्या मान्य करुन घ्या, असा जो ट्रेंड आधी मनोज जरांगे यांनी मुंबईत आणि आता बच्चू कडू यांनी नागपुरात केलेल्या आंदोलनातून समोर येत आहे, तो सरकार नावाच्या व्यवस्थेसाठी घातक आहे. कारण न्यायालयानं आदेश दिल्यावरच सरकार आणि प्रशासन नावाच्या अजगराला जाग येते असा संदेश त्यातून गेलेला आहे. मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभरातील मराठ्यांनी मुंबई धडक मारली तर इकडे शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी नागपूरवर स्वारी केली आणि मागण्या मान्य करुन घेतल्या.**

राज्यातील मराठा आणि शेतकरी या दोघांच्याही मागण्या रास्तच आहेत तसंच प्रदीर्घ काळापासून रेंगाळलेल्या आहेत. आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा समाज तीन-साडेतीनदशकापासून आग्रही होता, मागणी मान्य होत नाही म्हणून त्यांच्या मनात राग होता ; अतिअतिवृष्टीमुळे शेतकरी मोडून पडला आहे. हे संकट इतके भीषण आहे की बळीराजाच्या डोळ्यातील अश्रूही आतून गेलेले आहेत. लोकाना रस्त्यावर येण्याची गरज पडू न देता सरकारने खरे तर या मागण्या आधीच मान्य करायला हव्या होत्या किंवा त्यावर कांही तरी तोडगा काढायला हवा होता. पण, तेवढे शहाणपण या सरकारकडे नाही आणि आधीच्या कोणत्याही सरकारकडे नव्हत. कारण सरकारमध्ये समंजस आणि संवेदनशील लोकप्रतिनिधींचा असलेला अभाव. याला अपवाद आपण आहोत हे देवेन्द्र फडणवीस यांनी सिद्ध केले पण, त्यासाठी नाहक वेळ लावला. मराठा आणि शेतकऱ्यांच्या मागण्या राज्य सरकारने या आंदोलनानंतर मान्य केल्या मग इथे प्रश्न उपस्थित होतो तो असा की , मागण्या मान्यच करायच्या होत्या तर त्यासाठी सरकारने इतका उशीर का लावला , आंदोलन संपवावे असे आदेश उच्च न्यायालयाकडून येण्याची वाट का पहिली गेली ? म्हणून या मागण्या मान्य करुन सरकारची लक्तरे महाराष्ट्राच्या वेशीवर टांगली गेली.

मनोज जरांगे यांनी जवळजवळ तीन महिने आधी मुंबई वर धडक मारणार असल्याची घोषणा केली होती तर कर्जमाफीसाठी मुख्यमंत्र्यांच्या नागपूरच्या निवासस्थानासमोर ठिय्या धरु असे बच्चू कडू यांनी दोन आठवडे आधी जाहीर केले होते म्हणजे, ही आंदोलने प्रत्यक्ष सुरु होण्यापूर्वी त्यावर तोडगा काढण्यासाठी सरकारकडे भरपूर वेळ होता. या काळात आंदोलकांशी संवाद साधून मार्ग काढून ही आंदोलने आणि मुंबई व नागपूरकरांची जी काही ससेहोलपट झाली ती टाळता आली असती पण, तसे काही घडले नाही. जरांगे यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा निघाला आणि सर्वांच्या डोळ्यादेखत तो मजल दरमजल करत मुंबईत पोहोचला, बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा निघाला तो नागपूरच्या सीमेवर पोहोचला, तोपर्यंत सरकार शांतपणे हातावर घडी घालून बसलेले होते. जनतेची ससेहोलपट झाली आणि त्याबद्दल सरकार तसंच प्रशासनाला कोणतंही सोयरसुतक नसल्याचे वातावरण होते. 'आंदोलन संपवा' असे न्यायालयाने कान टोचल्यावर प्रशासनाला जाग आली .

सरकारी पातळीवरही हे आंदोलन समाप्त कसे करता येईल याच्या संदर्भात हालचाली सुरु झाल्या. मनोज जरांगे यांच्या मागण्यात पैकी काही मान्य करण्यात आल्या. या मागण्या मान्य करायच्याच होत्या तर त्यासाठी मुंबईवर त्यांना धडक मारु देण्याची गरजच काय होती? त्या मागण्या आधीच मान्य करुन लोकांना मुंबईकडे येण्यापासून रोखता आले असते. असंच बच्चू कडूंच्या नेतृत्वाखालील आंदोलनाबाबतही म्हणता येईल आंदोलकांच्या कर्जमाफीच्या मागण्यांबाबत वेळीच निर्णय घेतले असते तर सरकारची जी बेअब्रू झाली नसती आणि प्रशासनाचे त्यातही पोलीस दलाचे जे काही वस्त्रहरण झाले ते टाळता आले असते.

जनतेचा व्यापक प्रतिसाद मिळालेली आंदोलने काही एका दिवसात उभी राहत नाहीत. त्यासाठी वे, मोठे नियोजन, मनुष्यबळ आणि आर्थिक सहाय्य लागते ; ते उभे करण्यासाठी सलग प्रयत्नांची साखळी उभी करावी लागते. याचा अर्थ मनोज जरांगे यांचे मुंबईवर धडक मारणं आणि बच्चू कडू यांनी नागपूरवर चाल करून जाणे, यासाठी मोठे नियोजन केले गेले होते. मग ही सगळी तयारी राज्याच्या पोलीस दलाच्या गुप्त वार्ता विभागाच्या लक्षात कशी आली नाही ? हा खरा कळीचा मुद्दा आहे. आंदोलनांची तयारी सुरु असतानाच्या या काळात पोलीस दलाचा गुप्तवार्ता विभाग झोपा काढत होता काय असा प्रश्न निर्माण होतो. पण असा प्रश्न उपस्थित करणे खरे तर गैर आहे कारण महाराष्ट्राचं पोलीस दल सध्या नायक नसलेल्या अवस्थेत आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. अलीकडच्या काळात बीड जिल्हा हिंसक प्रकारांनी प्रदीर्घ काळ धुमसत राहिला, हिंगोली-परभणी भागात पोलीस कोठडीत मृत्यू झाला आणि राज्यभर जनतेचा उद्रेकझाला, छत्रपती संभाजीनगर,अहिल्यानगर, भिवंडी, नागपूर, अकोला अशा अनेक भागात हिंसक घटना घडल्या पण, यापैकी एकाही ठिकाणी पोलीस दलाच्या प्रमुखांनी भेट दिल्याचे आणि परिस्थिती निवळण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसले नाही. ड्रग, वाळू माफियांनी महाराष्ट्र पोखरुन काढलेला आहे; वाळू तस्कर तर प्रशासकीय यंत्रणेतील लोकांवर जीवघेणे हल्ले करत आहेत. मात्र राज्याचे पोलीस महासंचालक यापैकी कोणत्याही शहरी गेल्याचे आणि त्यांनी त्या शहरातील किंवा जिल्ह्यातील पोलीस दलाला मार्गदर्शन केल्याचे दिसले नाही. घडणाऱ्या अनेक घटनांचा अंदाज यापूर्वी राज्य पोलिसाना आल्याचे दाखले आहेत. कारण महासंचालकापासून ते साध्या उपनिरीक्षकापर्यंत असलेले खबऱ्यांचे जाळे सक्षम होते. त्यातून एखाद्या आंदोलनाची दिशा काय राहील, कोण संशयित कशाच्या तयारीत आहे, माफियांचे पुढेच पाऊल काय असेल, याची माहिती सरकारला आधीच मिळत असे. परंतु असे अलीकडच्या असे काळात घडल्याचं दिसत नाही. केवळ कोणाची तरी 'दीदी' आहे किंवा कुणाचा तरी 'दादा' आहे म्हणून जर कोणी पोलीससारख्या अत्यंत संवेदनशील दलाचे मुख्यपद भूषवत असेल तर कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत बीड ते फलटण आणि आंदोलनाच्या बाबतीत मनोज जरांगे ते बच्चू कडू ही मालिका कधीच थांबणार नाही. आज दोन शहरे वेठीला धरली गेली, उद्या याचा विस्तार झाला तर प्रत्येक शहरातील जनतेची मोठी ससेहोलपट होईल आणि लोकांमध्ये सरकार तसेच पोलिसांच्या कार्यक्षमतेविषयी चीड निर्माण होईल यात शंकाच नाही. कायदा आणि सुव्यवस्थेच्या अधोगतीला पोलीस महासंचालक यांच्या इतकेच राज्याच्या सरकारचे प्रमुख म्हणून गृहमंत्री जबाबदार आहेत. गृहमंत्रीपद सांभाळणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे फार सहृदयी आहेत. एकट्या 'दीदी'लाच माफ करत नाहीत तर कोणतीही घटना घडल्यावर 'कुणाचीही गय केली जाणार नाही', 'निपक्षपातीपणे चौकशी केली जाईल' अशी ग्वाही देवेंद्र फडणवीस देतात आणि लगेच कुणाला न कुणाला 'क्लीन चीट' देऊन टाकतात असा त्यांचा आजवरचा इतिहास आहे.

राज्य मंत्रीमंडळात सहकारी असलेल्या अनेक मंत्र्यांना देवेंद्र फडणवीस यांच्या कनवाळूपणाचा 'प्रसाद' मिळालेला आहे. एखादा माणूस त्याच्याकडे असलेले परवानाधारी शस्त्र जाहीरपणे तर सोडाच घरातल्या घरात घेऊन जरी फिरला असता आणि देवेंद्र फडणवीस विरोधी पक्षात असते तर त्यांनी गृहखात्याची सालटं सोलली असती पण , मंत्री गिरीश महाजन यांना क्लीनचीट मिळाली...युतीच्या पहिल्या सरकारातील कथित डाळ घोटाळ्याची पुनरावृत्ती करणारे आणि रात्री उशीरा मोबाईलवर काय 'पाहतो' हे वयाला न शोभणाऱ्या अजाणतेपणी का होईना, खरे सांगणाऱ्या गिरीश बापट यांना देवेंद्र फडणवीस यांनी हिंदू संस्कृतीचे महत्व विशद करुन संघाच्या गोशाळेत सेवा करण्याची शिक्षा ठोठावली असती पण, त्यांना मिळाली क्लीनचीटची बक्षिसी मंत्रीपदी असतांना कोणी जर बँकांकडून अवाजवी माफी मिळवल्याची शंका जरी आली असती तर तो मंत्री आणि त्या बँकाना कडेलोटाची शिक्षा फडणवीस यांनी फर्मावली असती पण, संभाजी पाटील निलंगेकर-लातूरकर यांना त्यांच्या मतदार संघात रेल्वेच्या बोगी तयार करण्याच्या कारखान्याचा प्रसाद मिळवून देण्यासाठी फडणीस यांनी पुढाकार घेतला.पंकजा मुंडे, श्रेष्ठींचे लाडके प्रकाश मेहेता, जयप्रकाश रावल, सुभाष देशमुख, रणजित पाटील , बबन लोणीकर अशी ही यादी आणखी वाढणारी आहे मुख्यमंत्र्यांना प्रत्येक घोषणेच्या अंमलबजावणीत तोंडावर पाडणाऱ्या राज्यातल्या नोकरशाहीच्या तर दोन्ही ओंजळी आणि खिसेही देवेंद्र फडणवीस यांनी दाखवलेल्या दयाळूपणानं ओसंडून वाहत आहेत. याची सुरुवात मुख्यमंत्री कार्यालयातीलच प्रवीण परदेशी यांच्यापासून होते आणि राधेश्याम मोपलवार, विश्वास पाटील पर्यंत त्याची व्याप्ती आहे. 'क्लीन चीट' कळस म्हणजे मुख्यमंत्र्यासोबत परदेश प्रवासाला निघालेले प्रवीण परदेशी पासपोर्ट घरी विसरतात आणि मुख्यमंत्र्यांसकट सर्वजण विमानात ताटकळत बसतात . पण, देवेंद्र फडणवीस इतके कनवाळू की त्याबद्दल बातम्या देणाऱ्या पत्रकारांनाच दम आणि त्या अधिकाऱ्याला 'क्लीन चीट' देतात. असा हा देवेंद्र फडणवीस यांच्या 'कनवाळू'पणा, 'क्लीन चीट'चा इतिहास विसरु म्हणता विसरता येणार नाही ! प्रत्यक्ष बच्चू कडू यांच्या आंदोलनाच्या रेट्यानंतर राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी ज्यांच्या येत्या जून महिन्यापूर्वी निर्णय घेण्यासाठी 'त्याच' प्रवीण परदेशींच्या अध्यक्षतेखाली कर्जमाफीची कर्जमाफीसाठीची समिती स्थापन झाली आहे . प्रवीण परदेशी ते प्रवीण परदेशी असा हा चौकशी समित्यांचा यांचा देवेंद्र फडणवीस प्रवास आहे.

मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांची राज्याच्या विकासाची तळमळ,विकासाची दूरदृष्टी, जनतेच्या हिताची कळवळ, राजकारण्याची पलीकडची सर्वसमावेशकता, स्वच्छ प्रतिमा आणि न थकता काम करण्याची अफाट क्षमता पाहिली की पंतप्रधानपदाचे स्वप्न पडण्याआधीचे शरद पवार आठवतात. मात्र या सर्व गुणांवर डोईजड होणारा देवेंद्र फडणवीस यांचा वर उल्लेख केलेला सर्वांना क्लीन चीट देण्याचा ; म्हणजे सर्वांना पाठीशी घालण्याचा अट्टहासी कनवाळूपणा इतका बहुपेडी आणि वैपुल्यानं व्यापक आहे की, महाराष्ट्राच्या इतिहासात त्यांची नोंद 'दयाळू महाराज' अशी झाली तर आश्चर्य वाटायला नको ! हे सर्व लक्षात घेता, ' हे वागणे बरे नव्हं, असे वागणे रयतेच्या हिताचे आणि तुमची प्रतिमा उजळवणारे नाही, हा सल्ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसाना देण्याची वेळ आलेली आहे.

**प्रवीण बर्दापूरकर**

# राजकीय पुनर्वसनासाठीच बच्चू कडूंचे दबावतंत्र



**नागपूरला आणि पर्यायाने उभ्या विदर्भाला वेठीस धरणारे माजी मंत्री बच्चू कडू यांचे महाएल्गार आंदोलन अखेर निकाली निघाले आहे. ३० जून २०२६ पर्यंत महाराष्ट्र शासन शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देणार अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्याने बच्चू कडू यांच्या या आंदोलनाचा शेवट अखेर 'गोड' झाला आहे.**

शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्त केले जावे, त्यांच्या पिकाला हमीभाव मिळावा, ओल्या दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना तत्काळ मदत मिळावी, तसेच दुधाला भाव वाढवून मिळावा. इत्यादी आठ मागण्यांसाठी अमरावती जिल्ह्यातील बेलोरा या गावातून सोमवारी बच्चू कडू यांनी ही महाएल्गार यात्रा सुरू केली होती. या यात्रेत ते स्वतः ट्रॅक्टर चालवत सहभागी झाले होते. त्याचबरोबर इतर शेतकरीदेखील ट्रॅक्टर आणि इतर वाहने घेऊन या यात्रेत सहभागी झाले होते. बेलोराहून निघून वर्धा मार्गे मंगळवारी संध्याकाळी ही महाएल्गार यात्रा नागपूरच्या वेशीवर पोहोचली. मात्र बच्चू कडू यांनी अलीकडेच समृद्धी महामार्गाच्या सुरुवातीला आपली यात्रा थांबवली आणि तिथेच ठिय्या दिला. परिणामी चारही बाजूचे रस्ते ब्लॉक झाले होते. प्रत्येक रस्त्यावर १५ ते २० किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. त्यात अनेक प्रवासी वाहने तर होतीच, पण त्याचबरोबर रुग्णवाहिका देखील होत्या.

एव्हाना बच्चू कडूंसोबत राजू शेट्टी, रविकांत तुपकर, महादेव जानकर, प्रकाश पोहरे, विजय जावंदिया असे सर्व शेतकरी नेतेदेखील या यात्रेत सहभागी झाले होते. भरीस भर मनोज जरांगे-पाटील देखील येथे येऊन पोहोचले होते. त्यामुळे काय होणार ही सर्वांनाच चिंता लागून राहिली होती.जवळजवळ दहा हजार आंदोलक आणि त्यांच्या जवळजवळ २००० गाड्या आणि ट्रॅक्टर्स यांनी पूर्ण रस्ता अडवून टाकला होता. आंदोलक मागे हटायला तयार नव्हते. दरम्यान मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्वतःहून जन याचिका दाखल करून घेत संध्याकाळी ६ वाजेपर्यंत रस्ता मोकळा करा असे पोलिसांना आदेश दिले. मात्र बच्चू कडू ऐकायला तयार नव्हते. आम्ही न्यायालयाचा आदर करतो. तुम्ही आम्हाला जेलमध्ये टाका असे आव्हान त्यांनी सरकारला दिले. या दरम्यान आता आम्ही रेल्वे सुद्धा रोखणार अशी धमकी देखील दिली आणि काही शेतकरी बाजूने जाणाऱ्या रेल्वे मार्गावर जाऊन देखील बसले होते. एकूणच पोलिसांच्या कसोटीचा हा काळ होता.

दरम्यान राज्य मंत्रिमंडळातील मंत्री गिरीश महाजन आणि चंद्रशेखर बावनकुळे यांनी फोनवर बच्चू कडू यांच्याशी बोलणे केले आणि संध्याकाळी आशीष जयस्वाल आणि पंकज भोयर हे राज्य मंत्रिमंडळातील दोन मंत्री शेतकऱ्यांशी चर्चा करायला आले. रात्री उशिरापर्यंत रस्त्यावरच चर्चा होऊन मग दुसऱ्या दिवशी म्हणजेच गुरुवारी मुंबईत मुख्यमंत्री संबंधित मंत्री आणि संबंधित खात्याचे सचिव या सर्वांसोबत चर्चा करून मार्ग काढण्याचा निर्णय झाला. बच्चू कडूंनी मग आपल्या शेतकऱ्यांची तिथे जवळच्या मंगल कार्यालयात सोय केली आणि गुरुवारी ते मुंबईला रवाना झाले. त्यांच्यासोबत इतर सर्व शेतकरी नेतेदेखील आलेले होते. मुंबईत मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेत जो काही निर्णय झाला तो वाचकांना ज्ञात आहेच. त्यामुळे आंदोलन आता संपलेले आहे. दरम्यान नागपूर परिसरात आलेल्या संततधार पावसामुळे शेतकरी सुद्धा आपापल्या गावी रवाना झाले असल्याचे कळते आहे.वस्तूतः मुख्यमंत्र्यांनी आम्ही योग्य वेळी कर्जमाफी देणारच आहोत असे जाहीर केले होते. तरीही बच्चू कडू यांनी हे सर्व महाएल्गार यात्रेचे उद्योग करण्यामागे आणि त्यायोगे सर्वसामान्य जनता आणि सरकारला वेठीस धरण्यामागे शेतकऱ्यांचे हित दुय्यम आहे, तर आपले राजकीय पुनर्वसन हा महत्त्वाचा हेतू असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. २००४ पासून बच्चू कडू हे त्यांच्या प्रहार संघटनेमार्फत निवडणूक लढवून विधानसभेत निवडून येत होते. उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळात देखील त्यांची वर्णी लागली होती. एकनाथ शिंदे यांच्यासोबत कामाख्या देवीच्या दर्शनाला जाणाऱ्या ५० आमदारांमध्येही त्यांचा समावेश होता. मात्र २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा भाजपच्या नितीन तायडेंकडून पराभव झाला. तरीही आपली कुठेतरी सोय लागावी यासाठी त्यांचे प्रयत्न चालू आहेत. त्यासाठीच शेतकऱ्यांचा मुद्दा घेऊन आधी एक पदयात्रा मग गुरुकुंज मोझरी येथे लाक्षणिक उपोषण आणि आता ही महाएल्गार यात्रा काढून ते आपल्या राजकीय वजन जमवण्याच्या मागे आणि त्यायोगे सत्ताधारी पक्षावर दबाव आणण्याच्या मागे लागले आहेत असे बोलले जात आहे. यातून शेतकऱ्यांच्या समस्या कदाचित सुटतीलही, मात्र बच्चू कडू यांचे राजकीय पुनर्वसन या फडणवीस यांच्या कालखंडात होणे कठीण असल्याचे बोलले जात आहे. तरीही बच्चू कडू अशा वेगवेगळ्या करामती करत आपला दबाव वाढवत राहणार हे चित्र आज दिसते आहे. त्यात त्यांना किती यश येईल हे आज सांगणे कठीण आहे.

**- अविनाश पाठक**

# मनसे प्रमुख राज ठाकरे यांचे वक्तृत्व आणि राजकीय कर्तृत्व

मनसे प्रमुख राज ठाकरे यांची खरी ओळख म्हणजे त्यांचे अत्यंत प्रभावी आणि ओजस्वी वक्तृत्व. त्यांच्या भाषणाची शैली अशी आहे की, ते ज्यांच्या विरोधात उभे ठाकतात, त्यांच्या विरोधात आपली भूमिका ठामपणे मांडतात. त्यामुळे सभेतील श्रोत्याला काही क्षण असे वाटते की, हे खरेच असेल किंवा असू शकते का? या मानसिकतेमुळे तो गोंधळून जातो. सध्या ते भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करत आहेत. विशेषतः, मोदी सरकारच्या धोरणांवर, गुजरातला कथितरित्या दिल्या जाणाऱ्या प्राधान्यावर आणि निवडणुकीत दिलेली आश्वासने पूर्ण न केल्याच्या मुद्द्यांवर ते बोलतात. यासोबतच, मतदान यादीतील चुका दाखवत ते निवडणूक आयोगाला लक्ष्य करीत आहेत.राज ठाकरे यांचे वक्तृत्व प्रभावी असले तरी, त्यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) पक्षाचे राजकीय कर्तृत्व आणि निवडणुकीतील यश पाहिले तर ते त्यांच्या वक्तृत्वाच्या तुलनेत नगण्य वाटते. निवडणुकीतील यशापयश आणि राज्याच्या विकासातील त्यांचे योगदान, त्यांच्या भाषणांच्या धडाक्यासमोर फिके पडते. त्यांच्या बोलण्याची धार आजही कायम आहे.अलीकडे, त्यांनी आपला मोर्चा निवडणूक आयोग आणि मतदान यादीतील दुरुस्ती या मुद्द्यांकडे वळवला आहे आणि त्यावरून जोरदार काहूर उठवले आहे.या सर्व पार्श्वभूमीवर, जो फक्त बोलत नाही, तर निष्काम बुद्धीने, कोणताही स्वार्थ न ठेवता लोकांचे हित साधतो आणि प्रत्यक्ष कृती करतो. तात्पर्य: राज ठाकरे यांच्याकडे उत्तम वक्तृत्व आहे, परंतु समर्थांच्या निकषांवर खरे उतरण्यासाठी त्यांच्या वक्तृत्वाला राजकीय कृती आणि लोकहिताच्या कार्यातून सिद्ध करावे लागेल.

**अविनाश देशपांडे**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# गांजाची शेती करणाऱ्यांवर उपविभागीय पोलीस अधिकारी पुसद पथकाची रेड कारवाई



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - तालुक्यातील मौजे चिखली येथिल शिवारात दिनांक ३०/१०/२०२५ रोजी पोहवा/६९८ सुनिल मदने, पोहवा/२१७७ शंकर ताळीकुटे पो.अ.४४ जुनेद सैयद यांना गोपनीय माहिती प्राप्त झाली की, पोलीस स्टेशन-पुसद ग्रामीण हद्दीमध्ये ग्राम चिखली येथिल शेत शिवारात एका शेतकरी याने मानवी मेंदुवर विपरीत परीणाम करणारा प्रतिबंधित गांजा सदृश्य अमली पदार्थ वनस्पती लागवड केली असुन सदर शेतमालक हे गांजा पिकाची स्वतः राखन करीत असतो अशी माहीती मिळाल्याने आम्ही, प्रभारी अधिकारी पो.स्टे. पुसद ग्रामीण सपोनि /सुरेंद्र राऊत यांना व आमचे अधिनस्त पथकाला कार्यवाही करणे करीता पाठविण्यात आले.

सपोनि/सुरेंद्र राउत व आमचे अधिनस्त पथकाने ग्राम चिखली येथिल शेतशिवारातील चिंतामण हरीभाऊ डाखोरे वय ६५ वर्ष, रा. चिखली यांचे शेतात छापा मारुन कारवाई केली असता त्यांचे शेतात एकुण वजन ८४ किलो ९०० ग्रॅम प्रती १५,०००/- रु प्रमाणे असा एकुण १२,७३,५००/- रुपये किंमतीचा मानवी मेंदुवर विपरीत परीणाम करणारा प्रतिबंधित गांजा मुददेमाल शेतात मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. सदर प्रकरणी पो.स्टे. पुसद ग्रामीण येथे NDPS Act प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात येवुन आरोपी चिंतामण हरीभाऊ डाखोरे वय ६५ वर्ष, रा. चिखली ता.पुसद जि. यवतमाळ यास अटक करण्यात आली आहे.

सदर गांजा रेड कारवाई ही कुमार चिंता,पोलीस अधीक्षक, यवतमाळ, अशोक थोरात, अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे मार्गदर्शनानुसार आमचे आदेशान्वये सपोनि /सुरेंद्र राउत, प्रभारी अधिकारी पो.स्टे. पुसद ग्रामीण, पोउपनि/राहुल देशमुख, आमचे अधिनस्त पोहवा/६९८ सुनिल मदने, पोहवा / २१७७ शंकर टाळीकुटे पोहवा/रविंद्र गावंडे, पोहवा/विनायक चव्हाण, पोहवा/सचिन बंकेवार, पोअं/ मो.ताज, संताष राठोड, शोएब शेख, सर्व पो.स्टे. पुसद ग्रामीण पो.अं ४४ जुनेद सैयद पो.अं ४७८ जुबेर सैयद यांनी केली आहे.

पुसद ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या मौजा चिखली येथे आमली पदार्थ गांजाची शेती करत असल्याची गुप्त माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी पुसद यांच्या पथकाला मिळते परंतु पुसद ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुरेन्द्र राऊत हे याबाबत अनभिज्ञ कसे. ?

आपले कर्तव्य कोणत्या प्रकारे पार पाडत आहे याबाबत वरिष्ठ अधिकारी यांनी चौकशी करून नियमानुसार कारवाई करणे गरजेचे आहे असे परिसरातील नागरिक प्रश्न उपस्थित करीत आहेत.

# विदर्भ साहित्य संमेलनात शेतकरी प्रश्न केंद्रस्थानी

## धोरणात्मक अपयश, अस्मानी आघात आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा मुद्दा उभारला




जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - विदर्भ साहित्य संघाचे ६९वे साहित्य संमेलन स्मृतिशेष राजानंद गडपायले साहित्य नगरी, जांब (यवतमाळ) येथे उत्साहात सुरू झाले. शनिवारी सकाळी ग्रंथ दिंडीने या साहित्य सोहळ्याची सुरुवात झाली. संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रमाकांत कोलते, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते आणि स्वागताध्यक्ष पांडुरंग खांदवे यांची उपस्थिती होती. संमेलनातील पहिला परिसंवाद 'शेतीसंकट : अस्मानी की धोरणात्मक अपयश आणि साहित्यिकांची भूमिका' या विषयावर आयोजित करण्यात आला. या चर्चेत विदर्भातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांना साहित्यिकांनी स्पर्श केला.

दैनिक सकाळचे संपादक प्रमोद काळबांडे यांनी शासनाच्या धोरणात्मक अंमलबजावणीतील कमतरता व स्वामीनाथन अहवालाची अंमलबजावणी न होणे, अयोग्य MSP, अतिवृष्टी आणि अव्यवस्थित प्रकल्पव्यवस्थापनाचा उल्लेख केला. गोसीखुर्द धरणाचे ४० वर्षांचे अपूर्णत्व आणि कोळसा खाणींनी बाधित शेती हा क्षेत्राचा कटू वास्तव आहे. असे त्यांनी सांगितले. मिडीया वॉचचे संपादक अविनाश दुधे यांनी विदर्भातील आत्महत्यांच्या प्रश्नावर भाष्य करत, "कर्जमाफीचे चार टप्पे घडूनही परिणाम होत नाहीत. उद्योगांच्या कर्जमाफीला वेग आणि शेतकऱ्यांच्या मदतीत विलंब दिसतो," असे सांगितले. त्यांनी सरकारी यंत्रणेच्या संवेदनशीलतेवर प्रश्न उपस्थित केला. नूतन माळवी यांनी महिला शेतकऱ्यांच्या स्थितीचा मुद्दा पुढे आणला. शेतात श्रम महिलांचे; जमीन मात्र नाव पुरुषांची. व्यसन, सामाजिक विवंचना आणि योजनांची अंमलबजावणी अपुरी राहणे ही परिस्थिती अधिक बिकट करणारी कारणे आहेत. असे त्यांनी नमूद केले. परिसंवादाचे अध्यक्ष दैनिक तरुण भारतचे संपादक शैलेश पांडे यांनी कृषी विद्यापीठांनी ग्रामीण भागात जनजागृती वाढवावी, असे मत व्यक्त केले. "पीक विम्यासाठीही लाच मागितली जाते हे वास्तव आहे. साहित्य हे प्रश्न विचारणारे आणि परिवर्तनाकडे वाट दाखवणारे असावे," असे ते म्हणाले. संमेलनाच्या पहिल्याच दिवशी साहित्यिकांनी कृषी संकटावर तीव्र मते मांडत सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक दृढ केली. शेतकरी प्रश्नांवर संवेदनशील भूमिका आणि धोरणात्मक स्पष्टता आवश्यक असल्याचा सूर या चर्चेत उमटला.

# कोळी (खुर्द) गावातील रस्ता, नालीचे बांधकाम कधी होणार ? नागरिकांचा सवाल

## रस्त्याच्या मागणी करिता शेकडो नागरिकानी दिली पंचायत समितीला धडक



जनमाध्यम प्रतिनिधी

घाटंजी - तालुक्यातील पेसाअंतर्गत येणारी ग्रामपंचायत कोळी (खुर्द )येथील गावातील रस्ता व नालीचे बांधकाम मागील कित्तेक वर्षांपासून झाल्या नसल्याने गावातील नागरिकांना व शाळकरी मुलांना ये जा करण्याकरिता मोठी अडचण निर्माण होत आहे त्यामुळे गावातील रस्ते व नाल्याचे बांधकाम होणार कधी असा सवाल उपस्थित करत शेकडो नागरिकांनी आज पंचायत समिती घाटंजी येथे भाजप तालुका अध्यक्ष विजयजी बैस व सामाजिक कार्यकर्ते रितेश बोबडे यांच्या नैतृत्वात धडक दिली.

सविस्तर वृत्त असे की, गेल्या अनेक वर्षापासून गावातील अंतर्गत रस्ते व नाली नादुरुस्त असल्यामुळे नागरिकांना जाने येने करण्याकरिता अडचण जात आहे आणि मागील 3 वर्षाआदी जलजीवन मीशन अंतर्गत गावात पाईप लाईनचे काम करण्यात आले,त्याकरिता गावातील ठिकठाक असलेले रस्तेसुद्धा या कामामुळे खराब झाले आहेत. आजची गावातील परिस्थिती पाहता गावातील नागरिकांना, वयस्कर, महिला व शाळेकरी अशा लहान मुलांनाशूद्धा चालणे कठीण झाले आहे.रस्ते दुरुस्त कधी होणार असा ग्रामपंचायतला प्रश्न केला असता रस्ते मंजूर आहेतअशी उत्तरे ग्रामसेवकांकडून मिळतात पण काम करण्यास जलजीवन मिशनची कामे अपूर्ण असल्यामुळे त्या रस्त्यांचे काम सद्या तरी करता येणार नसल्याचे सांगितल्या जाते. त्यामुळे जलजीवनची कामे कधी होणार आणि गावात रस्ते कधी येणार? असा प्रश्न निर्माण होतो. गावाकऱ्यांना रस्त्यांची अत्यंतआवश्यकता आहे. त्याकरिता आपण यात लक्ष दयावेआणि मार्ग काढून गावातील रस्ते बनविण्यात यावे अन्यथा आम्ही लोकशाही मार्गाने आंदोलन उभारू असा इशारा गावाकऱ्यांनी आज दिलेल्या निवेदणाद्वारे गटविकास अधिकारी पंचायत समिती घाटंजी यांना दिला आहे. यावेळी रोशन राठोड,मनोज राठोड आकाश राठोड,रुपेश चव्हाण, कपिल राठोड,संजय गाडवे,साहिल जाधव, निलेश शितुरे,कवडू गाडवे, मंगेश बावणे, बादल चव्हाण, लक्ष्मण बावणे, दत्ता गाडवे, सवाईराम जाधव, ठाकूर राठोड, प्रविण मोहिजे, रोशन गाडवे,रामदास गोंधडी,अजय कुशराम, मनीष राठोड, निलेश राठोड,अंकित जाधव मारोती मोहजे, मंगेश मोहजे या सह शेकडो गावकरी उपस्थित होते.

# विदर्भाची पंढरी पुसद येथे कार्तिकी एकादशी यात्रा महोत्सवाची भव्य आयोजन!




जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - श्री ज्ञानेश्वर संस्थान पुसद द्वारा रविवार दिनांक २ नोव्हेंबर २०२५ रोजी विठुरायाच्या कार्तिकी एकादशीच्या भव्य सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या दिवशी सकाळी ६ ते ७:३० या वेळेत विठुरायाला अभ्यंग स्नान पंचामृताचा अभिषेक, काकडा होऊन साडेसात वाजता भव्य महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

यानंतर भाविकांना सकाळी ७:३० ते रात्री ११ या वेळेमध्ये विठुरायाच्या दर्शनाचा लाभ घेता येणार आहे सकाळी ९:३० ते ११:३० या वेळेमध्ये ज्ञानेश्वरीचे सामूहिक पारायण दुपारी १२ ते ४ या वेळेत विठुरायाची भजनमाला दुपारी ४ ते ६ या वेळेमध्ये हरिभक्त परायण विठ्ठल महाराज भोयर यांचे हरिकीर्तन संपन्न होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ६:३० ते ७:३० या वेळेमध्ये सामूहिक हरिपाठाचे आयोजन केले आहे. भाविकांनी विठुरायाच्या दर्शनाचा लाभ घ्यावा. तसेच संस्थांन मध्ये भाविकांना साबुदाना खिचडीचा प्रसाद आणि चहा चे वितरण करण्यात येणार आहे. तरी भाविकांनी या यात्रा महोत्सवामध्ये सहभागी होऊन श्रीहरीचे दर्शनाचा लाभ घ्यावा असे श्री ज्ञानेश्वर संस्थान पुसद द्वारा कळविण्यात आले आहे.

# वेचक

## चालकासह पोलीस खात्यातील ११ अधिकारी निवृत्त

यवतमाळ : शहर पोलीस स्टेशनला कार्यरत असणारे चालक गौतम दत्तात्रय मनोहर 58 हे वयोमानानुसार आज निवृत्त झाले आहेत त्यांच्यासोबत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत कार्यरत असणारे पोलीस उपनिरीक्षक, असिस्टंट पोलीस उपनिरीक्षक, अंमलदार असे अकरा कर्मचारी निवृत्त झाल्याने आज त्यांचा दुपारी अडीच वाजताच्या दरम्यान पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला आणि निरोप दिला.यवतमाळ शहर पोलीस स्टेशनला कार्यरत असणारे गौतम मनवर 1993 मध्ये मुख्यालय मध्ये रुजू झाले होते त्यानंतर त्यांनी यवतमाळ ग्रामीण पोलीस स्टेशन, शहर पोलीस स्टेशन, पांढरकवडा पोलीस स्टेशन, लोहारा पोलीस स्टेशन, या ठिकाणी सेवा दिली होती त्यांच्या काळात त्यांनी खात्यातील अनेक चढ-उतार पाहिलेत यापैकी 2005 मधील संचारबंदी काळात पोलीस व्हॅन जाळण्यात आली होती त्यावेळचा प्रसंग त्यांनी आज सांगितला शहर पोलीस स्टेशनमध्ये पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांच्या हस्ते पती-पत्नी यांचाही सत्कार करण्यात आला.

## सावंगा (बु) येथे बालविवाह रोखला

यवतमाळ - दिग्रस तालुक्यातील सावंगा (बु), येथील एका १७ वर्षीय अल्पवयीन बालिकेचा विवाह होणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर तात्काळ कारवाई करत चाईल्ड हेल्प लाईन १०९८ आणि बाल संरक्षण विभागाने संयुक्त पथकाच्या मदतीने हा बालविवाह रोखला. चाईल्ड हेल्प लाईनला या विवाहाबाबत गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. माहिती मिळाल्यानंतर सावंगा (बु) येथील अंगणवाडी सेविका यांच्याकडून बालिकेच्या वयाची नोंद तपासण्यात आली. नोंदीनुसार मुलीचे वय १७ वर्षे ६ महिने असल्याचे स्पष्ट झाले. बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ नुसार मुलीचे विवाहाचे किमान वय १८ वर्षे, तर मुलाचे वय २१ वर्षे असणे आवश्यक आहे. त्यामुळे हा विवाह बेकायदेशीर ठरत होता. यानंतर चाईल्ड हेल्प लाईनचे अधिकारी व जिल्हा महिला व बाल विकास विभागाचे पथक संबंधित पत्त्यावर पोहोचले. बालिकेच्या पालकांना समुपदेशन करून अल्पवयात लग्न केल्यास होणारे कायदेशीर परिणाम व शिक्षा याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. पालकांना सांगण्यात आले की, अल्पवयीनांचे लग्न लावणारे किंवा त्यास सहकार्य करणारे जसे की मंडप, डेकोरेशन, फोटोग्राफी, भोजन व्यवस्था इ. सेवा पुरवणारे यांच्यावरही कायदेशीर कारवाई होऊ शकते. अशा गुन्ह्यांसाठी दोन वर्षे कारावास व एक लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. पालकांना मा. बालकल्याण समिती, यवतमाळ यांच्या समक्ष उपस्थित राहण्याचे सूचनापत्र देण्यात आले आहे. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विशाल जाधव, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी देवेंद्र राजूरकर, आणि चाईल्ड हेल्प लाईन समन्वयक फाल्गुन पालकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गणेश आत्राम, पूजा शेलारे, तसेच सावंगा गावातील व्ही. आर. मंगळे ग्रामसेवक रविकांत निकम सरपंच, महादेव सपरे तंटामुक्ती अध्यक्ष आणि दिग्रस पोलिस स्टेशनचे सहाय्यक उपनिरीक्षक रवींद्र जगताप व पोलीस कॉन्स्टेबल यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. जिल्हा बाल संरक्षण कक्षाने गावात कुठेही बालविवाहाची माहिती मिळाल्यास ती त्वरित ग्रामसेवक, सरपंच, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका किंवा थेट 'चाईल्ड हेल्प लाईन १०९८ वर द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव पूर्णतः गोपनीय ठेवले जाईल, असे आवाहन केले.

## कपास किसान ॲपवर सकाळी १० पासून स्लॉट बुकींग

यवतमाळ : भारतीय कपास महामंडळाने कपास किसान मोबाईल ॲप सुरू केले आहे. या ॲपवर अकोला आणि औरंगाबाद शाखेसाठी स्लॉट बुकींग सुरू करण्यात आली आहे. ही स्लॉट बुकींग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू होणार आहे. कापूस किसान मोबाईल ॲपद्वारे नोंदणी आणि स्लॉट बुकींग प्रक्रियेस मदत करण्यासाठी लिंक तयार करण्यात आली आहे. यात ॲपमध्ये नोंदणी व स्लॉट बुकींगसाठी सविस्तर माहिती व पायऱ्या दिलेल्या आहेत. शेतकऱ्यांसाठी youtube.com/@KapasKisan-official वर उपलब्ध आहे. स्लॉट बुकींग प्रक्रीयेत स्लॉट बुकींग सुविधा 7 दिवसाच्या रोलिंग बेसिसवर खुली राहील. प्रत्येक दिवशी एक तारीख बंद होईल व दुसऱ्या दिवशी नवीन तारीख खुली केली जाईल. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना कपास किसान ॲपवर तातडीने नोंदणी करावी. तसेच सीसीआयच्या खरेदी केंद्रावर कापूस विक्रीस येण्यापूर्वी स्लॉट बुकींग करावी, असे आवाहन महामंडळाचे विभागीय व्यवस्थापक यांनी केले आहे.

# उमरखेडमध्ये उपोषण स्थळी पोलिसांवर हल्ला मंडप हटविताना तणाव, आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

जनमाध्यम प्रतिनिधी

उमरखेड - शहरातील सारडा पेट्रोल पंपासमोर छत्रपती शिवाजी महाराज आश्वारूढ पुतळा कृती समितीच्या उपोषण मंडप हटविताना पोलिसांवर हल्ला झाल्याची घटना घडली असून याप्रकरणी आठ जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी पोलीस हवालदार गजानन माधवराव पोले (वय ४२) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अप. क्र. 700/2025 नुसार कलम 132, 121(2), 296, 189(2), 190, 49, 281, 54(BNS) सह कलम 135 महाराष्ट्र पोलीस अधिनियम प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यातील आरोपी रमेश चव्हाण (६०), राहुल मोहितवार (३४), गुलाबराव सुर्यवंशी (४७), प्रविण देशपांडे (४२), गजानन देशमुख (४७), गोपाल झाडे (४२), अभय पवार (५४) आणि एक अल्पवयीन मुलाचा समेवश सर्व रा. उमरखेड. उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, उमरखेड यांच्या आदेशानुसार ३१ ऑक्टोबर रोजी पोलीस निरीक्षकांनी उपोषणाचा मंडप हटविण्यास सांगितले होते. त्यानुसार पोलीस पथक आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी घटनास्थळी गेले असता मंडपातील काही उपोषणकर्त्यांनी मंडप हटविण्यास विरोध दर्शविला. दरम्यान, काही व्यक्तींनी "गाव पेटवू, पेट्रोलपंप जाळू" अशा धमकीच्या घोषणा देत जमावाला चिथावणी दिली. त्यावेळी पोलिसांनी त्यांना ताब्यात करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी पोलिसांना शिवीगाळ व धक्काबुक्की केली. त्यात अल्पवयीन आरोपी प्रियदर्शन देशमुख याने फिर्यादी हवालदार गजानन पोले यांच्या नाकावर घुसे मारून दुखापत केली. जखमी हवालदाराला तत्काळ सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आले असून पुढील उपचारासाठी त्यांना दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक गणेश मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# जिल्ह्यातील शिव भोजन थाळी संकटात..!

## नऊ महिन्यांपासून निधी रखडला – 45 केंद्र संचालक हवालदिल

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : गरीब व गरजू नागरिकांच्या पोटापाण्याचा आधार ठरलेली "शिव भोजन थाळी" योजना आज निधीअभावी गंभीर संकटात सापडली आहे. जिल्ह्यातील तब्बल ४५ शिवभोजन केंद्रांना मागील नऊ महिन्यांपासून शासनाचा निधी प्राप्त झालेला नाही. परिणामी केंद्र संचालक आर्थिक अडचणीत सापडले असून, स्वतःच्या खिशातून किंवा उसनवारी करून थाळी देण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

"महाराष्ट्रात कोणीही उपाशी राहू नये" या उदात्त हेतूने २०२० साली तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली या योजनेचा शुभारंभ झाला होता. सरकार बदलले तरी योजनाची अंमलबजावणी सुरू ठेवण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य दिली. मात्र आता या योजनेला निधीअभावी गुदमरावे लागत आहे. महागाईचा तडका सर्वसामान्य नागरिकांना बसला असून याचा परिणाम शिवभोजन थाळी व्यवसायिकांना सुद्धा झाला आहे. डाळींपासून ते तेल, भाजीपाल्यापासून ते मसाल्यांपर्यंत सर्व वस्तूंचे दर वाढले आहेत. किराणा व्यापारी उधारीवर साहित्य देण्यास नकार देत आहेत. त्यामुळे शिवभोजन केंद्र संचालकांना दररोजच्या खर्चासाठी संघर्ष करावा लागत आहे. अनेक केंद्रांवर दिवसभरात शेकडो गरजू लोक थाळी घेण्यासाठी येतात; मात्र निधी न मिळाल्याने या केंद्रांचा कारभार कोलमडण्याच्या मार्गावर आहे. अर्थमंत्र्यांकडे निवेदन आश्वासन मात्र निधी मिळणार कधी असा प्रश्न उपस्थित होत असून अलीकडेच यवतमाळ शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा पक्षप्रवेश सोहळा झाला होता. या कार्यक्रमास राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार उपस्थित होते. त्याच वेळी शिवभोजन केंद्र संचालकांनी त्यांना निवेदन सादर करून रखडलेल्या निधीबाबत लक्ष वेधले. अर्थमंत्री पवार यांनी सकारात्मक भूमिका घेत जिल्हाधिकारी यांना या संदर्भात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले, असे सांगण्यात आले आहे. मात्र आदेश दिल्यापासून काही दिवस उलटून गेले तरी प्रत्यक्ष निधी वितरणाचे काम सुरू झालेले नाही. 'लाडक्या बहिणी'प्रमाणे 'लाडक्या थाळीला'ही न्याय द्या संचालकांची सरकारला मागणी केली आहे.या संकटातून बाहेर पडण्यासाठी जिल्ह्यातील सर्व शिवभोजन केंद्र संचालक व संचालिका यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना थेट आवाहन केले आहे. "लाडक्या बहिणीप्रमाणे शिवभोजन चालवणाऱ्या लाडक्या बहिणींनाही न्याय मिळू द्या. रखडलेला निधी तातडीने उपलब्ध करून आम्हाला या संकटातून बाहेर काढा." त्यांच्या म्हणण्यानुसार, शासनाने लवकरात लवकर निधी वितरित केला नाही तर अनेक केंद्रे बंद पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे "गरीबांच्या ताटातील शिवभोजन" ही योजना कायम ठेवण्यासाठी शासनाने त्वरित पुढाकार घ्यावा, अशी मागणी मीनाक्षी सावरकर, कल्पना दरवाई, सुनंदा मानकर यासह अनेक महिला संचालकांनी केली आहे.

# उमरखेड उपजिल्हा रुग्णालयात आता विनामूल्य डायलिसिसची सुविधा

## पालकमंत्री संजय राठोड यांच्याहस्ते मोफत डायलिसिस सेंटरचे उद्घाटन



जनमाध्यम प्रतिनिधी

उमरखेडमधील रुग्णांसाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय; प्रवासाचा आणि उपचाराचा आर्थिक भार टळला : पालकमंत्री संजय राठोड

यवतमाळ - जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते आज जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे दूरदृश्य प्रणालीद्वारे उमरखेड येथील ८ खाटांच्या मोफत डायलिसिस सेंटरचे उद्घाटन करण्यात आले. यामुळे उमरखेड आणि लगतच्या परिसरातील किडनी (मूत्रपिंड) आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना मोफत उपचार उपलब्ध होणार असल्याने दिलासा मिळेल, असा विश्वास पालकमंत्री संजय राठोड यांनी व्यक्त केला.

उमरखेड तालुक्यात कार्यरत असलेल्या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात हे अत्याधुनिक डायलिसिस सेंटर स्थापन करण्यात आले आहे. परिसरातील रुग्णांची वाढती संख्या आणि उपचारांची गरज लक्षात घेऊन हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. यावेळी बोलताना पालकमंत्री राठोड म्हणाले की, "या मोफत डायलिसिस सेंटरमुळे उमरखेड परिसरातील नागरिकांचे आरोग्य सुलभ होणार आहे. आतापर्यंत रुग्णांना उपचारांसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा मोठ्या शहरांमध्ये जावे लागत होते, ज्यामुळे त्यांना प्रवासाचा मोठा ताण सहन करावा लागत होता आणि उपचारांवरील आर्थिक भुर्दंड सोसावा लागत होता.

आता हे मोफत केंद्र सुरू झाल्यामुळे नागरिकांचा हा त्रास दूर होईल आणि त्यांना वेळेवर व सोयीस्कर मोफत उपचार मिळतील." याप्रसंगी जिल्हाधिकारी विकास मीना, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुखदेव राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी व परिचारिका उपस्थित होत्या. तसेच, उमरखेड येथे आ. किसन वानखेडे, भाजपचे जिल्हा समन्वयक नितिन भुतडा, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. मांडण, वैद्यकीय अधीक्षक डॉ. डोंगे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शिंदे, चितंगराव कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

# अपघातातील जखमी चिमुकलीचाही मृत्यू

## वणीतील भीषण अपघातात मृतांची संख्या पाचवर

जनमाध्यम प्रतिनिधी

वणी - वणीजवळील लालगुडा गावाजवळ झालेल्या भीषण अपघातातील जखमी चिमुकली इनाया शेख (वय ५) हिचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. त्यामुळे या दुर्दैवी अपघातातील मृतांची संख्या आता पाचवर पोहोचली आहे.

३१ ऑक्टोबर रोजी शुक्रवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास शहराच्या बायपास रोडवरील लालगुडा गावाजवळ स्कोडा कार आणि ट्रक यांच्यात भीषण धडक झाली होती. या अपघातात वणी येथील गॅरेज मालक रियाजुद्दीन शेख आणि त्यांच्या तीन मुली मायरा, झोया आणि अनिबा यांचा जागीच मृत्यू झाला होता. रियाजुद्दीन यांचा धाकटा भाऊ शारिक शेख यांची कन्या इनाया ही गंभीर जखमी झाली होती. जखमी इनायाला तात्काळ नागपूर येथील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असताना शुक्रवारी रात्री तिने अखेरचा श्वास घेतला. तिच्या मृत्यूने संपूर्ण वणी शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे. शेख कुटुंबातील रियाजुद्दीन शेख आणि त्यांच्या तिन्ही मुलींचे पार्थिव शुक्रवारी रात्री १० वाजता स्थानिक मुस्लिम स्मशानभूमीत अश्रुपूर्ण वातावरणात दफन करण्यात आले. या वेळी वणी पोलिस निरीक्षक गोपाल उंबरकर यांच्यासह हजारो नागरिक उपस्थित होते. या दुर्घटनेने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून, एकाच कुटुंबातील पाच सदस्यांचा मृत्यू झाल्याने वणी शहरात दुःखाचे सावट निर्माण झाले आहे.

## संक्षिप्त

### ममता कुऱ्हाडे यांना काँग्रेसची उमेदवारी देण्याची मागणी



**खल्लार -** येणाऱ्या काही दिवसातच जि.प व पं. स. निवडणूका होणार असून दर्यापूर तालुक्यातील खल्लार जि. प. सर्कलमधून ममता सुरेश कुऱ्हाडे यांना काँग्रेस पक्षाने उमेदवारी द्यावी अशी मागणी खल्लार परिसरातील नागरिकांनी खासदार बळवंत वानखडे व दर्यापूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुधाकर भारसाकळे यांच्याकडे केली आहे.ममता कुऱ्हाडे ह्या सुरेश कुऱ्हाडे यांच्या पत्नी आहेत सुरेश कुऱ्हाडे हे गेल्या १७ वर्षापासून खल्लार सर्कल मधिल जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत कार्यरत असून त्यांचा मतदारांसोबत दांडगा परिचय आहे. खल्लार परिसरातील सर्वांशी सलोख्याचे व जिव्हाळ्याचे संबंध आहेत त्यांची काम करण्याची पद्धत व वागणूक त्यांच्या परिचयाचे गमक आहे. त्यामुळे काँग्रेस पक्ष श्रेष्ठींनी स्थलांतरित उमेदवार पेक्षा ममता कुऱ्हाडे सारख्या काँग्रेस पक्षा सोबत एकनिष्ठ व निष्ठावंत महिलेला उमेदवारी द्यावी अशी मागणी खल्लार सर्कल मधिल सर्व काँग्रेस पदाधिकारी व मतदारांनी केली.



### इंदिरा गांधी स्मृतिदिन व सरदार वल्लभभाई पटेल जयंती साजरी

**खल्लार -** दर्यापूर काँग्रेस कार्यालयात इंदिरा गांधी यांचा स्मृतिदिन व सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात काँग्रेस कार्यकर्त्यांनी भारताच्या पहिल्या महीला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त श्रद्धांजली अर्पित केली आणि सरदार पटेल यांच्या जयंती निमित्त त्यांच्या महान कार्याचा गौरव केला. यावेळी ईश्वर बुंदेले, आतिष शिरभाते,दत्ता कुंभारकर,अनिल भारसाकळे, रामेश्वर चव्हाण, जम्मूभाई पठाण, मनोज बोरेकर, इरफान इनामदार,प्रकाश चव्हाण, रामेश्वर तांडेकर, प्रयश रवाळे, अज्जू पठाण,संतोष शिंदे महेंद्र घाटे, सोनू शाह, सुशिल गुरमाळे सह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व काँग्रेस प्रेमी उपस्थित होते.



### सरदार वल्लभभाई पटेल यांना अभिवादन

**मोर्शी-** भारताचे पहिले उपपंतप्रधान लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंती व स्वर्गीय पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीचे अवचित्य साधून मोर्शी पोलीस स्टेशन व गुड मॉर्निंग फिटनेस क्लब आणि शिवाजी हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमानाने पोलीस स्टेशन च्या इमारतीत लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल व स्वर्गीय पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या फोटोचे पूजन उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या हस्ते पूजन व हार अर्पण करण्यात आले होते. त्यानंतर वॉक फॉर युनिटीला पोलीस ठाण्या पासून सुरुवात करण्यात आली होती. सदर सदभावना पदयात्रा तहसील चौक, शिवाजी हायस्कूल मार्गे जयस्तंभ चौक या मार्गाने काढण्यात आली होती. या पदयात्रेत मोर्शी पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी, पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दलाचे जवान व शिवाजी हायस्कूलचे विद्यार्थी विद्यार्थिनी, शिक्षक वर्ग तसेच गुड मॉर्निंग फिटनेस क्लबचे सदस्य, पत्रकार बंधू, नगरसेवक प्रामुख्याने पदयात्रेत सहभागी झाले होते. या पदयात्रेचा समारोप मोर्शी पोलीस स्टेशनच्या आवारात करण्यात आला.

# नेरपिंगळाईत वीज कंपनीच्या विरोधात शेतकरी रस्त्यावर

## वीजपुरवठ्याच्या लपंडावामुळे ओलिताची अडचण, दिवसा वीजपुरवठा देण्याची मागणी

**नेरपिंगळाई/ वार्ताहर**

वीज वितरण कंपनीने दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे नियमित वीजपुरवठा मिळत नाही. त्यामुळे शेतकरी त्रस्त झालेला आहे.रात्री वीजपुरवठा सुरू करण्यात येते. त्यामुळे शेतात जीव धोक्यात घालून शेतकऱ्यांना ओलित करावे लागते. त्यामुळे दिवसा वीजपुरवठा देण्यात यावा, या मागणीसाठी परिसरातील शेतकरी आक्रमक झाले असून, शेतकऱ्यांनी वीज कंपनीच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले.

सध्या नेरपिंगळाईसह परिसरातील शेतकऱ्यांना आठवड्यातील काही दिवस दिवसा तर काही दिवस रात्री वीजपुरवठा मिळतो; पण दिवसा तांत्रिक बिघाडांमुळे वीजपुरवठा वारंवार खंडित होतो. बिघाड दुरुस्तीला वेळ लागतो, कर्मचारी उपलब्ध नसतात. परिणामी शेतकऱ्यांना खाजगी लाईनमनकडूनच दुरुस्ती करून घ्यावी लागते आणि त्यासाठी मेहनताना व साहित्य खर्च स्वतःच्या खिशातून करावा लागतो. अनेक डीपी मधील विद्युत तारा लोंबकळलेल्या आहेत. अनेक डीपीमधील विद्युत साहित्य निकृष्ट दर्जाचे आहे. शेतकऱ्यांना रात्री अपरात्री फ्युज टाकायला जावे लागते. त्यामुळे प्राणहानी होण्याची शक्यता आहे. वीजपुरवठा खंडित होण्याचा हा नित्याचा क्रम असूनही वीज कंपनीचे अधिकारी याकडे गांभीर्याने घेत नाही. त्यामुळे



शेतकरी संतप्त झाला आहे.

रात्रीच्या वेळी ओलित करताना अनेक वेळा शेतकऱ्यांचे अपघात, सर्पदंश, मोटारी जळणे, विजेचा धक्का लागणे अशा घटना घडल्या आहेत. दिवसा वीज दिल्यास अशा घटना टळतील. तसेच पिकांना वेळेवर पाणी देता येईल आणि शेतीचा दर्जा सुधारेल. पण शासनाला शेतकऱ्यांच्या जीवाची, त्रासाची काहीच पर्वा न करता महावितरण शेतकऱ्यांच्या जीवावर उठले आहे. आधीच खतं, औषधं, मजुरी, डिझेल यांचे दर वाढलेले आहेत. त्यात आता वीजपुरवठ्याच्या बिघाडासाठीही खर्च करावा लागतो ! शेतकऱ्यांना मोफत वीज नको, पण नियमित आणि दिवसा वीज द्या, अशी मागणी संतप्त शेतकऱ्यांनी केली आहे. आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांशी चर्चा करण्यासाठी उपविभागीय अभियंता मोर्शी दिनेश भागवत, लेहेगाव सब स्टेशनचे अभियंता कल्पेश देवांग तसेच नेरपिंगळाईचे शाखा अभियंता कोकणे यांची उपस्थिती होती. यावेळी उपअभियंता दिनेश भागवत यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न समजावून घेऊन दिवसा विद्युत पुरवठा करण्यासंदर्भामध्ये सुरू असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली व संपूर्ण मागण्यांच्या संदर्भामध्ये येत्या दोन दिवसात लेखी माहिती आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांना देण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी राहुल मंगळे (महाराष्ट्र राज्य किसान सभा) गोपाल श्रीखंडे, प्रकाश मेंढे, प्रकाश कुहेकर, विलास खाजबागे, विजय नालट, संजय मोहकर, बाळू पोटे, मनोज कोकाटे उमेश कोकाटे, संजय सुने, निखिल वासनकर, अतुल पोटे, अंकुश डेहनकर, प्रमोद शिसट, महेंद्र शिसट, रवी वडनेरकर, अशोक देवळे, प्रभाकर टाकळे यांच्यासह शेकडो शेतकरी उपस्थित होते.

## पोटे कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने प्रेक्षक मंत्रमुग्ध

### पालखी-दिंडी कलाविष्काराने वेधले लक्ष, अकोला युवा महोत्सवात मिळवली वाहवा

**अमरावती/ क्रा.प्र.**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत नुकतेच डॉ. के. आर. ठाकरे कृषी महाविद्यालय, अकोला येथील विशाल सभागृहात युवा महोत्सवाचे भव्य आयोजन अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. या महोत्सवात पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथील प्राचार्य डॉ.अनिल ठाकरे, उप प्राचार्य नितेश चौधरी, संघप्रमुख प्रा. हेमंतकुमार पवार व डॉ. श्वेता गणवीर यांच्या समर्थ मार्गदर्शनाखाली महाविद्यालयांतील युवक-युवतींची



चमू सहभागी झाली होती.

पी. आर. पोटे कृषी महाविद्यालय, अमरावती येथील युवक-युवतींच्या चमूने या युवा महोत्सवात सहभागी होऊन एकल अभंग गायन, समूहगान, मूक अभिनय, समूह नृत्य, एकांकिका, फाइन आर्ट इत्यादी कला आविष्कारांचे उत्कृष्टरित्या सादरीकरण करून प्रेक्षकांचे लक्ष वेधले.

यांमध्ये चैताली गावंडे, सृष्टी ईटाळे, भूमिका काठे, निसर्गा कोकरे, संजना गवई, रिनू ढोरे, राधा वानखडे, सानिया तायवाडे, निकिता बहेकार, सृष्टी रुदारकर, ऋतिका सगणे, सेजल नागले, तनुश्री ठाकरे, ओम् कोरडे, रोहन वैद्य, पवन कराळे, अमन पाथरे, अंशुल हरणे, धीरज होले, पार्थ साबळे, प्रथमेश मारोटकर, गोकुल खंडार, प्रणय पिने, सोहेल शेख, अथर्व मुळे, आदित्य खंडारे व देवाशीष अंबाडकर इत्यादी युवक-युवती सहभागी झाले होते. त्यांना संगीत साथ ऋषिकेश लोखंडे, प्रज्वल वांगे व प्रज्वल हिरडे या युवकांनी दिली.तीन दिवस चाललेल्या या युवा महोत्सवात डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत सुमारे ३५ महाविद्यालयांतील युवक-युवतींच्या चमू सहभागी झाल्या होत्या. अमरावतीच्या या सहभागी सर्व युवक-युवतींचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

## टाटा एसीची दुचाकीला धडक,युवक गंभीर जखमी

**बेलोरा -** चांदूरबाजार पोलीस स्टेशन अंतर्गत निखिल सुरेश निमकर वय ३३ वर्ष राहणार सोनोरी दिनांक २३ १० रोजी दुपारी दीड वाजता सोनोरीरोड निर्मिती शाळेजवळ निखिल हा आपल्या दो चाकी ने गावाकडे जात होता सोनोरीला विरुद्ध दिशेने आरोपीची टाटा एसी क्रमांक एम एच २७ एस ४७ ९० क्रमांकाच्या टाटा एसी ने धडक दिल्यामुळे निखिल गंभीर जखमी झाला. लगेच काही लोकांनी निखिल ला ग्रामीण रुग्णालय चांदूरबाजार भरती केले त्यानंतर गंभीर असल्यामुळे



अमरावती रेफर करण्यात आले निखिल ने आज चांदूरबाजार पोलीस स्टेशनला तक्रार दिली त्याच्या तक्रारीवरून चांदुर बाजारचे ठाणेदार अशोक जाधव यांनी गुन्हा दाखल केला आहे पुढील तपास हेड कॉन्स्टेबल रोशन चव्हाण कोमल ठाकूर करीत आहे

## जिल्हा परिषदेतील १४४ कामांना मान्यता

**अमरावती/ क्रा.प्र.**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचा नोव्हेंबर महिन्यात बिगुल वाजण्याची शक्यता आहे. या निवडणुकीच्या आचासंहीमुळे दोन ते अडीच महिने कामांना ब्रेक लागण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने आतापर्यत सुमारे ३४ कोटी ५३ लाखांच्या १४४ कामांना मान्यता दिली प्रशासकीय आहे. त्यामुळे आता निविदा प्रक्रिया आणि कार्यारंभआदेशानंतरच प्रत्यक्षात कामांना सुरूवात होणार आहे.

जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाला ग्रामिण मार्ग, इतर जिल्हा मार्ग व तिर्थक्षेत्र या लेखाशिर्षातंर्गत ४४ कोटी २२ लाखांचे नियोजन केले होते. यामधून ग्रामिण रस्त्यासाठी २१ कोटी १९ लाखांच्या ६४ कामांना प्रशासकीय मान्यता दिल्या. जिल्ह्यातील ग्रामिण भागात बांधकाम विभागामार्फत ३४ कोटी ५३ लाखाच्या निधीतून होणार विविध कामे आहेत. इतर जिल्हा मार्गाकरिता ६ कोटी ६४ लाखांचे नियोजनातील ५ कोटी ३५ लाखांच्या १४ कामांना व तिर्थक्षेत्राच्या ८ कोटी ३० लाखांचे नियोजनापैकी असताना ७ कोटी ९९ लाखांच्या ६६ कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. अशाप्रकारे ३४ कोटी ५३ लाखांच्या १४४ कामांच्या प्रशासकीय मान्यता डीपसीसीकडे पाठविले आहे. त्यामुळे प्रशासनाने नियोजन केले आहेत.

## श्री विठ्ठल रूख्मिणी मंदिरावर एकादशी पर्वावर भाविकांची दर्शनासाठी गर्दी

**कुऱ्हा/ वार्ताहर**

विदर्भाची पंढरी आई रूक्मिणी मातेचे माहेर अशा प्राचीन पुरातन श्री तीर्थक्षेत्र असलेल्या कौंडण्यपूर येथील श्री विठ्ठल रूक्मिणी संस्थान मध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कार्तिक मास सोहळा सकाळी ६ वा.कलश स्थापना व मुख्य देवतेला अभिषेक बाळासाहेब पावडे अध्यक्ष श्री संत लहानुजी महाराज संस्थान टाकरखेडा यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी नामदेवराव अमाळकर अध्यक्ष श्री विठ्ठल रूक्मिणी संस्थान श्री क्षेत्र कौंडण्यपूर यांची उपस्थितीत विधिवत पूजेने करण्यात आली. श्री ची महापूजा विजयराव डहाके



व परिवार यांचे हस्ते विधिवत पूजा करण्यात आली.तसेच श्री ची महापूजा दिनेश भुसारी आर्वी यांचे हस्ते करण्यात आली.तर दि.२ नोव्हेंबर ला प्रबोधिनी भागवत एकादशी पंढरपूर यात्रा सकाळी ६ वा.'श्री' ची महापूजा जयनारायण चांडक व परिवार आर्वी यांचे हस्ते होणार आहे.आणि दुपारी १२ वा.एकादशी निमित्त वारकरी भजनाचा नेहमीप्रमाणे कार्यक्रम होईल.नंतर दुपारी २ वा.एकादशी निमित्त फराळाचा महाप्रसाद जयनारायण चांडक व परिवार आर्वी यांचे तर्फे करण्यात येणार आहे.तरी भाविकांची दर्शनासाठी एकच गर्दी होणार आहे याकरिता संस्थान तर्फे सर्व व्यवस्था करण्यात आली असून येणाऱ्या भाविक भक्तांनी मंदिरामध्ये दर्शनाचा शांततेत लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष व विश्वस्त मंडळ श्री विठ्ठल रूक्मिणी संस्थान श्री क्षेत्र कौंडण्यपूर यांनी केले आहे.

## विद्यापीठात मंगळवारी व्याख्यानमाला

**अमरावती/ का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त ४ नोव्हेंबर, २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्र येथे व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते भूषविणार असून 'धम्मचक्र प्रवर्तनाची वर्तमान काळातील प्रासंगिकता' या विषयावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. पुरण मेश्राम हे अभ्यासपूर्ण व्याख्यान देणार आहेत.

प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू यांची याप्रसंगी प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.तरी आयोजित व्याख्यानमालेचा सर्वांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड यांनी केले आहे.

## महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या विभागीय बैठकीत निवडणुकीबाबत चर्चा

**अंजनगाव बारी/ वार्ताहर**

अमरावती येथील शासकीय विश्रामगृहात महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्या, संघटनात्मक प्रश्न तसेच आगामी अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीचा आढावा व दिशा या दोन्ही विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

बैठकीचे अध्यक्षस्थान मुंबई शिक्षक आमदार व महाराष्ट्र राज्य



शिक्षक सेनेचे राज्याध्यक्ष ज. मो. अभ्यंकर यांनी भूषवले, तर खाजगी विभाग अध्यक्ष रुपेश टाले यांच्या नेतृत्वाखाली विभागातील पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत आगामी शिक्षक मतदारसंघ निवडणुकीसंदर्भात संघटनेच्या तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.मतदार नोंदणी, जनजागृती मोहिमा, आणि शिक्षकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी कृती आराखडा ठरविण्यात आला. बैठकीत पुढील ठराव करण्यात आले विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये शिक्षक मतदार नोंदणी शिबिरे आयोजित केली जातील. जनजागृती आणि संपर्क मोहिमा सोशल मीडिया तसेच प्रत्यक्ष शिक्षक भेटीद्वारे राबविण्यात येतील. प्रचार समित्या व संपर्क अधिकारी नियुक्त करून निवडणुकीसाठी प्रभावी समन्वय साधला जाईल. या चर्चेदरम्यान शिक्षक सेनेने एकमताने ठरविले की आगामी निवडणुकीत शिक्षकांच्या हितासाठी ठोस आणि सकारात्मक भूमिका घेण्यात येईल.या बैठकीस पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्रा. नरेंद्र लखाडे, प्रा. प्रवीण राठोड , सुधाकर भाकरे, सुरेशजी चिमणकर, अनिल कोल्हे, राजाभाऊ राजणकर, आदित्य राऊत, तसेच अमरावती विभागातील सर्व जिल्हाध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.बैठकीचा समारोप शिक्षक हितासाठी एकजूट व सातत्यपूर्ण संघर्षाची हमी देत करण्यात आला.

## युवक महोत्सवात श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयाचा दबदबा

### विविध कला प्रकारात विद्यार्थ्यांचा सहभाग



**अमरावती/ का.प्र.**

अकोला येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यात श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीद्वारा संचालित श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय, अमरावतीच्या विद्यार्थ्यांनी यशस्वी सहभाग घेतला.

महाविद्यालयाचे विद्यार्थी लोकनृत्य, एकल गीत, समूह गीत, पाश्चात्य समूह गीत, मूकनाट्य, प्रहसन, एकल नाट्य, एकांकिका, प्रश्नमंजूषा, वक्तृत्व कला व रांगोळी या कलाप्रकारात सहभागी झाले होते. युवक महोत्सवात निखिल इंगोले, लोकेश टूनुकले, अथर्व देशमुख, प्रज्वल राऊत, रायबा ठाकरे, वेदांत गावंडे, मनीष गोरे, प्रतीक्षा गोरेलू, गायत्री कोहळे वेदांती शेजोळे, संजुक्ता देशमुख, इंद्रायणी खराडे, प्रांजली इंगळे, कोमल बोरीवार, खुशी उपरीकर, साक्षी धुमाळे, समीक्षा भिसे, आर्या काळबांडे, सृष्टी सरोदे, आदिती सोनवणे, शर्वरी निंघोट हे विद्यार्थी सहभागी झाले होते. या सर्व कलाप्रकार मूकनाट्य, भारतीय लोकसमूह गान, तसेच वेळेवर छायाचित्रण मध्ये महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला आहे आणि रंगमंच या कला प्रकारात विजेतापद भूषविले आहे.

महाविद्यालयातर्फे या युवक महोत्सवाच्या यशस्वी मेकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य चंद्रशेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनात जिमखाना अध्यक्ष प्रा. शेखर बंड, युवक महोत्सव प्रभारी सौ. कल्पना पाटील, सौ. शीतल चितोडे, मयूर गावंडे, विशाल तराळ, प्रशांत ठाकरे व गौरव गजभिये यांनी अथक परिश्रम घेतले.

# वरूड, मोर्शी आगाराला मिळाल्या पुन्हा १० लालपरी

## आ.यावलकर यांच्या प्रयत्नातून दोन्ही आगारातील बसफेऱ्या सुरळीत!

**वरूड/ वार्ताहर**

वरूड व मोर्शी तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांकडून तसेच विद्यार्थ्यांकडून वारंवार बसफेऱ्या सुरळीत सुरू करण्याची मागणी जोर धरत होती. परंतु दोन्ही आगारातील बसेसची संख्या कमी असल्याने प्रवाशांना व विद्यार्थ्यांना कमी बसफेऱ्यामुळे मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत होता. त्यामुळे आमदार चंदु उर्फ उमेश यावलकर यांनी जानेवारी महिन्यामध्ये परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची मंत्रालयीन कामकाजावेळेत भेट घेत वरूड व मोर्शी आगारात कमी बसेस असल्याचे निदर्शनास आणुन दिले.

त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना व शाळकरी विद्यार्थ्यांना वेळेवर बस उपलब्ध होत नसल्याने तसेच वेळेवर ऑटोरिक्षा, खासगी बस, टॅक्सी



उपलब्ध होत नसल्याने मानसिक व आर्थिक त्रास सोसावा लागत होता. त्यामुळे दोन्ही आगारातील बसेसचा कोठा पुर्ण करण्यासाठी वाढीव बसेसची मागणी आ.यावलकर यांच्याकडून करण्यात आली होती. या मागणीनुसार परिवहन मंत्रालयाकडून २३ मे रोजी वरूड आगाराला ५ व मोर्शी आगाराला ५ अशा एकुण १० नव्या लालपरी देण्यात आल्या होत्या. त्याचे लोकार्पण आ.यावलकर यांच्या हस्ते करण्यात आले होते. उर्वरित वरूड आगाराकरिता ५ व मोर्शी आगाराकरिता ५ अशा एकुण १० लालपरी आगाराला प्राप्त झाल्याची माहिती वरूड आगार प्रमुख आकाश तागडे व मोर्शी आगार प्रमुख आशा वासनिक यांनी दिली. या नव्याने दाखल झालेल्या लालपरीमुळे दोन्ही तालुक्यातील सर्व सामान्य प्रवाशांना व शाळकरी विद्यार्थ्यांना कायमस्वरूपी दिलासा मिळाल्याने त्यांनी आ.यावलकर यांचे आभार मानले आहे.

# सर्व सामान्यांचे श्रध्दास्थान 'पंढरीचा विठ्ठल'

कोट्यावधी हिंदू भाविकांचे आराध्य दैवत म्हणजे पंढरपूरचा 'विठोबा' आहे. कोट्यावधी लोक पंढरीला जातात, डोळे भरून विठ्ठलाला पाहतात, त्याचे ते रूप डोळ्यात मनात साठवतात आणि तृप्त होतात. अगदी भाकरी भाजीचा नैवेद्य खाऊन तृप्त होणारा हा देव सर्व कष्टकऱ्यांचे उपास्य दैवत आहे. विठ्ठल हे विष्णूचे रूप आहे, असे सर्वत्र मानले जाते.

'विठ्ठल' पंढरपुरात कसे स्थिरावले याबाबत एक कथा सांगितली जाते.पुंडलिक नावाचा एक विठ्ठलाचा भक्त होता. तो आपल्या आई-वडिलांची मनःपूर्वक नित्य सेवा करीत असे. त्यांचे हात पाय चेपित असे. हे सर्व करत असताना तो सतत विठ्ठलाचे नाम स्मरण करत असे. विठ्ठल पुंडलिकाचे भक्तीवर प्रसन्न झाले व त्याला दर्शन देण्यास आले. तेव्हा पुंडलिक आई-वडिलांचे पाय चेपत होते व त्यांना त्या च्या सेवेत खंड पडू नये म्हणून पुंडलिकाने एक विट पांडुरंगासाठी-विठ्ठलासाठी बसण्यासाठी सरकविली व तेव्हापासून विठ्ठल त्या विटे वर उभा असल्याचे सांगितले जाते.तर काही तज्ज्ञांच्या मते, रुख्मिणी णीचा रुसवा काढण्यासाठी श्रीकृष्णाने पंढरपूरमध्ये विठ्ठलाचे रूप घेतले, असेही कथेव्दारा सांगितले जाते. आणि म्हणूनच पंढरपूरचा 'विठ्ठल' उर्फ 'विठोबा' ऊर्फ 'पांडूरंग' म्हणजे विष्णू व श्रीकृष्णाचा अवतार आहे.असे मानल्या जाते व विष्णू प्रिय कृष्णप्रिय तुळशीच्या मजिरीचा हार व बुक्का असा साधा पूजाविधी विठ्ठल स्विकारतो. नैवेद्याला भाकरी व अंबाडीची भाजी असली की विठ्ठल तृप्त होतो. पंढरपूरचा विठोबा विटेवर उभा आहे म्हणूनच त्याला 'विठ्ठल' म्हटल्या जाते. पंढरपूरच्या मंदिराची एक विशेषतः म्हणजे विठ्ठल व रुख्मिणीची वेगवेगळ्या स्थानी स्वतंत्र अशी स्थापना आहे. एका कथेनुसार विठ्ठल सतत भक्तांच्या भक्तीने भक्तांमध्येच रममाण झालेले असायच त्यामुळे रुख्मिणी त्यांचेवर रुसून पंढरपूरातू आली. तिला शोधन विठ्ठल पंढरपूरला पोहोचले, पण रुख्मिणी अगोदर त्यांना भक्त पुंडलिकाचे दर्शन झाले व त्यानी दिलेल्या विटेवरच स्थिरावले. म्हणून मंदिराचे एका बाजूला 'विठ्ठल' तर, दुसऱ्या बाजूला माता रुख्मि णीचे दर्शन आपल्याला घडते.

विठ्ठल शब्द हा 'वीट आणि ठलं(स्थळ) या दोन शब्दांच्या संचाने बनला आहे. विठ्ठल विटेवर उभा आहे. त्याचे रूप विलोभनीय आहे. त्याचे हात कमरेवर आहेत महाराष्ट्र आणि कर्नाटकातील लोकांच्या हृदयात विठ्ठल रुख्मिणी चे खास स्थान आहे वारी करणाऱ्या व्यक्तीस वारकरी असे म्हणतात. भगवान विष्णूचा अवतार असलेल्या पांडुरंगाचे विठ्ठलाचे हे भक्त असून कपाळावर अष्टगंध व बुक्का हातात भगवे निशाण, टाळ, चिपळ्या मृदंग व मुखामध्ये विठ्ठल एवढी साधी सरळ यांची भक्ती असतेअठरा पगड जातीचे लोक विठ्ठलाचे निस्सीम भक्त होऊन 'संत' उपाधी मिळवून अजरामर झालेत. विठ्ठल





मंदिरातील पुजाऱ्यांना 'बडवे' म्हणतात. दर एकादशीला लाखो लोक पंढरपूरला जाऊन आपली 'वारी' पूर्ण करतात.इसवी सन ५१६ मध्ये सापडलेल्या ताम्रपटावरून पंढरपूरचा आणि त्याच्या आसपास असणाऱ्या काही गावांचा उल्लेख आढळतो त्यातच देवळाचा लहान माडू देऊळ) उल्लेखही नंतरच्या काही शिलालेखांमध्ये पहायला मिळतो. विशेषतः बाराव्या शतकात सापडलेल्या ८४ वा लेख हा शिलालेख सध्याच्या मंदिराबाहेर उत्तरेकडील भिंतीवर आहे. भाविक त्याला पाठ घासून मगच देवळात प्रवेश करतात. यामुळे हा शिलालेख झिजून गेला आहे. गाभारा अंतराळ आणि सभामंडप हे आताच्या देवळाचे मुख्य घटक आहेत. सभामंडपाच्या सोळा खांबापैकी एकाला चांदीचे आवरण चढविले आहे त्यालाच 'गरुडस्तंभ' असे म्हणतात. विठ्ठल हे महाराष्ट्रासोबतच कर्नाटक आणि मध्य आंध्र प्रदेशातील भाविकांचेही दैवत आहे. कानडू हो विठ्ठलु कर्नाटकू या ओळीमुळे विठ्ठलाचा कर्नाटकाशी असलेला संबंध सूचित होता. हम्पि मध्ये एक भव्य विठ्ठल मंदिर आहे. जे विजयनगर साम्राज्याच्या स्थापत्य कलेचा एक भाग आहे. विजयनगरच्या कृष्णदेवरायाने भक्तीसाठी विठ्ठलाची मूर्ती आपल्या राज्यात नेली होती. पण ती मूर्ती एकनाथांचे पणजोबा भानुदास यांनी परत आणली. सोळखांबी मंडपात त्यांची समाधी असून आत जाताना उजव्या हाताच्या पहिल्या पादुका हिच त्याची समाधी होय. स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने विचार केला तर जीर्णोदार करण्यात आलेले पांढरंगाचे मंदिर हे १६, १७ आणि १८ व्या शतकातील बांधकामअसावे असा जाणकारांचाअंदाज आहे. असे असले तरी मूळ मंदिराचे १२ व्या शतकातले अवशेष अजूनही तिथे आढळतात १९४६ मध्ये साने गुरुजींनी पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरिजनांना प्रवेश मिळावा म्हणून उपवास केला व तेंव्हा पासून हरिजनांना मंदिर दर्शनासाठी खुले झाले. आजही विठ्ठलदर्शनाने मनशांती मिळते. विठ्ठल दिसताच अक्षरशः अंगावर रोमांच उठतात. डोळे पाणवतात धन्य ती विठ्ठल माऊली. पण दुःखाची गोष्ट अशी की, मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी रांगेत लागण्यासाठी असलेल्या वाटेवर नदी किनारी अतिशय घाण विखुरलेली असते. आपणभेटीसाठी आलेल्य भक्तांनीच भक्तांनी पंढरपूरच्या मंदिर परिसराबाहेर स्वच्छता ठेवल्यास मला वाटते खऱ्या अर्थाने विठ्ठलाला ती सेवा अर्पण होईल.

**डॉ. ललिता देशमुख**
अम-७०३८४८१७००

# वैकुंठ चतुर्दशीचे महत्त्व!

कार्तिक शुक्ल चतुर्दशीला 'वैकुंठ चतुर्दशी' म्हणतात. याविषयी पुराणात एक कथा आहे.वाराणसीच्या मणिकर्णिका तीर्थावर भगवान श्रीविष्णू सहस्र कमळांनी श्रीविश्वेश्वरांची पूजा करत बसले असता, त्यांच्या भक्तीची परीक्षा घेण्यासाठी भगवान शंकरांनी त्यातील एक कमळ लपवले. श्रीविष्णूंना ते लक्षात येताच, पूजेत उणीव राहू नये म्हणून त्यांनी स्वतःचे नेत्रकमल अर्पण करून सहस्र कमळे वहाण्याचा संकल्प पूर्ण केला. त्यांच्या भक्तीवर प्रसन्न होऊन भगवान शंकरांनी श्रीविष्णूंना त्रैलोक्याचे राज्य दिले आणि वर मागण्यास सांगितले. तेव्हा श्रीविष्णूंनी 'राक्षसी शक्तीचा निःपात करण्यासाठी, लोकांना छळणाऱ्या दैत्य व राक्षसांचा नाश माझ्या हातून व्हावा.' असा वर मागितला. तेव्हा भगवान शंकरांनी त्यांना सुदर्शनचक्र प्रदान केले आणि वर दिला,'कार्तिक शुक्ल चतुर्दशीला जे ध्यान करून मणिकर्णिकेत स्नान करतील, त्यांना वैकुंठप्राप्ती होईल.'तेव्हापासून या दिवसाला 'वैकुंठ चतुर्दशी' असे म्हणतात.केवळ या दिवशी शंकरांना १०८ तुळशीची पाने आणि श्रीविष्णूंना १०८ बेलपाने वाहिली जातात.



वैकुंठ चतुर्दशीचे महत्त्व असे आहे की, या दिवशी सर्व भक्तांसाठी वैकुंठाचे द्वार खुले असते. जो भक्त या दिवशी थोडीशीही विष्णुभक्ती करतो, त्याला वैकुंठधामात स्थान मिळते, अशी श्रद्धा आहे.पृथ्वीवरील वैकुंठधाम म्हणजे बद्रीनाथ, रामेश्वरम्, द्वारकापुरी आणि जगन्नाथपुरी! सत्ययुगात बद्रीनाथ धामाची स्थापना साक्षात् भगवान नारायणांनी केली.त्रेतायुगात रामेश्वरम् स्वयं भगवान श्रीरामांनी स्थापन केले.द्वापरयुगात द्वारकापुरीची स्थापना भगवान श्रीकृष्णांनी केली.आणि कलियुगात जगन्नाथ धामालाच वैकुंठधाम म्हटले आहे.भगवंताचे पाचवे धाम म्हणजे भक्ताचे हृदय! एका भक्ताला भगवंत भेटीची जितकी आस असते, तितकीच आस भगवंतालाही आपल्या भक्ताच्या भेटीची असते. म्हणूनच, भगवंताच्या भेटीसाठी आतुर होऊन आपल्या हृदयात भक्तीची ज्योत सतत तेवत ठेवू या.

**रेणुका हरदास**
नागपूर

# जीवनाची समृद्धता : कार्तिकी एकादशी



शेकडो वर्षे पंढरपूरच्या विठूमाऊलीच्या महाद्वारामध्ये लाखो भक्त अलौकिक सुखाचा अनुभव घेत आले आहेत. महाराष्ट्राच्या मातीमध्ये जन्माला आलेल्या संतांच्या विभूतीने भागवतधर्माचा जो काही आनंदकल्लोळ केला त्यातून समाधानाच्या आनंदाचे निदान सापडले. आणि ते आजही तसेच टिकून आहे. ज्या जागेपणी हा सुखाचा सोहळा अनुभवायचा असतो. तीच आजची प्रबोधन एकादशी आहे. आषाढातल्या देवशयनी एकादशीला देव झोपतात. आणि कार्तिकातल्या प्रबोधिनी एकादशीला ते जागे होतात. अशा प्रकारची विठलभक्तांची श्रद्धा आहे. परंतु ज्या काळात देव झोपतो. त्याच काळात भक्तांनी जागे राहायचे असतात. कदाचित म्हणूनच आषाढी ते कार्तिकीच्या चातुर्मासामध्ये अनेक विठ्ठल भक्तांचा पंढरीमध्ये निवास असतो. महाराष्ट्रातल्या अनेक गावागावांमध्ये अश्विन ते कार्तिक पौर्णिमेपर्यंत काकडा आरती चा परिपाठ पाहायला मिळतो. देवाचे झोपणे किंवा जागे होणे हा भक्तांच्या परमेश्वरावरील प्रेमाचा उत्तुंग असा कल्पना विलास म्हणावा लागेल. कारण कार्तिकी एकादशीला प्रबोधिनी हा शब्द वापरून भक्तांनी स्वतःच्याच प्रबोधनाचा वसा मात्र कायम ठेवलेला दिसून येतो. आषाढीची महिनाभराची वारी त्यानंतर आपापल्या घरी आलेले वारकरी प्रपंचामध्ये रममाण जरी होत असले तरी विठ्ठलाच्या साक्षीने जागवलेला हा परमार्थ तसाच पुढे चालू ठेवायचा आहे. ही जाणीव त्यांच्या मनामध्ये असते. त्याचे आपल्याला विस्मरण होऊ नये या एकाच श्रद्धेपोटी हा भगवदभक्त पुन्हा पुन्हा त्या पंढरीच्या महाद्वारावर जाऊन आपल्या भागवतभक्तीच्या अधिष्ठानाचे आवर्तन करीत असतो. कोणी काहीही म्हणो. परंतु महाराष्ट्राला मिळालेली ही भागवत धर्माची देणगी विलक्षण स्वरूपाची आहे. कोणतेही मोठे खर्चिक बडेजाव न मिरवणारे किंवा पुस्तकी पांडित्याचे प्रदर्शन करणारे शिक्षण न घेता कोट्यवधी लोकांमध्ये सदविचारांचा वसा टिकविण्याचे काम या भागवतधर्माने केलेले आहे. ज्ञानेश्वर, माऊली, जगदगुरु तुकाराम महाराज, नामदेव महाराज, जनाबाई, मुक्ताबाई अशी ही संत विभूतींची मांदियाळी म्हणजे भगवंताने महाराष्ट्राला प्रेमाने भक्तीचा अलंकारच दान दिल्यासारखे म्हणता येईल.

एकादशीसंदर्भामध्ये असेही सांगितले जाते की मनुष्याला आपल्या अकरा इंद्रिय म्हणजेच एकादश इंद्रियांवर नियंत्रण ठेवता यावे म्हणून या दिवशी उपवासाचे महत्व समाजमनावर बिंबवण्याचा हेतू दिसून येतो. दर महिन्याच्या एकादशीमधून जर असा संयम ठेवण्याचा विचार वारंवार बिंबवला जात असेल तर त्याचे नक्कीच चांगले परिणाम दिसून येतात. महाराष्ट्रातला समस्त वारकरी समाज या एकादशीचे अतिशय निष्ठेने पालन करतो. आज पिढ्यानपिढ्या अनेक घरांमध्ये वारीबरोबर या एकादशीचा उपवासही केला जातो. आजच्या शिकल्या सवरलेल्या मंडळींना या गोष्टीचे तितकेसे महत्व वाटणार नाही. कारण मुळात त्यांची या गोष्टीवर श्रद्धाच नसल्यामुळे ते त्यामागे असलेला जीवनमूल्यांचा मोठा संदर्भही लाखात घेऊ शकत नाहीत. व्यक्ती किंवा समाज असो या सर्वांना जर सुखी आणि समृद्ध ठेवायचे असेल तर अशा प्रकारचे निमित्ताने साधले जाणारे औचित्य महत्वाचे ठरतात. किंबहुना ते वारंवार सांगण्याची आवश्यकता भासू लागते. कारण अशा उपासनेतून विनम्रता अंगिकारता येते. ज्या ज्यावेळी पंढरपूरच्या पांडुरंगाचा किंवा एकादशीचा संबंध येतो त्यावेळी भक्तीमधले सातत्य आणि ते जपण्यासाठी केला जाणारा पिढ्यानपिढ्याचा आटोकाट प्रयत्न विशेषत्वाने समोर येतो. आजची प्रबोधिनी किंवा कार्तिकी एकादशीचासुद्धा याच दृष्टिकोनातून विचार केला पाहिजे. महाराष्ट्रातल्या संतांनी आपल्या या अनुभवातूनच समाजाला समृद्ध करणारे अभंग लिहिले.

**प्रा. मधुकर चुटे**
नागपूर
९४२०५६६४०४

# तुळशी विवाह प्रथेमागील व्यापक दृष्टिकोन !

भारतात कार्तिक शुद्ध एकादशी ते कार्तिक पौर्णिमा या कालावधीत घरोघरी तुळशी विवाह लावण्याचा प्रघात आहे. यंदा हा योग २ ते ५ नोव्हेंबर दरम्यान असणार आहे. बहुतांश ठिकाणी द्वादशीला तुळशी विवाह केले जातात. कार्तिक शुद्ध एकादशीला प्रबोधिनी एकादशी असेही म्हणतात. या दिवशी श्री विष्णू निद्रावस्थेतून जागृत होतात आणि चतुर्मास संपतो. श्री विष्णूंच्या जागृतीचा जो उत्सव करतात त्याला प्रबोध उत्सव असे म्हणतात. त्याचाच एक भाग म्हणून तुळशी सोबत श्री विष्णूंचा विवाह लावला जातो. तुळशी विवाहानंतर देशभरात नियोजित विवाह लागायला सुरुवात होते. तुळशी विवाहला श्री महालक्ष्मी आणी श्री विष्णूंच्या विवाहाचे प्रतीक मानले जाते.

तूलशी विवाह हे एक व्रत मानले गेले आहे. हे व्रत करणाऱ्याला कन्यादानाचे फल मिळते असे मानले जाते. घरच्या कन्येस श्रीकृष्णासारखा आदर्श वर मिळावा यासाठीही दारात तुळशी विवाह करण्याची प्रथा आहे. त्यामुळे भारतात अनेक ठिकाणी घरोघरी तुळशी विवाह केले जातात. हिंदू धर्मात तुळस ही अत्यंत पवित्र मानली जाते. त्यामुळे प्रत्येकाच्या दारात ती पाहायला मिळते. भगवान शिवाचाच अंश असलेला जालंधर नावाचा राक्षस त्याच्या अमाप शक्तीने उन्मत्त झाला होता. सर्व देवांसह इंद्रालाही त्याने पराभूत केले. त्याने विष्णू लोकावर आक्रमण करण्याचा प्रयत्न केला; मात्र देवी महालक्ष्मीने त्याला आपण बहीण भावासारखे आहोत हे समजावल्यावर त्याने कैलासावर आक्रमण करून देवी पार्वतीला पत्नी बनवण्याची योजना आखली. ज्यामुळे देवी पार्वती क्रोधीत झाल्या आणि श्री महादेवांना जालंधरशी युद्ध करण्यासाठी सिद्ध व्हावे लागले. जालंधरची पत्नी वृंदा ही पतिव्रता असल्याने तिच्या पातिव्रत्य धर्मामुळे जालंधरला शक्ती मिळत होती. परिणामी महादेवांनाही त्याला पराभूत करता येत नव्हते, जालंधरला पराभूत करण्याचा एकमेव मार्ग त्याच्या शक्तीचा स्रोत तोडणे हाच होता. अखेर



भगवान श्रीविष्णूंनी जालंधरचे मायावी रूप घेतले आणि ते वृंदाच्या घरी गेले. जालंधरला पाहिल्यावर ती त्याच्याशी त्याच्या पत्नीप्रमाणे वागू लागली. जालंधरच्या रूपात त्यावेळी भगवान श्री विष्णू असल्याने वृंदाचे पातिव्रत्य भंग पावले ज्यामुळे महादेवांना जालंधरचा वध करता आला, वृंदाच्या जेव्हा हे लक्षात आले तेव्हा तिने क्रोधीत होऊन श्री विष्णूंना श्राप दिला, 'ज्या प्रकारे छळ करून तुम्ही मला पती वियोग दिला आहे त्याचप्रमाणे तुमच्याही पत्नीचे छळपूर्वक हरण होऊन स्त्री वियोग सहन करण्यासाठी तुम्हाला मृत्यू लोकात जन्म घ्यावा लागेल'. पुढे श्री राम अवतारात श्रीविष्णूंना माता सीतेच्या रूपात पत्नीवियोग सहन करावा लागला. वृंदा पतीसोबत सती गेली. ज्या जागी ती सती गेली त्या जागी तुळशीचे रोप उत्पन्न झाले. ही तुळस श्रीविष्णूंना अत्यंत प्रिय आहे. एका कथेनुसार वृंदाने श्री विष्णूंना श्राप देऊन शाळीग्राम बनवले. त्यामुळे तुळशी विवाहाच्या दिवशी तुळशीसोबत श्री विष्णूचे रूप म्हणून शाळिग्राम ठेऊन त्यांचे लग्न लावले जाते. तुळशीविना श्री विष्णूची किंवा शाळीग्रामची पूजा कधीच पूर्ण होत नाही. तुळस म्हणजे आपल्या घरातील कन्याच आहे या भावाने तिचे लग्न लावले जाते. दारातील तुळशी वृंदावनाला किंवा कुंडीला गेरू आणि चुन्याच्या साहाय्याने रंगरंगोटी केली जाते. कुंडीत बोर, चिंच, आवळा, सिताफळ, कांद्याची पात ठेवतात. दारात आणि अंगणात रांगोळी काढली जाते. कुटुंबातील कर्ता पुरुष तुळशीची आणि श्रीकृष्णाच्या मूर्तीची पूजा करतो. नंतर त्यांना हळद व तेल लावून मंगल स्नान घातले जाते. तुळशीला आणि श्रीकृष्णाच्या मूर्तीला बाशिंग बांधले जाते. तुळशीला नवीन वस्त्र पांघरतात आणि त्यावर मांडव म्हणून उसाची अथवा धांड्याची खोपटी ठेवतात. काही जण तुळशीच्या रोपट्याला साडी देखील नेसवतात.तुळशीला नवरीसारखे सजवण्यात येते. तिला साडी, चोळी, नथ, सोन्याचे दागिने घालतात. सोन्याचे मंगळसूत्र, चांदीची जोडवी घालतात. बाळकृष्ण आणि तुळस या दोघांमध्ये अंतरपाट धरून मंगलाष्टके म्हणून त्यांचा विवाह लावला जातो. घरातील स्त्री तुळशीची ओटी भरते. तुळशीची आणि श्रीकृष्णाची आरती केली जाते. गोडाचा नैवेद्य दाखवला जातो. बऱ्याच ठिकाणी प्रसाद म्हणून ऊस आणि चुरमुरे वाटले जातात. गोवा, दीव आणि दमण येथे तुळशी विवाह सार्वजनिकरीत्या साजरा केला जातो. तुळशीची आणि बाळकृष्णाची वाजत गाजत सरकारी इतमामात मिरवणूक काढली जाते.

तुळस भारताच्या सर्व प्रांतात आणि सर्व वातावरणात उगवणारी वनस्पती आहे. तुळस केवळ पूजनीय आहे म्हणून ती दारासमोर लावली जात नाही, तर तिचे अनेक आयुर्वेदिक गुणधर्मही आहेत. तुळस नेहेमी सकारात्मक ऊर्जा प्रक्षेपित करत असते हे शास्त्रीयदृष्ट्याही सिद्ध झाले आहे. ज्या घराच्या दारात तुळस असते त्या घरात आजारपण कमी येते असे म्हटले जाते. हिंदू धर्मात तुळशीला अनन्यसाधारण महत्व आहे. तुळशीला पापनाशिनी असेही म्हटले जाते. तुळशीचे वन असलेल्या परिसरातील कोसभर भूमी गंगेसारखी पवित्र बनते असा संदर्भ स्कन्दपुराणात आढळतो. तुळशीच्या वनस्पतीत मुळापासून अग्रापर्यंत सर्व देवता वास्तव्य करतात', असे म्हटले जाते. देवाला नैवेद्य दाखवतांना तुळशीच्या पानांचा वापर केल्याने नैवेद्य देवतेपर्यंत लवकर पोहोचतो तसेच तो अधिक सात्विक बनतो. श्वासाची दुर्गंधी घालवण्यासाठी तुळस अत्यंत उपयुक्त आहे. यासाठी सकाळी आणि सायंकाळी तुळशीची एक ते दोन पाने चघळावीत. तुळशीची ताजी पाने प्रतिदिन खाल्याने शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढते. शरीरातील टॉक्सिस बाहेर काढून फुफ्फुसांची कार्यक्षमता वाढवण्याचेही कामही तुळस करते. सर्दीमुळे कफ़, खोकला झाल्यास त्यावर तुळस अत्यंत गुणकारी आहे. सर्दीसाठी काढा बनवताना त्यामध्ये तुळशीची पाने टाकावीत. मासिक पाळी अनियमित येण्याच्या समस्येमध्येही तुळस खाणे लाभकारक आहे. स्मरणशक्ती वाढीसाठी लहान मुलांना तुळशीची २-३ पाने नियमित खायला द्यावीत. तुळशीमधील विषाणूनाशक गुणधर्मामुळे जखम लवकर बरी होण्यासाठी तुळस तुरटीमध्ये मिश्र करून लावली जाते. तुळशीच्या सेवनामुळे मेंदूला ऊर्जा मिळते त्यामुळे डोकेदुखीच्या समस्येतही तुळस लाभदायक आहे. तुळशीच्या नियमित सेवनाने शरीरातील ऊर्जा संतुलित राहते परिणामी ताण तणावांपासूनही मुक्ती मिळते. असे एकना अनेक लाभ तुळशीपासून मिळतात. दर वर्षी दारात तुळशीचे लग्न लावावे असा हिंदू धर्मात प्रघात आहे. त्यामागे कथेची जोड असली तरी लग्न लावण्यासाठी का होईना प्रत्येक कुटुंबाने आपल्या दारासमोर तुळशी वृंदावन करून त्यात तुळस लावावी आणि वर्षभर तिचे पोषण करावे हा यामागील हेतू असावा. कारण त्यायोगे घरात प्राणवायूसह सकारात्मक ऊर्जेचा स्रोत येत राहावा, तुळशीच्या पानाच्या नियमित सेवनाने लहान सहन आजार दूर राहावेत, कुटुंबातील सर्वांची प्रकृती सुदृढ राहावी. कुटुंबाचे आरोग्य सुरक्षित राहावे जेणेकरून कुटुंबात सुख, समाधान आणि शांती कायम टिकून राहील. आपल्या प्राचीन ऋषी मुनींचे संशोधन किती उदात्त आणि अत्युच्च पातळीचे होते हे या एका उदाहरणावरून आपल्या लक्षात आले असेल.

**जगन घाणेकर,**
घाटकोपर, मुंबई
मो. ९६६४५५९७८०

# वारीचे माहात्म्य !

महाराष्ट्रातील सर्वात मोठा लोकोत्सव म्हणजे पंढरीची वारी. दरवर्षी आषाढी - कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने देशभरातून लाखो वारकरी पंढरपुरात दाखल होतात. आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी । संत नामदेव महाराजही आपल्या अभंगात सांगतात, जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर ! पृथ्वीवरील केवळ दोनच तीर्थक्षेत्रे नाश न पावणारी आहेत. एक म्हणजे काशी आणि दुसरे म्हणजे पंढरपूर, कारण या क्षेत्रांचा अविनाशी तत्त्व असा महिमा भगवान शंकर आणि विष्णु यांनी आपल्या अखंड वास्तव्याने कथन केला आहे. म्हणूनच प्रत्येक हिंदू इहलोकाची यात्रा संपवण्यापूर्वी एकदा तरी काशीस अथवा पंढरपूरला जावे, अशी इच्छा बाळगून असतो. अशी थोरवी प्राप्त झालेले हे पंढरपूर तीर्थक्षेत्र आहे. काशीच्या पाच यात्रा, द्वारकेला तीन वेळा जाणे, या दोन्ही यात्रांनी जेवढे पुण्य मिळते, तेवढेच पुण्य एका पंढरपूरच्या वारीने मिळते. सर्व सुखाचे आगर आणि संत मंडळींचे माहेरघर असल्यानेच 'अवघी दुमदुमली पंढरी । भगव्या पताका खांद्यावरी । तुळशी वृंदावन डोक्यावरी । भाव भुकेल्यांची ही वारी ।,' असे म्हटले जाते. संत ज्ञानेश्वरांनी वारी या व्रताचा प्रारंभ केला. या तीर्थाचा महिमाच असा आहे. भावभक्तीचे बीज प्रत्येकाच्या अंतर्मनात रुजवणारी ही वारी पृथ्वीच्या अंतापर्यंत अशीच चालू रहाणार आहे. भक्तांच्या संकटसमयी धावून येण्यासाठी, आपल्या भक्तांची इच्छा पूर्ण करण्यासाठी विठ्ठल पंढरपुरात उभा आहे. देव भावाचा भुकेला आहे, याची प्रचीती घ्यायची असल्यास पंढरपूरला जावे. टाळ वाजवणाऱ्या वारकऱ्यांचा पदन्यासही लयबद्ध असतो. भले टाळकरी-वारकरी शेकडोंच्या संख्येने का असेना ! वैयक्तिक जीवनातील अभिनिवेष बाजूला ठेवून ईश्वराच्या नामस्मरणात देहभान विसरायला लावणारा आध्यात्मिक सोहळा म्हणजे पंढरपूरची वारी !

वृंदावनातील गोपी कृष्णाला म्हणत, ''अरे कृष्णा, तू अमावास्येला अंगावर काळी घोंगडी घेऊन यमुनाकाठी कदंब वृक्षावर बसलास की, तू आम्हाला दिसतच नाहीस; कारण रात्र काळी, यमुना काळी, तू काळा आणि घोंगडीही काळीच ! अशा वेळी हे सर्व अद्वैत होऊन जाते.'' संत ज्ञानदेव म्हणतात, 'तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे । सगुण निर्गुण एकु गोविंदु रे ।' म्हणजेच तो सगुण आहे आणि निर्गुणही आहे. एकदा लहानपणी संत ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई खेळत असतांना मुक्ताबाई ज्ञानदेवांना म्हणाली, ''अरे दादा, तू या पांडुरंगाला निर्गुण म्हणतोस; परंतु हा तर सगुण स्वरूपात येथे कटीवर हात ठेवून उभा आहे.'' त्यावर संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''मुक्ता, मी तुला गुरुमुखातून सांगतो. अगं, हा निर्गुणी बुंद (बिंदु) सगुणी उतरला आहे.'' एकूणच हा निर्गुणच सगुण स्वरूपात इथे दिसत आहे. तो कष्टकरी, शेतकरी, सामान्यजन आणि अनाथ यांचा कैवारी आहे; म्हणून तो (उन्हात कष्ट करून रापलेला असा) काळ्या रंगाचा झाला आहे. असा हा सगुण-निर्गुण रूपी पांडुरंग आहे. पांडुरंग हा शैव आणि वैष्णव दोघांचाही देव आहे. याला शैव आणि वैष्णव दोघेही भजतात. शैव पंथीय पांडुरंगाला 'वीरभद्र' म्हणजेच 'विठ्ठल' म्हणतात, तर वैष्णव त्याला 'गोपाळकृष्ण' असे म्हणतात. तो विष्णु आणि शिव यांचा अवतार आहे; म्हणूनच तो 'हरिहर' आहे. असा हा पांडुरंग श्रीकृष्णाचाच अवतार आहे. काही जण 'विठ्ठल हा भगवंताचा नववा अवतार बुद्ध आहे', असेही म्हणतात. (आद्यशंकराचार्यांच्या काळात भारतात काही नवीन धार्मिक प्रवृत्तींचा उदय होऊन जैन, बौद्ध इत्यादी धर्मपंथ उदयास आले होते. महाराष्ट्रातही बौद्ध धर्माचा प्रभाव असल्याचे दिसून येते; कारण कोकण किनारपट्टी, घाटमाथा, मराठवाडा येथील सह्याद्री पर्वताच्या रांगांमध्ये बुद्धाच्या कलाकृती असलेल्या गुंफा दिसतात.) जैन विठ्ठलाला 'तो बाविसावा तीर्थंकर नेमीनाथ आहे', असे मानतात. नेमीनाथ आणि कृष्ण हे दोघेही गोपाळच होते. ते यदुकुलोत्पन्नच होते. नेमीनाथ हाही विठ्ठलासारखा वर्णाने सावळा होता. नेमीनाथांचे शंख हे चिन्ह विठ्ठलानेही धारण केले आहे. त्यामुळे या सर्व लक्षणांवरून 'विठ्ठल हा दिगंबर नेमीनाथ असावा', असे जैनांचे मत आहे.

**- मोक्षदा घाणेकर,**
काळाचौकी, मुंबई

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# दावा न केलेल्या ठेवींचे निराकरण होणार

## जिल्ह्यात दावा न केलेल्या ४२ कोटींच्या ठेवी



■ प्रतिनिधी | अकोला ■

१० वर्षांहून अधिक काळ ज्या ठेवींवर दावा केलेला नाही, अशा ठेवी 'ठेवीदार शिक्षण व जागरूकता निधी' मध्ये हस्तांतरित करण्यात येतात. खातेदारांना त्या परत मिळवण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यासाठी निकालीकरणाची कार्यवाही मोहीम स्तरावर पूर्ण करण्यात येत आहे, अशी माहिती बँकर्स व वित्तीय तज्ज्ञांकडून देण्यात आली.

### आपला पैसा आपला अधिकार मोहिमेचा शुभारंभ

वित्तीय सेवा विभाग आणि राज्यस्तरीय बँक समिती यांच्या निर्देशानुसार ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी अंतर्गत आर्थिक मालमत्तांच्या निकालीकरणासाठी अग्रणी बँकेच्या सहकार्याने नियोजन भवन येथे 'आपला पैसा आपला अधिकार' जिल्हास्तरीय शिबिर झाले.यावेळी सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे प्रादेशिक अधिकारी पंकज कुमार,रिझर्व बँक ऑफ इंडियाचे अधिकारी पीयूष अग्रवाल, अग्रणी जिल्हा प्रबंधक नयन सिन्हा, तसेच वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अकोला जिल्ह्यात दावा न केलेली खाती १ लाख ४३ हजार ७४४ इतकी असून, त्याची एकूण जमा रक्कम ४२ कोटी रुपये एवढी आहे. शिबिरात खातेदारांच्या दावा न केलेल्या ठेवींबाबत माहिती देण्यात आली तसेच ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यात आले.यावेळी 'तुमचे पैसे तुमचा हक्क' पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधीअंतर्गत नामनिर्देशित,पात्र लाभार्थी यांना प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली.

श्री. अग्रवाल, श्री. सिन्हा यांनी मार्गदर्शन केले.



# ४ थे राज्यस्तरीय क्षत्रिय राजपूत युवक-युवती परिचय संमेलन १६ नोव्हेंबरला अकोल्यात

■ प्रतिनिधी | अकोला ■

अखिल भारतीय क्षत्रिय महासभा आणि महाराणा प्रताप सेवा समिती, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने ४ थे राज्यस्तरीय क्षत्रिय राजपूत युवक-युवती परिचय संमेलनाचे भव्य आयोजन येत्या १६ नोव्हेंबर रोजी अकोला शहरात करण्यात आले आहे. समाजातील तरुण पिढीला विवाहासाठी योग्य जोडीदार मिळवून देण्यासाठी व समाजातील ऐक्य वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे, अशी माहिती आयोजन समितीचे अध्यक्ष पृथ्वीराजसिंह ठाकूर यांनी दिली.

हे संमेलन प्रमिलाताई ओक सभागृह, बसस्थानक चौक, अकोला येथे पार पडणार असून त्यासाठी समितीकडून तयारीला वेग आला आहे. राज्यभरातून युवक-युवती या परिचय संमेलनात सहभागी होण्यासाठी उत्सुक असून आतापर्यंत तब्बल २०० युवक-युवतींनी नोंदणी केली आहे, अशी माहिती समितीच्या वतीने देण्यात आली.

नोंदणीसाठी ५ नोव्हेंबर ही अंतिम तारीख ठेवण्यात आली असून इच्छुक युवक-युवतींनी महाराणा प्रताप बाग, सिटी कोतवाली चौक, अकोला येथे असलेल्या समितीच्या कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



### नोंदणीची अंतिम तारीख ५ नोव्हेंबर; आतापर्यंत २०० युवक-युवतींचा सहभाग निश्चित

विशेष म्हणजे समाजातील दिव्यांग, विधवा आणि घटस्फोटीत युवक-युवतींसाठी नोंदणी पूर्णपणे मोफत ठेवण्यात आली आहे. समाजातील सर्व घटकांना या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन समितीकडून करण्यात आले आहे.

आयोजन समितीच्या वतीने सांगण्यात आले की, या संमेलनात सहभागी युवक-युवतींच्या परिचयासाठी सुसज्ज नोंदणी प्रणाली, माहितीपत्रके, छायाचित्र प्रदर्शन आणि सल्लामसलत सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. तर नोंदणीधारकाना परिचय पुस्तिका मोफत देण्यात येणार आहे. तसेच समाजातील ज्येष्ठ मान्यवर, प्रतिष्ठित व्यक्ती आणि विवाह सल्लागार या कार्यक्रमाला मार्गदर्शन करतील. संमेलनात येणाऱ्या सर्व समाज बांधवांच्या जेवणाची व्यवस्था सुद्धा करण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समिती सदस्य, युवक-युवती संघटना आणि विविध शाखांचे पदाधिकारी उत्साहाने कार्यरत आहेत. समाजातील सर्व घटकांनी या उपक्रमात सहभागी होऊन समाज ऐक्य दृढ करण्याचे आवाहन अध्यक्ष पृथ्वीराजसिंह ठाकूर यांनी केले आहे. या संमेलनाच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी ९२८४६३४८३५ / ९४२०१०४३८० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# शेतकरी आत्महत्याग्रस्त लाहोरे कुटुंबाला शासनाची सानुग्रह मदत

■ प्रतिनिधी | अकोट ■

तालुक्यातील बोर्डी येथील शेतकरी आत्महत्याग्रस्त लाहोरे कुटुंबाला शासनामार्फत एक लाख रुपयांची सानुग्रह मदत देण्यात आली आहे. महसूल विभागाचे कर्मचारी खामकर व पवार यांच्या हस्ते हा धनादेश कुटुंबियांच्या स्वाधीन करण्यात आला. बोर्डी येथील अंकीत भास्कर लाहोरे या तरुण शेतकऱ्याने सततची नापिकी,



शेतमालाला न मिळणारा योग्य भाव, नैसर्गिक आपत्ती आणि शासनाच्या उदासीन धोरणामुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटातून ७ जुलै रोजी आत्महत्या केली होती. शेतीतील वाढते नुकसान, बँक व खाजगी सावकारांचे कर्ज यामुळे तो तीव्र नैराश्येत गेला होता. कीटकनाशक प्राशन केल्यानंतर त्याला तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर ग्राम महसूल अधिकारी खामकर व पवार यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबाची माहिती गोळा केली व सविस्तर अहवाल वरिष्ठांकडे सादर केला. या प्रकरणाचा पाठपुरावा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष राजेश भालतीलक यांनी सातत्याने केला. शासनाकडून लाहोरे कुटुंबाला एक लाख रुपयांची सानुग्रह मदत तातडीने मंजूर झाली.

# अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनतर्फे 'रन फॉर युनिटी' अभियानाचे आयोजन

■ प्रतिनिधी | अकोट ■

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या संकल्पनेतून 'रन फॉर युनिटी' या अभियानाचे आयोजन अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनतर्फे करण्यात आले.

समाजातील वाढता दुरावा कमी करून नागरिकांमध्ये ऐक्य, बंधुता व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश पोहोचविण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा दि. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी सहा वाजता घेण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेला अभिवादन करून करण्यात आली. स्पर्धकांनी 'राष्ट्रीय एकता अमर राहो' अशा घोषणा देत ग्राम मोहाडा बस स्टँड ते आंबोडा गौशाळा या तीन किलोमीटर अंतरावर धाव घेतली. या स्पर्धेत युवक-युवतींसह नागरिकांनीही उत्साहाने सहभाग नोंदविला. विजेत्यांमध्ये पुरुष गटात ऋषिकेश आवारे, दसरथ उईके, श्रीकृष्ण सावरकर तर महिलागटात कुमारी रेणुका अस्वार, श्रुती सिरस्कार, साची रायबोले यांनी अनुक्रमे स्थान पटकावले. प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे यांनी समाजात एकता का आवश्यक आहे आणि तिचे फायदे काय आहेत यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात आकोलखेड बीट जमदार ठोसरे, सागर नागे, गोपाल जाधव, सचिन कुलट तसेच अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनचा संपूर्ण कर्मचारी वर्ग सहभागी झाला.

# शेकडो शहरवासी एकतेचा संदेश देत धावले

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

देशाचे लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त मुर्तीजापुर शहर व ग्रामीण पोलीस स्टेशनच्या वतीने रन फॉर युनिटीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक चांडक यांच्या संकल्पनेतून मिशन उडाण अंतर्गत आज दि.३१ रोजी



सकाळी ७ वाजता क्रीडा संकुल तहसील रोड येथून रन फॉर युनिटीचे आयोजन करण्यात आले होते. येथील क्रीडा संकुलाच्या प्रवेशद्वारापासून आमदार पिंपळे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रन फॉर युनिटी ला सुरुवात करण्यात आली.

**Change In Name**

My old name was
**ABDUL SHAKIR ABDUL RAFIQUE**
now my new name is
**Abdul Shakir Abdul Rafik**
Old passport no.J9292625 Add Near Momin pura Masjid momin pura Akola dist akola 444001 Maharashtra

**Change In Name**

My Old passport name was
**BEE SAJEDA**
now my new name is
**SHAHANUR BI MOHAMMAD MANSAB**
My Old passport no F5530699 Address momin pura Akot Dist Akola 444101 (M S)

# अकोल्यात रंगणार महापारेषण वीज कर्मचाऱ्यांचा क्रीडा महोत्सव

## अमरावती परिमंडळातील पाच जिल्ह्यांतील अधिकारी, कर्मचारी सहभागी होणार

■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीतर्फे अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी दरवर्षी आयोजित करण्यात येणारा आंतरमंडळीय क्रीडा महोत्सव यंदा अकोल्यात मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. हा क्रीडा सोहळा दि. ४ आणि ५ नोव्हेंबर २०२५ रोजी संपन्न होणार असून, अमरावती परिमंडळातील पाचही जिल्ह्यांतील अधिकारी आणि कर्मचारी या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

या वर्षी महापारेषण अऊदा संवसु अकोला मंडळाला यजमानपदाचा मान मिळाला आहे. स्पर्धेचे उद्घाटन समारंभ दि. ४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता वसंत देसाई क्रीडा संकुल, अकोला येथे होणार आहे. या समारंभाचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट यांच्या हस्ते होईल.

प्रमुख अतिथी म्हणून राजेश नाईक (मुख्य अभियंता, महावितरण अकोला), शरद भगत (मुख्य अभियंता, महानिर्मिती पारस), संजीव भोळे (मुख्य अभियंता, महापारेषण अमरावती) तसेच राष्ट्रीय क्रिकेट प्रशिक्षक रविसिंह ठाकूर उपस्थित राहणार आहेत.

दोन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत क्रिकेट, कबड्डी, कुस्ती, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिस, कॅरम, बुद्धिबळ, ब्रिज यांसह धावणे, रिले, उंच उडी, लांब उडी, गोळाफेक, थाळीफेक, भालाफेक असे विविध मैदानी खेळ रंगणार आहेत.

स्पर्धेचे अंतिम सामने दि. ५ नोव्हेंबर रोजी होणार असून, पारितोषिक वितरण सोहळा दि. ७ नोव्हेंबर रोजी अमरावती येथील संत श्री ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे महापारेषण कंपनीच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आला आहे.या भव्य क्रीडा महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी महापारेषण अऊदा संवसु अकोला मंडळाचे अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

- क्रिकेटचे सामने अकोला क्रिकेट क्लब मैदानावर,
- बुद्धिबळ, कॅरम व ब्रिजचे सामने स्काऊट-गाईड कार्यालयाच्या सभागृहात,
- टेबल टेनिस सामने न्यू इंग्लिश हायस्कूल येथे,

तर उर्वरित मैदानी खेळ वसंत देसाई स्टेडियमवर पार पडतील.

या क्रीडा महोत्सवात सहभागी होऊन उपस्थित राहण्याचे आवाहन कार्याध्यक्ष तथा अधीक्षक अभियंता संजय काटकर आणि आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

**जाहीर नोटीस**

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९०१/२०२५ प्रोसेस नं. १७५७९/२०२५
चौ.ता. २९/११/२०२५ दिनांक : १८/१०/२०२५

**अर्जदार :** १. सतिष भाष्करराव देशमुख रा. १ले लेन, तापडिया नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : भाष्करराव यशवंतराव देशमुख
**पत्ता :-** रा.१ले लेन, तापडिया नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भाष्करराव यशवंतराव देशमुख यांचे दि. ०९/०४/१९९३ रोजी उगवा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी श्री दिनेश आतमसिंग सावते, रा. देशमुख फैल, अकोला ता जि अकोला यांच्या मालकीची व ताब्यातील खालील वर्णन केलेली स्थावर मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केलेला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन- मौजे मलकापूर, प्र.ता.जि. अकोला र.स.डी.र.डी. अकोला महानगर पालिकेच्या हद्दीतील गौरक्षण रोड, माधव नगर, अकोला या नावाने ओळखल्या जाणाऱ्या परिसरातील शेत सर्व्हे नं. १२ जमीनीचे वि. उपविभागीय अधिकारी साहेब अकोला यांचे फाईलावरील रे.के.नं. एन.ए.पी. १३/२/१९६५-१९६६ नि. ता. २८/०८/१९६६ अन्वये पास झालेल्या लेआऊट नकाशातील लेआऊट प्लॉट नं. ५३ (त्रेपण) या प्लॉट वरमहाराजा विहार अपार्ट मेंट मधील ग्राऊंड फ्लोअरवरील फ्लॅट नं. जी-२, याचे बिल्ट अप क्षेत्रफळ ५०० चौ फुट असून याची चतुर्सिमा:- पुर्वेस - सर्व्हिस लाईन, पश्चिमेस - पार्किंग, उत्तरेस - फ्लॅट क्रं. जी-१, दक्षिणेस- फ्लॅट क्रं. जी-३ असे आहे. तरी वरील स्थावर मालमत्तेसंबंधी कोणाचाही कसलाही आक्षेप, तक्रार, हक्क, बोझा इत्यादी काही असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी कागदपत्रांसह खालील पत्यावर प्रत्यक्ष संपर्क साधावा. असे करण्यास कसुर केल्यास सदरहू स्थावर मालमत्तेवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा इत्यादी संबंध नाही असे समजुन आमचे पक्षकार रीतसर रजिस्टर खरेदीने नोंदवून घेतील, त्यानंतर कोणाचाही कसलाही हक्क संबंध इत्यादी चालणार नाही याची नोंद घ्यावी.

पक्षकारातर्फे अधिवक्ता
**ॲड .मो. इलयास शेखानी**
नोटरी भारत सरकार
महानगर पालिका कॉम्प्लेक्स, तहसिल कार्यालय के सामने, अकोला
मो. नं. ८०८७२४५८०८
अकोला
दि.०१/११/२०२५

**बार्शिटाकळी नगरपंचायत, बार्शिटाकळी जिल्हा अकोला**

दुरध्वनी क्रं. ०७२५५-२५२८२५

**निविदा सूचना**

**शुध्दीपत्रक**

नगर पंचायत बार्शीटाकळी निवडणूक २०२५ करिता लागणारे कामासाठी निविदा मागविण्यासाठी जनमाध्यम वृत्तपत्रात १/११/२०२५ प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर निविदा सूचना मध्ये अर्ज उपलब्ध व विक्री दिनाक व निविदा भरण्याची दिनाक अनावधनाने चूक झाली होती. तरी सदर दुरुस्ती दिनांक खालील प्रमाणे असेल .

**अर्ज उपलब्ध विक्री दिनांक वेळ -**
दिनाक ०१/११/२०२५ ते ७/११/२०२५ ( कार्यालीन वेळेत )
**निविदा कार्यालयात सादर करण्याची दिनांक व वेळ -**
दिनाक ०१/११/२०२५ ते ७/११/२०२५ दुपारी ३ वाजे पर्यंत
**निविदा दाखल करण्याचे ठिकाण-**
नगर पंचायत बार्शीटाकळी

**मुख्याधिकारी**
नगरपंचायत, बार्शिटाकळी

**जाहीर नोटीस**

सर्व जनतेस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे सलमान अहमद खान, रा. नफीस पार्क, गंगा नगर, वाशिम बायपास, अकोला, ता. व जि. अकोला हे ईक्वीटास स्मॉल फायनान्स, बँक लिमिटेड, शाखा अकोला यांचे कडून रु.१२,००,०००/- (बारा लाख रुपये फक्त) रकमेचे कर्ज घेत असून सदरहू कर्ज हे खालील मालमत्ता बँकेकडे गहाण ठेऊन घेत आहेत. त्या मालमत्तेचे वर्णन - वार्ड क्र. बी - १४, महानगरपालिका अकोलाचे हद्दीतील व यापूर्वीचे भारुद ग्रामपंचायत हद्दीतील, मौजे तपलाबाद, प्रगणे - अकोला, ता. व जि. अकोला येथील पूर्व-पश्चिम वाटणीने उत्तरेकडील प्लॉट क्र. ५६/ए, सर्वे क्र. ३/३ (जुना), महानगरपालिका मालमत्ता क्र. ३४३४ (नवीन) व ४२७५ / १ (जुना), एकूण क्षेत्रफळ ५२.७८ चौ. मिटर म्हणजेच ५६८ चौ. फुट व त्यावरील बांधकामासहित व ज्याच्या चतु:सीमा पूर्वेस - सर्विस लाईन व त्यानंतर खरीफ सोनू यांचे घर ( प्लॉट क्र. ५७); पश्चिमेस – २० फुट रस्ता; उत्तरेस – अब्दुल मस्जिद यांचे घर (प्लॉट क्र. ४७); दक्षिणेस – प्लॉट क्र. ५६ - मधील उर्वरित जागा या प्रकारे आहेत. येणेप्रमाणे सदरहू वरील वर्णनाच्या व चतु:सीमेच्या आतील मिळकती संबंधी इतर कुणासही कसल्याही प्रकारचा अधिकार, हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण किंवा काहीही वाद असल्यास त्यांनी आमच्याकडे सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवसाचे आत लेखी हरकत संबंधित कागदपत्रांसह दयावी. वरील मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास सदर मालमत्ता ही बिन बोजा व बिन भानगडीची असल्याचे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कुणाची काहीही हरकत व उजर आमचे पक्षकारावर लागू व बंधनकारक राहणार नाही. करिता ही जाहीर नोटीस.

अकोला
दि. ०१/११/२०२५.
**ॲड. एस. डी. तायडे**
जगदंबा नगर, खामगांव रोड, शेगांव.
मो. ९७३०८२९९२८

**जाहीर नोटीस**

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९३५/२०२५ प्रोसेस नं. १७५७०/२०२५
चौ.ता. २५/११/२०२५ दिनांक : १८/१०/२०२५

**अर्जदार :** १. गीता गजानन अटकर २. शंकर गजानन अटकर ३. सतीश गजानन अटकर सर्व रा. उगवा, ता. जि. अकोला. ४. मयुरी गोपाल ढोले रा. केळीवेळी, ता. अकोट जि. अकोला. ५. भावना सचिन ढोरे रा. मोझोड, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गजानन प्रल्हाद अटकर
**पत्ता :-** रा. उगवा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गजानन प्रल्हाद अटकर यांचे दि. ०२/०४/२०२५ रोजी उगवा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस 'प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/१० / २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३३२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**जाहीर नोटीस**

२. सोनाली रुपसिंग थापरिया, वय ३७ वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी
दोघेही रा.ठाकुर प्रेमनिवास चपराशीपुरा, कॅम्प, अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत रुपसिंग चरणसिंग थापरिया** यांचे दिनांक **३०.११.२०१८** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार पम्मी रुपसिंग थापरिया व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पम्मी रुपसिंग थापरिया व ईतर** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१६.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### तहसिलदार मोर्शी यांचे न्यायालय

**रा.मा.क्र./६८/MRC-८१/रिध्दपूर/२०२५-२०२६**

## जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **अब्दुल नईम अब्दुल गणी**, रा.रिध्दपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायतला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.रिध्दपूर येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व ईतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय रिध्दपूर येथे स्वतःचे दि.०१.०२.१९६९ रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक ३०.१०.२०२५

शिक्का

**स्वाक्षरी/-**
**तहसीलदार, मोर्शी**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३७१/२०२५
**हरबक्ष -वि- निरंक**
पुढील ता.२५.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. हरबक्ष हंदोमल सहानी, वय ७५ वर्षे, व्यवसाय - व्यापार
रा.रामपुरी कॅम्प, अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **हुंदराज उर्फ हंदोमल सहानी** हे दिनांक 23.06.1971रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **हरबक्ष हंदोमल सहानी** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **हरबक्ष हंदोमल सहानी** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १४.१०.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### आज पीरिपाची जिल्हास्तरीय बैठक

**अमरावती-** माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या पीपल्स रिपब्लिकन पार्टीची अमरावती जिल्हा कार्यकारणीची महत्त्वपूर्ण बैठक रविवार २ नोव्हेंबरला दुपारी १ वाजता शासकीय विश्रामगृह कॅम्प येथे आयोजित करण्यात आली आहे. आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक पूर्वतयारी करिता पक्षातर्फे जिल्ह्यात तालुकानिहाय मिशन झेडपी अंतर्गत राबविलेल्या मंधन बैठक सत्राच्या निमित्ताने समारोपीय जिल्हा मंथन महाबैठक पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष चरणदास इंगोले यांच्या प्रमुख उपस्थितीत व पश्चिम विदर्भाध्यक्ष प्रा डी. के. वासनिक यांच्या अध्यक्षतेखाली होईल. या महाबैठकीला अमरावती जिल्हा निरीक्षक दादासाहेब वरठे (तेल्हारा), सहनिरीक्षक डी. जे. खडसे (यवतमाळ), पश्चिम विदर्भ उपाध्यक्ष ॲड. बि. डी. गजभिये उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत. जिल्ह्यात नियुक्त पक्षाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार केला जाणार आहे.

### काँग्रेसचे मनपात 'जवाब दो' आंदोलन

**अमरावती-** शहरातील कचरा व्यवस्थापनाबाबत प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शहर काँग्रेस साफसफाईच्या मुद्यावर ३ नोहेंबर रोजी महापालिकेवर जबाब दो आंदोलन करण्यात येणार आहे. महानगरपालिकेतील निर्वाचित सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर प्रभागनिहाय ठेके संपुष्टात आले. त्यानंतर शहरातील कचऱ्याचा झोननिहाय काढलेला कंत्राटाचा सर्व नियम, अटी व शर्ती धाब्यावर बसवण्यात आल्या. विशेषतः तत्कालीन आयुक्तांच्या मार्फतीने मुद्दामहून मनुष्यबळाची अट काढून टाकण्यात आली. यामुळे शहरातील स्वच्छतेच्या संदर्भात पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. निविदा जाहीर झाल्यापासून पहिल्या दिवसापासूनच काँग्रेस पक्षाने की, अमरावती शहरातील उचलला. पक्षाने वारंवार सांगितले याविरोधात सातत्याने आवाज की, झोननिहाय ठेक्यात मनुष्यबळाची अट काढणे हा षडयंत्राचा भाग असून भ्रष्टाचाराला खुली आमंत्रणे आहे. मात्र प्रशासक राजवटीत काँग्रेसने आंदोलने, निवेदने व प्रशासनासोबत बैठका घेऊनही स्थानिक लोकप्रतिनिधी व कचरा माफियांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांशी संगनमत करून ठेका मिळवला. यातून कोट्यवधी रुपयांचे गबन झाले असून शहरातील १० लाख नागरिकांच्या जीवाला सातत्याने धोका निर्माण झाला आहे. काँग्रेसच्या वारंवार आंदोलनानंतर हे प्रकरण न्यायालयात गेले. न्यायालयाने स्वेच्छेने सूचना दिल्या यंत्रणेच्या बाहेर गेले झालेले कचरा माफिया आता आहेत. त्यामुळे 'यांच्यावर कारवाई कशी व कधी करणार?' याबाबत प्रशासनाने अंतर्मुख होऊन विचार करणे गरजेचे आहे. नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या सर्व घटनांचा आम्ही तीव्र निषेध करतो. अमरावती महानगरपालिकेच्या स्थापनेपासून आजपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांना असे निर्देश देण्याची वेळ कधीच आली नव्हती.

# पावसाचा रब्बी पेरणीला मोठा फटका

## पश्चिम विदर्भात कापूस, भाजीपाला पिकांचे नुकसान

**अमरावती/का.प्र.**

पश्चिम विदर्भात पावसाचा जोर अजूनही कायम आहे. या पावसामुळे रब्बीची पेरणी खोळंबली असून सोयाबीन, कपाशी, भाजीपाला, फळपिकांसाठी हा पाऊस घातक ठरला आहे. अमरावती विभागात गेल्या चोवीस तासांत तुरळक, हलका ते मध्यम पावसाची हजेरी लागली. सरासरी १२.३ मिमी पावसाची नोंद झाली. १ जूनपासून ऑक्टोबर अखेरपर्यंत विभागात ९२० मिमी म्हणजे सरासरीच्या ११४ टक्के पाऊस बरसला आहे. अमरावती जिल्हा वगळता इतर चारही जिल्ह्यांमध्ये पावसाने सरासरी ओलांडली आहे.हा पाऊस शेती आणि पिकांच्या मुळावर उठला आहे. खरिपातील पिके काढणीस आली असताना पाऊस पाठ सोडायला तयार नसल्याने बिकट स्थिती आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या हिमतीने काबाडकष्ट करून खरीप हंगामात घेतलेली पिके वादळी पावसाने वाया जाण्याच्या मार्गावर आहेत. हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. जुलैपासून पाऊस बरसतच राहिला. त्यामुळे काही ठिकाणी पिकांना तो पोषक ठरला असला तरी विभागातील अनेक भागात अति पाऊस झाल्याने यंदा शेतकऱ्यांना उतारा चांगला मिळालेला नाही. खरीप हंगामातील पीक काढणीचा हंगाम सध्या सुरू आहे. मात्र तरीही पाऊस काही केल्या पाठच सोडेना अशीच स्थिती झाली आहे. त्यामुळे पिक काढताना



शेतकऱ्यांच्या नाकीनऊ आले आहे.पावसाच्या पाण्यामुळे शिवारात ओल निर्माण झाल्याने भुईमूग, सोयाबीन काढणीत अडचण आली आहे. पाऊस लांबल्यास कपाशीचे मोठे नुकसान होण्याची भीती आहे.अनेक ठिकाणी शिवारातच सोयाबीन पावसाने काळे पडले आहे. ज्वारीही जादा पावसाने काळी पडली आहे. त्याचबरोबर कपाशीच्या पिकालाही फटका बसला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने घेतलेल्या पिकांवर पाणी फिरल्यासारखीच स्थिती झाली आहे.पावसाने भाजीपाल्यासह, काकडी, टोमॅटो, दोडका या फळभाज्यांच्या पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना मोठ्या मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे पीक नुकसानीची भरपाई तातडीने द्यावी अशी मागणी केली जात आहे. गेल्या चोवीस तासांत बुलढाणा जिल्ह्यात ८.८ मिमी, अकोला जिल्ह्यात १५ मिमी, वाशिम जिल्ह्यात ७.३ मिमी, अमरावती जिल्ह्यात सर्वाधिक १८.१ मिमी आणि यवतमाळ जिल्ह्यात ९.५ मिमी पावसाची नोंद झाली.

'सीसीआय'द्वारे नोंदणीकृत केंद्रावर हमीभावावर शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी केला जाणार आहे. मात्र, 'सीसीआय'च्या एका अटीमुळे शेतकऱ्यांची कोंडी झाल्याचे चित्र आहे. कापूस उत्पादन सरासरी सात क्विंटल असताना 'सीसीआय'ने एकरी ५.६० क्विंटल कापूस खरेदी करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे शेतकऱ्यांची चांगलीच अडचण होत असून उर्वरित कापसाचे काय? असा प्रश्न कापूस उत्पादक शेतकऱ्यांपुढे निर्माण झाला आहे. यासंदर्भात शेतकरी संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन मर्यादा हटवण्याची मागणी केली आहे. भारतीय कापूस महामंडळ (सीसीआय) मार्फत शासकीय कापूस खरेदी सुरू करण्यात येत आहे. या खरेदी प्रक्रियेतर्गत 'सीसीआय'ने प्रत्येक शेतकऱ्याकडून प्रतिएकर केवळ पाच क्विटल ६० किलो कापूस खरेदी करण्याची अट घातली. ही मर्यादा अत्यंत तोडकी अव्यवहार्य आणि शेतक-यांसाठी गैरसोयीची ठरत आहे. नोदणीच्यावेळी कापूस खरेदीची मर्यादा देण्यात आली नव्हती. आता मर्यादा लादल्यामुळे शेतकऱ्यांची अडचण होत आहे.

## मोझरी बस वेळेवर सोडण्यात बहुजन आर्मीची मागणी

**अमरावती/का.प्र.**

अमरावती आगारातून शिरजगाव मोझरी सावर्डी मार्गे जाणाऱ्या बसची तांत्रिक तपासणी करून बसफेरी वेळेवर सोडण्यात यावी, या मागणीचे निवेदन बहुजन आर्मीचे विपुल चांदे यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अमरावती आगार व्यवस्थापकांना देण्यात आले. सकाळी ९, दुपारी १२, दुपारी २, सायंकाळी ५ आणि रात्री ९ वाजता बस सुटण्याचे वेळापत्रक असले तरी बस वेळेवर सुटत नाही. यामुळे विद्यार्थी, महिला कामगार, शेतकरी आणि प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत आहे. बसस्थानकातून सोडलेली बस वारंवार बंद पडत असल्याने प्रवाशांना त्रास होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.बसची तांत्रिक तपासणी करूनच ती मार्गावर वेळेवर सोडावी. आगार प्रशासनाने तत्काळ कार्यवाही न केल्यास बहुजन आर्मी संघटनेतर्फे तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला.

निवेदन देताना बहुजन आर्मी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रवीण वाकोडे, भीमराव नाईक, संजय गडलिंग, प्रफुल्ल डोंगरे, प्रफुल्ल लोखंडे, हरीश वानखेडे, सुरेश वानखेडे, सुदर्शन बडगे, हर्ष बागडे, विशाल गरुड, निखिल गायकवाड, अमन डोंगरे, कुलदीप सावळे, अंकुश मेश्राम उपस्थित होते.

## १५ नोव्हेंबरपासून नाफेड करणार सोयाबीनसह मूग, उडीद खरेदी

**अमरावती/का.प्र.**

केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत मूग, उडीद आणि सोयाबीन पिकांची खरेदी १५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाईन नोंदणी करावी लागणार आहे. ही नोंदणी ३० ऑक्टोबरपासून सुरू झाली आहे.शेतकऱ्यांच्या ऑनलाईन नोंदणीची अंतिम मुदत ही ३१ डिसेंबर आहे. त्यानंतर १५ नोव्हेंबरपासून प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया सुरू होणार आहे. खरेदीचा कालावधी हा १५ नोव्हेंबरपासून पुढील ९० दिवसांसाठी राहणार आहे. जिल्ह्यात १५ खरेदी केंद्रांना मान्यता देण्यात आली आहे. जिल्ह्यात पणन महासंघाचे ८ आणि विदर्भ को-ऑपरेटिव्हच्या ७ उपअभिकर्ता संस्थांच्या खरेदी केंद्रांना शेतकरी नोंदणीसाठी मान्यता मिळाली आहे.

पणन महासंघाच्या उपअभिकर्ता संस्थांमध्ये अचलपूर तालुका सहकारी शेतकी खरेदी-विक्री संघ मर्यादित, अचलपूर, जयसिंग शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन जिल्ह्यातील १५ नोंदणी केंद्रांना मान्यता विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित, पथ्रोट, दर्यापूर तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ, दर्यापूर, धारणी तालुका सहकारी शेतकी खरेदी-विक्री संस्था मर्यादित, धारणी, नेरपिंगळाई विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित, नेरपिंगळाई, चांदूररेल्वे विकास खंड सहकारी शेतकरी खरेदी विक्री समिती मर्यादित चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर तालुका सहकारी शेतकरी खरेदी-विक्री समिती मर्यादित, नांदगाव खंडेश्वर, डॉ. बी. पी. देशमुख तिवसा तालुका सहकारी शेतकी खरेदी-विक्री समिती मर्यादित तिवसा यांचा समावेश आहे. उपअभिकर्ता संस्थांमध्ये विदर्भविदर्भ को-ऑपरेटिव्ह को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन अमरावती, अंजनगाव सुर्जी तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ, अंजनगाव सुर्जी, चांदूरबाजार सहकारी तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ, चांदूरबाजार, शिंगणापूर विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित, दर्यापूरला शिंगणापूर, दत्तापूर (धामणगाव) ॲग्रीकल्चर खरेदी-विक्री संघ, धामणगाव रेल्वे, मोर्शी तालुका सहकारी मोर्शी, वरुड तालुका सहकारी शेतकरी खरेदी-विक्री संघ, शेतकरी खरेदी-विक्री संघ, वरुड यांचा समावेश आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी नाफेडच्या धान्य खरेदी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि जिल्हा पणन अधिकारी अजय बिसने यांनी केले आहे.

## धारणी परिसरात सर्दी-खोकल्यासह तापाच्या रुग्णांत वाढ

**धारणी/वार्ताहर**

गेल्या आठ दिवसांपासून धारणी तालुक्यात अधूनमधून सुरू असलेल्या पावसामुळे वातावरणात मोठा बदल झाला आहे. सकाळी गारवा तर दुपारी उन्हाची तीव्रता अशा हवामानातील चढ-उतारामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून सर्दी, खोकला आणि ताप यांसारख्या संसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढले आहे.

या बदलत्या हवामानामुळे विशेषतः लहान मुलांना आजारांचा अधिक त्रास होत असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले आहे. ग्रामीण भागातही सर्दी-खोकला व तापाचे रुग्ण वाढल्याने पालक चिंतेत आहेत. स्थानिक आरोग्य केंद्रात सध्या या आजारांवर उपचार घेणाऱ्यांची संख्या वाढताना दिसत आहे.आरोग्य तज्ज्ञांच्या मते, तापमानातील अस्थिरतेमुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते आणि त्यामुळे व्हायरल इन्फेक्शनचा धोका वाढतो. नागरिकांनी स्वच्छतेकडे विशेष लक्ष देणे, योग्य आहार घेणे आणि घरातील वातावरण स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. याचबरोबर लक्षणे दिसल्यास त्वरित जवळच्या डॉक्टरांचा जवळच्या डॉक्टरांच्या सल्ला



घेऊन योग्य उपचार केल्यास होणाऱ्या रोगांपासून सावधान होता येत

'बदलत्या वातावरणात लहान मुलांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. सर्दी, खोकला किंवा तापासारखी लक्षणे जाणवल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. खोकताना व शिंकताना तोंड आणि नाक झाकावे, रुमाल किंवा मास्क वापरावा. घरात व परिसरात स्वच्छता राखल्यास संसर्गजन्य आजारांचा प्रसार रोखता येतो.ते पुढे म्हणाले, थोडीशी काळजी घेतल्यास मोठ्या त्रासापासून वाचता येते. बदलत्या हवामानात मुलांना बाहेरच्या थंड व ओलसर वातावरणात खेळू देऊ नये आणि हलका, पौष्टिक आहार द्यावा.असा सल्ला धारणी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक तथा बालरोग तज्ज्ञ डॉ जावरकर यांनी दिला आहे.

## श्री संत आडकुजी महाराजांचे पुण्यतिथीनिमित्त आरोग्य तपासणी शिबिर

**तिवसा/वार्ताहर**

श्री संत परमहंस सदगुरू आडकुजी महाराज यांचे १०४ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त शुक्रवार रोजी श्रीक्षेत्र वरखेड येथील श्री आडकुजी महाराज संस्थान येथे आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. हा उपक्रम उपजिल्हा रुग्णालय, तिवसा व समर्थ आडकूजी महाराज उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला असून ग्रामस्थ व भाविकांकडून याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला .

या शिबिरात वरखेड व परिसरातील स्त्री- पुरुष ,बालक इत्यादींची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. नागरिकांच्या रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबिन आदी नियमित तपासण्यांसह आवश्यक औषधोपचार आणि सल्ला देण्यात आला. विशेषतः महिलांसाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र सल्ला विभाग कार्यरत ठेवण्यात आला होता.

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही संस्थांन चे वतीने पुण्यतिथी महोत्सवाच्या निमित्ताने धार्मिक



कार्यक्रमांसोबतच सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. समाजसेवेच्या माध्यमातून संतांच्या सेवाभावाची परंपरा जपण्याचा हा प्रयत्न असल्याचे व्यवस्थापन समितीने सांगितले.या शिबिराच्या यशस्वीतेसाठी उपजिल्हा रुग्णालय तिवसा येथील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्गाने सहकार्य केले.

त्यामध्ये डॉ. जयश शेखर, डॉ. विकास जायभाये, औषधी निर्माता गणेश भोणे,एचआयव्ही समूहदेशक अफसर पठाण,सिस्टर शितल बेर्डे, पूजा गडलिंग, महालॅब तर्फे विनोद बोराळकर, लखन देऊळकर, तसेच अटेंडन्स विभागातून शुभम शिंदे व बंडू कदम यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. देवस्थान व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी उपजिल्हा रुग्णालयाच्या सर्व वैद्यकीय टीमचे मनःपूर्वक आभार मानले. सात दिवस चालणाऱ्या पुण्यतिथी महोत्सवात धार्मिक कार्यक्रमांसोबत समाजहिताचे विविध उपक्रम — आरोग्य शिबिर, स्वच्छता मोहिम, वाचनप्रेरणा अभियान यांसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून श्री संत आडकुजी महाराजांच्या पुण्यतिथी निमित्ताने सेवाभावाची परंपरा आजही कायम राखली जात आहे.

### आजचे कार्यक्रम

रविवार दिनांक २ नोव्हेंबर (एकादशी )
सकाळी ५.३० वाजता सामुदायिक ध्यान व चिंतन : सौ वंदनाताई बा हरणे
.९ ते ११. प्रवचन: कू परमेश्वरी शेलोटकर
दुपारी २ ते ५: महीला मेळावा व माहेर वाशिनी मुलींचा सत्कार
सौ अनुराधा अ बोके संस्थान विश्वस्त यांच्या हस्ते
साय ६ ते ७ सामुदायिक प्रार्थना व भाषण सो सीमाताई इंगळे ८ वाजता कीर्तन : ह भ प नारायण महाराज पडोळे

## मातोश्री रमाबाई आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक फ्रेजरपुरा येथील सिद्धार्थ क्रीडा मंडळातर्फे मातोश्री रमाबाई आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण व लोकार्पण सोहळा रविवारी (ता. दोन नोव्हेंबर) दुपारी चार वाजता सिद्धार्थ बौद्धविहार फ्रेजरपुरा येथे आयोजित करण्यात आला आहे. पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या हस्ते व मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून वरुडचे नायब तहसीलदार सुदर्शन शहारे, महापालिकेचे सहाय्यक आयुक्त नितिन बोबडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर पायस, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, फ्रेजरपुराचे ठाणेदार रोशन सिरसाट, पत्रकार प्रा. संजय शेंडे, नयन मोंडे, अजय श्रृंगारे उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व मातोश्री रमाबाई आंबेडकर यांच्या पुतळा परिसरातील आकर्षक सौंदर्गीकरण व कंपाऊंड वॉल विकासकामाचे लोकार्पण होणार आहे, यानिमित्ताने सायंकाळी ६ वाजता विश्वशांती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. सोबतच वर्षावास समाप्ती निमित्त भोजनदान कार्यक्रम दुपारी ४ वाजता सिद्धार्थ बौद्धविहार येथे होणार आहे.

सन २०२२-२३ व २०२४-२५ मध्ये आर्थिक अडचणींवर मात करून शासकीय नोकऱ्या मिळविणाऱ्या फ्रेजरपुरा परिसरातील होतकरू विद्यार्थ्यांचा सत्कार केला जाणार आहे. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक सुदाम बोरकर असून त्यांना सिद्धार्थ क्रीडा मंडळ, सिद्धार्थ व्यायाम मंडळ, सिद्धार्थ बौद्ध विहार व सिद्धार्थ वाचनालय या संस्थांचे सहकार्य आहे. सुमित जयकांत मेश्राम यांनी मातोश्री रमाबाई आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी धम्मदान दिले आहे. कार्यक्रमाची सुरुवात परित्राण पाठाने सकाळी ९ वाजता होणार आहे. सर्व आंबेडकरी अनुयायी व उपासकांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून सहभागी होण्याचे आवाहन मुख्य आयोजक सुदाम बोरकर यांनी केले आहे.



## नाफ्रेंडला सोयाबीन विक्रीसाठी एकाच दिवशी ३५०० शेतकऱ्यांची नोंदणी

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

सोयाबीनच्या शासकीय खरेदीसाठी आदेश आल्याचे माहित होताच तालुक्यातील शेतकऱ्यांनी नोंदणीची एकच गर्दी करून पहिल्या दिवशी एकूण ३५०० शेतकऱ्यांनी खरेदी विक्री संस्थेकडे सोयाबीन विक्रीकरिता नोंदणी अर्ज दाखल केले.

नाफेड मार्फत शासकीय हमी दराने सोयाबीन खरेदी सुरू होणार असून त्याकरिता नोंदणी अर्ज प्रक्रियेसाठी खरेदी विक्री संस्थेकडे नोंदणी सुरू झाली. तेव्हा नोंदणी करिता शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी उसळली शेतकऱ्यांची गर्दी आवाक्या बाहेर जात असल्याने पोलीस यंत्रणेकडून शांतता कायम करण्यात आली शुक्रवारी ३१ ऑक्टोबरला सकाळी चार वाजता पासूनच शेतकरी नोंदणी करिता लाईन मध्ये उभे होते संस्थेकडून शेतकऱ्याकडून नोंदणी अर्ज संध्याकाळपर्यंत स्वीकारण्यात आले. सोयाबीनचा शासकीय हमीभाव ५३२८ रुपये आहे आणि बाजारात सोयाबीनला ३५०० ते ४००० रुपयांपर्यंत भाव मिळत असल्याने सरासरी प्रतिक्विंट पंधराशे रुपयांच्या फरकाने शेतकऱ्यांला आर्थिक फटका बसतो त्यामुळे शेतकऱ्यांचा कल नाफेडला सोयाबीन विक्री करण्याकरिता वाढला असल्याचे दिसून येत.

## राजर्षी शाहू महाराज वाचनालयात सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांना अभिवादन

**तिवसा -** श्री राजर्षी शाहु महाराज वाचनालयामध्ये भारताचे पहिले उपपंतप्रधान तसेच भारताचे एकत्रीकरणात महत्वाची भूमिका बजावणारे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त तसेच भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधीजी यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण करण्यात आले. कार्यक्रमाला वाचनालयातील विद्यार्थी सचिन काळे, विशाल गडलिंग,सौरभ इंगळे,, अक्षय देशमुख,प्रशांत डगवार, प्रिया डहाके व इतर वाचक वर्ग यांच्या हस्ते प्रतिमेचे पुजन करून त्यांचे पुण्यस्मरण करण्यात आले.



## वेचणीला आलेला कापूस मातीमोल

### नांदगाव तालुक्यात अवकाळी पावसाचा कहर

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या उरल्या सुरल्या आशांवरही पाणी फेरले आहे आधीच सोयाबीन हातचे गेले असताना आता वेचणीला आलेला कापूस ही पावसात भिजून मातीमोल झाला आहे निसर्गाच्या घाताने हवालदिल झालेला बळीराजा आता जगावे की मरावे? या भीषण संकटात सापडला झालेल्या पावसाने तालुक्यात जणू पावसाळाच पुन्हा सुरू झाला आह. या पावसाने शेतकऱ्याला पूर्णतः बेहाल केले सोयाबीन आधीच पावसाने हिरावून नेली काही सोयाबीन हाती लागले ते संधी साधू व्यापाऱ्यांना मातीमोल



भावात विकावे लागले ज्यात लागवडीचा खर्चही निघाला नाही शेतकऱ्यांची सर्व मदार आता पांढऱ्या सोन्यावर होती शेतामध्ये कापूस मोठ्या प्रमाणात फुटला मात्र मजुराभावी तो वेचला गेला नाही आणि याच पावसाने तो भिजवून मातीमोल केला निसर्गाच्या या अवकुपेमुळे शेतकरी पूर्णतः खचून गेला असून कर्जात बुडाला आहे या भीषण परिस्थितीत सत्ताधारी पक्षा कडूनमदत मिळत नसल्यामुळे संतप्त भावना शेतकऱ्यांमध्ये आहे निवडणुका आल्या की मतांचा जोगवा मागत हे सत्तापिपासू नेते शेतकऱ्यांचे हितचिंतक असल्याचा आव आणतात खोटे आमिष दाखवून पोळी भाजतात आणि नंतर विसरून जातात असा थेट आरोप शेतकरी करत आहे नको रे निसर्ग असा घात करू तोंडात आलेला आमचा खास नको हेरु अशी हाक देत कारखानदाराचे कर्ज माफ करणाऱ्या सरकारला शेतकऱ्यांची आठवण का येत नाही? शासनाने आता जखमेवर मीठ चोळण्या ऐवजी सरसकट कर्जमाफी द्यावी अशी एक मुखी मागणी जोर धरत आहे

# रेल्वे उड्डाणपूल पाडण्यासाठी निघाली ई -निविदा

## भुसावळ रेल्वे विभागाने सुरू केली प्रक्रिया

### दोन कोटी रुपये खर्च येणार



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती रेल्वे ब्रिज तोडण्यासंदर्भात भुसावळ रेल्वे विभागाच्या वतीने विविध ई निविदा काढण्यात आली आहे. हे ब्रिज पाडण्यासाठी दोन कोटी रुपये खर्च येणार आहे. येणाऱ्या दोन-तीन दिवसात एजन्सीची टीम शहरात येऊन परिसराचा निरीक्षण करणार, अशी माहिती समोर आली आहे. राजकमल चौक ते हमालपुरा, ज्यस्तंभ चौक ते रेल्वे स्टेशन चौक कडे जाणाऱ्या उडान पूल साठी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि रेल्वे विभागाला संयुक्तरित्या निर्माण कार्य करावे लागणार आहे. रेल्वे क्षेत्रात येणाऱ्या कार्याचे निर्माण कार्य रेल्वे विभाग करणार आणि उडानपुलाचा अप्रोच मार्ग सार्वजनिक बांधकाम विभाग तयार करणार आहे. भविष्यात हा पूल कसा राहणार (पान २

# स्क्रब टायफसने घेतला वृद्ध शेतकऱ्याचा बळी

**अमरावती/प्रतिनिधीः-**



नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील जगतपुर गावात स्क्रब टायफसमुळे एका वृद्ध शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे खळबळ उडाली आहे. टिरलिंग पवार (वय ६५) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. माहितीनुसार पाच-सहा दिवसांपूर्वी शेतकरी टिरलिंग पवार यांची प्रकृती बिघडली होती. स्क्रब टायफॉड्र्स च्या किड्याने त्यांना चावले होते. यामुळे त्यांची प्रकृती ढासळत होती. आरोग्य विभागाच्या वतीने त्यांचे ब्लड सॅम्पल घेण्यात आले होते. यामध्ये त्यांची रिपोर्ट स्क्रब टायफड्स पॉझिटिव निघाली. आणि यामुळे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे गावात भीतीचे (पान २ वर)

### गोवंश तस्करीवर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

# चार जनावरे, टाटा झेस्ट वाहन आणि मुद्देमाल जप्त





अमरावती : जिल्ह्यात वाढत्या गोवंश तस्करीला आळा बसवण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांनी पुन्हा एकदा ठोस पाऊल उचलले आहे. मोर्शी तालुक्यातील तळणी फाट्याजवळ स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने चार जनावरे क्रूरपणे बांधून नेत असलेली टोळी रंगेहात पकडत मोठी कारवाई केली.

पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी जिल्ह्यात गोवंश कत्तलीसाठी होणाऱ्या वाहतुकीविरुद्ध विशेष मोहिम राबविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी सतत गस्तीदरम्यान सतर्क होते. १ नोव्हेंबर रोजी पोलिस उपनिरीक्षक विशाल रोकडे हे आपले (पान २ वर)

# शेकदरी धरणात बुडून युवकाचा मृत्यू

### लक्ष्मी विसर्जनासाठी गेले होते मंडळ



वरूड : तालुक्यातील टेंभुरखेडा येथील तरुणाचा लक्ष्मी विसर्जनाचेवेळी शेकदरी धरणात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शुक्रवार, ३१ ऑक्टोबर रोजी दुपारच्या सुमारास उघडकीस आली. त्यानंतर सायंकाळी उशिरापर्यंत शोध मोहीम सुरू होती. परंतु, मृतदेहाचा शोध लागला नाही. अखेर शनिवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास अमरावतीवरून एनडीआरएफ पथक दाखल झाले व मृतदेह बाहेर काढला.

शुभम श्रावण सोनवणे असे या २५ वर्षीय तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी दुपारी दीड ते दोन वाजताच्या सुमारास लक्ष्मी विसर्जनासाठी गावातील मंडळासोबत शेकदरी धरणावर तो गेला होता. मंडळातील इतर तरुणांसह तो धरणाच्या पाण्यात स्नानासाठी उतरला असता, पाण्यात उडी घेतल्यानंतर तो वर आला नाही. काही वेळाने शोध घेतला असता तो सापडला नाही, त्यामुळे धरण परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच जरूड चौकीचा पोलिस ताफा घटनास्थळी दाखल झाला. अंधार व परिस्थिती लक्षात घेता शोध मोहीम थांबविण्यात आली व अमरावती येथून एनडीआरएफ पथकाला पाचारण करण्यात आले. हे शोध पथक शनिवारी सकाळी घटनास्थळी आले आणि धरणातील मृतक शुभमचा मृतदेह शोधण्यात अखेर या पथकाला यश आले.

उत्तरीय तपासणीकरिता (पान २ वर)

# तिन ठिकाणी जुगार अड्ड्यांवर पोलिसांची धाड!

### सलग कारवाईने जुगाऱ्यांमध्ये खळबळ



अमरावती : शहरातील जुगारबाजीवर आळा घालण्यासाठी पोलिसांनी सलग दोन दिवसांत तिन्ही ठिकाणी केलेल्या धडक कारवाईने जुगार खेळणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. रहाटगाव, जेवळनगर आणि संत गुलाबबाबा नगर परिसरात पोलिसांनी छापे टाकून एकूण ११,३७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सर्व ठिकाणी संबंधितांविरुद्ध गुन्ह्यांची नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

पंचशील चौक, रहाटगाव येथे शुक्रवारी दुपारी पोलिसांनी अचानक छापा टाकला. येथे तुळशीदास उर्फ बंडू भीमराव बरडे (वय ४७, रा. पंचशील नगर, रहाटगाव) हा जुगार खेळताना आढळला. या ठिकाणावरून १,६१० रुपये नगदी मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे.

जेवडनगरात मटका अड्ड्यावर धाड-

यानंतर जेवळनगर परिसरात पोलिसांनी आरोपी रोशन ध्यानेश्वर खांडेकर (वय ४०) याच्या ठिकाणी छापा टाकला. येथे मटका (पान २ वर)

# मंदिरात गळ्यावर कोयता ठेवून लूट!

### -परतवड्यात पारायण सुरू असताना चार आरोपींचा धाडसी हल्ला

**परतवाडा :** शहरातील दत्तझिरी मंदिरात पारायण सुरू असताना श्रद्धाळूंच्या डोळ्यांसमोरच चार अज्ञात आरोपींनी गळ्यावर कोयता ठेवत लूटमार केल्याची थरारक घटना शनिवारी रात्री उघडकीस आली. धार्मिक स्थळी घडलेल्या या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. रमेश सदाशिव पवार (वय ७६, रा. माळीपुरा, पथ्रोट) हे पारायणासाठी मंदिरात उपस्थित होते. पारायण सुरू असतानाच चार अज्ञात आरोपींनी अचानक मंदिरात प्रवेश करून एका व्यक्तीच्या (पान २ वर)

# वरूड, मोर्शी तालुक्यात २० बिबट्यांचा वावर

### वनविभागाच्या माहितीने शेतकऱ्यांमध्ये दहशत



वरूड : वरूड व मोर्शी तालुक्यातील नागरिकांचा बहुदा शेती व शेतीपूरक पाळीव प्राण्यांचा व्यवसाय असल्याने त्यांना पहाटे, सकाळ, सायंकाळ तसेच रात्री बे रात्री कधीही जंगलाची वाट धरावी लागते. शेतकऱ्यांना ओलित करण्यासाठी दिवसा व रात्रीचेही ओलित करण्यासाठी रात्रभर शेतात मुक्काम करावा लागतो. शेती व्यवसाय व पाळीव प्राणी सांभाळण्यासाठी बरेच आदिवासी कुटुंब शेतात सोकारी म्हणून राबत असतात. त्यांना सुद्धा आपला जीव मुठीत घेऊन कुटुंबाचा सांभाळ करावा लागतो. अशा परिस्थितीत वनविभागाकडून बिबट्यांचा आकडा समोर येताच शेतकऱ्यांची रात्रीची झोपच उडाल्याचे दिसत आहे.

वरूड व मोर्शी तालुक्यातील वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार वरूड तालुक्यात ६ व मोर्शी तालुक्यात १४ असे एकूण अंदाजे २० बिबट मोर्शी विधानसभा क्षेत्रात आढळून आल्याचा गौप्यस्फोट करण्यात आला आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती लक्षात घेता आमदार उमेश यावलकर यांनी पदभार स्वीकारताच या विषयाला अनुसरून वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे वरूड मोर्शी तालुक्याकरिता स्वतंत्र रेस्क्यू टीमची मागणी केली होती. परंतु शासनाने त्या मागणीला केराची टोपली दाखवत त्याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे शासनाकडून आजपावेतो त्यावर कुठलाही आदेश पारित करण्यात आला नाही. आज बिबट्यांचा वावर इतक्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने शेतकऱ्यांना शेती व शेतीपूरक व्यवसाय करणे कठीण झाले आहे. कारण बऱ्याचदा शेतकऱ्यांना बिबट्याचे दर्शन झाल्याने व पाळीव प्राण्यांचा बिबट्याने फडशा पाडल्याने तसेच अस्वलीकडून शेतकरी व शेतमजुरावर (पान २ वर)

# युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

### - शिवर येथील घटना



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरालगतच्या शिवर गावात २६ वर्षीय युवकाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी (दि.३१) सायंकाळी उघडकीस आली. तुषार गजानन शिरस्कार (वय.२६) रा.शिवर असे गळफास घेऊन आत्महत्या करणाऱ्या युवकाचे नाव आहे. शुक्रवारी दुपारच्या सुमारास त्याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. शनिवारी तुषारचे (पान २ वर)

# कुऱ्हा परिसरात पावसामुळे रब्बी हंगामातील पेरणी रखडली

### शेतातील कापसाचे झाले दही - शेतकऱ्यांसमोर मोठे संकट



**कुऱ्हा :** परिसरात गुरूवारी पहाटे ४ वाजता पासून पावसाला सुरुवात झाली असून शेतातील कापूस ओला झाल्याने कापसाचे दही झाले.गेल्या चार पाच दिवसांपासून ढगाळ वातावरण होते.मात्र गुरूवारी पहाटे चार वाजता पासून पावसाला सुरुवात केली.

दुसरीकडे रब्बी हंगामातील पेरणी रखडल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट आहे. तिवसा तालुक्यात अनेक भागात सध्या कापूस फुटलेला आहे.दिवाळीच्या काळात वेचणीसाठी मजूर न मिळाल्याने हा कापूस तसाच राहिला होता.या अवकाळी पावसाने शेतातला वेचणीसाठी आलेला कापूस भिजला असून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना यामुळे (पान २ वर)

# अल्पवयीन मुलीचे अपहरण करून अत्याचार

### फ्रेजरपुरा येथील घटना, आरोपी अटक



**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला गुपचूप खाण्याच्या नावावर तिचे अपहरण करून अत्याचार करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी अल्पवयींन मुलीच्या तक्रारीवरून आरोपी मंगेश कमलराज भोसले (वय ३०,पारधी बेडा वडाळी) याला अटक केली आहे.

माहितीनुसार ३० ऑक्टोबरच्या सायंकाळी अल्पवयीन आपल्या मैत्रिणी सोबत वडाळी परिसरात गुपचूप खाण्यासाठी गेली होती. त्यावेळी आरोपी मंगेश भोसले याने तिला आणखीन गुपचूप खाण्यासाठी दुचाकी वर बसायला सांगितले आणि तिला घेऊन भारतनगर (पान २ वर)

# गव्हर्नमेंट इंजिनिअरिंग कॉलेजसमोर कचऱ्याचा ढिगारा; नागरिक त्रस्त

### युवक काँग्रेस, भाजयुमो व युवासेनेचे संयुक्त चक्काजाम आंदोलन



**अमरावती/प्रतिनिधीः-** गव्हर्नमेंट इंजिनिअरिंग कॉलेजसमोरील मुख्य रस्त्यावर गेल्या अनेक दिवसांपासून कचऱ्याचे ढिगारे साचले असून, त्यातून दुर्गंधी व आजारांचा प्रसार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. संबंधित विभागाच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांत संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोग्याच्या या गंभीर प्रश्नावर पक्षीय मतभेद विसरून युवक काँग्रेस, भाजयुमो आणि युवासेना या तिन्ही युवा संघटनांनी एकत्र येत आज संयुक्त चक्काजाम आंदोलन छेडले. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी 'कचरा (पान २ वर)

# वकील संघाचे काम बंद आंदोलन स्थगित

### सोमवारी लाल फीत लावून करणार कामकाज



**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यामध्ये वकिलांवर वारंवार होत असलेल्या हल्ल्यांच्या निषेध आणि वकील संरक्षण कायदा तातडीने लागू करण्यासाठी येत्या ३ नोव्हेंबर रोजी न्यायालयीन कामकाजापासून अलिप्त राहण्याचा ठराव बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र एंड गोवाच्या वतीने पारित करण्यात आला होता. परंतु वकील संघाने हा निर्णय मागे घेतला आहे आणि सोमवार ३ नोव्हेंबर रोजी लाल फीत लावून शासनाचा विरोध करून घोषणेबाजी करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

काही दिवसांपूर्वी अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यामध्ये एका साक्षीदाराने उलट तपासणीच्या प्रश्नामुळे चिडून संबंधित वकिलावर प्राणघातक हल्ला केला. यापूर्वीही राज्यातील विविध भागात अनेक वकिलांना मारहाण झाली आहे. तसेच, काही वकिलांची हत्याही केली गेली आहे. त्यामुळे वकील संरक्षण कायदा तातडीने लागू करणे आवश्यक आहे. या मागणीसाठी सोमवारी वकी संघाचे पदाधिकारी काळा कोट आणि लाल फीत लावून शासनाचा विरोध करणार आहे.जिल्हा वकील संघाने स्पष्ट केले की न्यायालयीन कामकाज बंद करण्याच्या घोषणेची मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर (पान २ वर)

# गांजा प्रकरणातील फरार आरोपी अखेर पोलिसांच्या ताब्यात!

### अमरावती गुन्हे शाखेची कारवाई



अमरावती : सात वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आलेला आणि गेल्या अनेक महिन्यांपासून फरार असलेला गांजा प्रकरणातील आरोपी अखेर अमरावती शहर गुन्हे शाखेच्या पथकाच्या जाळ्यात अडकला आहे. गुप्त पथकाच्या सततच्या प्रयत्नांनंतर शनिवारी (१ नोव्हेंबर) आरोपीस अमरावतीतून अटक करण्यात आली.

छत्तीसगड येथील १५ किलो गांजा बाळगल्याप्रकरणी सैय्यद मेंहदी मिया सैय्यद पीर (वय २३, रा. जमील कॉलनी, अमरावती) या आरोपीस विशेष न्यायालय (एन.डी.पी.एस. ॲक्ट), महासमुंद यांनी सात वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली होती. मात्र शिक्षा सुनावल्यानंतर तो न्यायालयात गैरहजर राहून फरार झाला होता. फरारी जीवन जगत असताना आरोपीने आपले ठिकाण आणि मोबाईल क्रमांक सतत बदलून पोलिसांना गाफील ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त बातमीदारांच्या मदतीने त्याच्या हालचालींचा (पान २ वर)

# हारे का सहारा श्याम हमारा...

### -शहरात ठिकठिकाणी स्वागत



**अचलपूर /प्रतिनिधी :-** लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या राजस्थान येथील खाटू श्याम बाबा यांच्या जन्मदिनानिमित्त अचलपुरात निशान यात्रा काढण्यात आली. हारे का सहारा श्याम हमारा या जयघोषाने संपूर्ण अचलपूर शहर दुमदुमले.लोहार लाईन मधील हत्तीवाला मंदिर येथून श्याम बाबांची निशाण यात्रा काढण्यात आली. लोहार लाईन, सराफा लाईन ,पोलीस चौकी, देवडी ,जुना सराफा, अकबरी चौक, टक्कर चौक, चावलमंडी येथील इच्छापूर्ती दुर्गा मंदिरापर्यंत अचलपुरात ही शोभायात्रा काढण्यात आली.या निशान यात्रेची ठिकठिकाणी नागरिकांनी पूजा, आरती केली. या निशान यात्रेच्या मार्गात नागरिकांनी आपल्या घरासमोर रांगोळी टाकली होती. पारंपरिक वाद्यासह शहरातून शिस्तबद्ध संगीतमय हातात श्याम बाबांचे निशाण असलेले झेंडे घेऊन या शोभायात्रा (पान २ वर)



खाटू श्याम बाबा यांच्या जन्मदिना निमित्त अचलपुरात निशान यात्रा




सारांश
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
❑ रविवार, २ नोव्हेंबर २०२५ ❑ E-paper - www.janmadhyam.com

# आता आठव्या वेतन आयोगाची 'रेवडी'

**निवृत्ती वेतनात अधिकची वाढ मिळावी ही निवृत्तीधारकांची मूळ मागणी मान्य होणार का ? हा सामाजिक प्रश्न सरकारला योग्यपणे हाताळावा लागणार आहे. अटलबिहारी वाजपेयी सरकारच्या काळात लागू झालेल्या नवीन निवृत्ती वेतन योजनेमुळे निवृत्तीनंतर तेवढा फायदा मिळत नसल्याच्या कर्मचाऱ्यांच्या मागणीनंतर मोदी सरकारने गेल्या वर्षी निवृत्ती वेतन योजनेत बदल केले होते. यानुसार निवृत्तीच्या काळातील वेतनश्रेणीच्या ५० टक्के निवृत्ती वेतन मिळण्याची तरतूद करण्यात आली आहे.**

कर्जमाफी तसेच शेतीच्या उत्पादन खर्चानुसार हमीदरांत वाढ मिळावी अशा मागण्यांसाठी नागपूरमध्ये शेतकऱ्यांनी धरणे धरले असताना, त्याच दिवशी केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आठव्या वेतन आयोगाची कार्यकक्षा निश्चित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला हा एक प्रकारे विरोधाभासच. देशभरातील शेतकऱ्यांना शेतमालाच्या दरांसाठी कायम झगडावे लागते तर सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनात दर दहा वर्षांनी घसघशीत वाढ होते, असा शेतकरी संघटनांचा आक्षेप असतो. नवीन वेतन आयोगाच्या अंमलबजावणीचा सुमारे ५० लाख केंद्रीय कर्मचारी तर ६९ लाख निवृत्ती वेतनधारकांना लाभ होईल.

आयोगाला अहवाल सादर करण्यासाठी १८ महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. म्हणजेच २०२७च्या मध्यास अहवाल आल्यावर, सरकार निर्णय घेईल. निवडणुकीतील मतांचे गणित लक्षात घेऊनच राज्यकर्ते निर्णय घेत असतात. आठव्या वेतन आयोगाची घोषणा दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर गेल्या जानेवारीत झाली; मग दहा महिन्यांनी या आयोगाच्या अध्यक्षांसह सदस्यांची नियुक्ती करून कार्यकक्षा निश्चित होईस्तोवर बिहार निवडणूक जवळ आली आहे- या योगायोग नव्हे. बिहारपाठोपाठ पाच राज्यांच्या निवडणुका होणार असून, केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांची देशात दुसऱ्या क्रमांकाची संख्या असलेल्या पश्चिम बंगालमध्ये या निर्णयाचा फायदा घेण्याचा भाजप प्रयत्न करणार हे निश्चित.

सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी २०१६ पासून झाली. या पार्श्वभूमीवर आठवा वेतन आयोग १ जानेवारी २०२६ पासून लागू केला जाईल. सहाव्या वेतन आयोगाच्या अहवालानंतर सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनात सरासरी ४० टक्के तर सातव्या वेतन आयोगामुळे कर्मचाऱ्यांच्या वेनतश्रेणीत सरासरी २३ ते २५ टक्के वाढ झाली होती. केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना नवीन वेतन आयोग लागू झाल्यावर सर्व राज्य सरकारी कर्मचाऱ्यांकडून वेतनवाढीची मागणी पुढे रेटली जाते. त्या त्या राज्यांमधील राज्यकर्त्यांना सरकारी कर्मचाऱ्यांची वेतन सुधारणेची मागणी मान्य करावी लागते.ही दशवार्षिक वेतनवाढ, हेही केंद्र वा राज्य सरकारी नोकऱ्यांचेच आकर्षण आजही युवकांना असण्याचे एक प्रमुख कारण. यामुळेच बहुधा उत्तर प्रदेशात ६० हजार पोलिसांच्या भरतीसाठी ४८ लाख तर मध्य प्रदेशात ७,५०० पोलीस शिपाई पदाच्या भरतीकरिता १० लाख अर्ज आले होते. उत्तर प्रदेशात ४११ कनिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांच्या भरतीसाठी जवळपास १० लाखांनी अर्ज केले होते. ही झाली काही वानगीदाखल उदाहरणे. सर्वच राज्यांत नोकऱ्यांचे प्रमाण आणि त्या तुलनेत अर्जदारांची संख्या यात मोठी तफावत असते. महाराष्ट्र, कर्नाटक, तमिळनाडू, आंध्र प्रदेश, तेलंगणा, गुजरातसारख्या महत्त्वाच्या राज्यांमध्ये खासगी नोकऱ्यांचा पर्याय उपलब्ध असतो.



पण मागास शिक्का बसलेल्या अनेक राज्यांमध्ये फारशी गुंतवणूकच येत नसल्याने सरकारी नोकऱ्यांशिवाय पर्याय नसतो. जम्मू आणि काश्मीर या तुलनेत छोट्या केंद्रशासित प्रदेशात सरकारी कर्मचारी आहेत पाच लाख ! तेथे सरकारी नोकऱ्यांशिवाय रोजगाराच्या अन्य संधीच उपलब्ध नव्हत्या, हा जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांचा युक्तिवाद. खासगी क्षेत्रात कर्मचाऱ्याच्या कामगिरीच्या आधारे वेतनवाढ दिली जाते. सरकारी कर्मचाऱ्यांसाठीही कामगिरीच्या आधारे वेतन निश्चिती करावी अशी जुनी मागणी आहे. पण सरकारी कर्मचाऱ्यांना दुखावणे कोणत्याही सरकारला शक्य नाही. भाजपने हे हिमाचल प्रदेशमध्ये अनुभवले आहे. आठव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीनंतर सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनात दरमहा चांगली वाढ होईल, असा आधीच्या वेतन आयोगाच्या अहवालावरून अंदाज बांधता येतो. वेतन वाढीमुळे केंद्राच्या एकूण खर्चातील आस्थापना खर्चही वाढत गेला. नवीन आयोगाच्या अंमलबजावणीनंतर फरकाची रक्कम हाती कधी पडणार याची कर्मचाऱ्यांना उत्सुकता असेल.

निवृत्ती वेतनात अधिकची वाढ मिळावी ही निवृत्तीधारकांची मूळ मागणी मान्य होणार का ? हा सामाजिक प्रश्न सरकारला योग्यपणे हाताळावा लागणार आहे.

# पूर्वेकडच्या मैत्रीचा नवा पाया



आसियान शिखर परिषदेत पंतप्रधान मोदी यांनी भारत-आसियान संबंधांना 'सांस्कृतिक जागतिक शक्तिस्थान' असे संबोधत या सहकार्याचा नवा अध्याय सुरू केल्याचे नुकतेच जाहीर केले. २०२६ हे 'भारत-आसियान सागरी सहकार्य वर्ष' घोषित करूण त्यांनी पूर्वेकडील भारताच्या मैत्रीचा नवा पाया रचला आहे, असे म्हणता येईल.

'आसियान' हे प्राचीन सांस्कृतिक नात्यांचे आधुनिक स्वरूप आहे, असे ढोबळमानाने म्हणता येईल. 'आसियान' म्हणजे दक्षिण-पूर्व आशियातील दहा देशांचा प्रादेशिक संघ होय. यामध्ये इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड, सिंगापूर, व्हिएतनाम, फिलिपाइन्स, ब्रुनेई, कंबोडिया, लाओस आणि म्यानमार या देशांचा समावेश होतो. या दहा देशांत यंदा 'पूर्व तिमूर' या अकराव्या देशाची भर पडली. हे देश आशियातील व्यापार, संस्कृती आणि धोरणनीती ठरवणारे देश असून, भारताचे या प्रदेशातील नाते, हे आधुनिक काळातील राजनैतिक संबंधांपुरते मर्यादित नसून, त्यामागे हजारो वर्षांचा सांस्कृतिक आणि व्यापारी इतिहास आहे. कंबोडियातील जगातील सर्वात मोठे हिंदू मंदिर अंगकोरवाट असो, अथवा इंडोनेशियातील रामायन-महाभारतावर आधारित शिल्पकला असो, या पुरातन वारशाने भारत-आसियान संबंधांची सांस्कृतिक पायाभरणी केलेली आहे. बौद्ध धर्म भारतातून या देशांमध्ये पोहचला. आजही तो त्यांचा जीवनमूल्यांचा अभिन्न भाग म्हणून कार्यरत आहे.

भारताचा 'आसियान' देशांशी व्यापारी आणि सागरी संबंधांची परंपरा राहिलेली आहे. भारतीय व्यापार्यांनी शतकानुशतके 'आसियान' देशांमध्ये मसाले, वस्त्र आणि हस्तकला यांचा व्यापार केला. चोल आणि विजय साम्राज्यांच्या काळातील सागरी मार्ग हे आजच्या आधुनिक सागरी मार्गाचेच पूर्वरूप आहे, असे म्हणता येईल. भारताने इंडो-पॅसेफिक क्षेत्रात व्यापार, सुरक्षा आणि पर्यावरणीय संतुलन कायम राखण्यासाठी 'आसियान' देशांसोबत संयुक्तपणे उपाययोजना केली आहे. २०२६ हे 'भारत-आसियान सागरी सहकार्य वर्ष' घोषित करून भारताने या सागरी मैत्रीला धोरणात्मक अधिष्ठान दिले आहे. यानिमित्ताने भारताच्या नौदल आणि पायाभूत सुविधांना निश्चितच नव्याने प्रोत्साहन मिळेल, असे दिसते.

**सत्यसाई पी. एम.**

सन १९९० च्या दशकात तत्कालिन पंतप्रधान नरसिंह राव यांनी 'लूक ईस्ट' धोरण सर्वप्रथम मांडले. यामध्ये भारताने पूर्वेकडील देशांशी आर्थिक आणि राजनैतिक संबंध दृढ करण्याचा प्रयत्न केला. पंतप्रधान मोदी यांच्या काळात हे धोरण 'ॲक्ट ईस्ट'च्या स्वरूपात सक्रिय झाले. आता भारत 'फक्त पाहतो' असे नाही, तर 'प्रत्यक्ष कृती' करून पूर्वेकडील आपली उपस्थिती बळकट करत आहे. 'ॲक्ट ईस्ट' अंतर्गत भारत-आसियान मुक्त व्यापार करार, कनेक्टिव्हिटी प्रकल्प, सागरी सुरक्षा, डिजिटल अर्थव्यवस्था आणि शैक्षणिक देवाणघेवाण अशा अनेक क्षेत्रात सहकार्य वाढले आहे. भारताने 'आसियान'ला केंद्रीय भागीदार म्हणूनही मान्यता दिली आहे.

दक्षिण-पूर्व आशियातील चीनचा वाढत असलेला प्रभाव आणि अमेरिकेची या प्रदेशातील धोरणात्मक सक्रियता हे आजचे वास्तव आहे.

# भारतातील अणुयुगाचे जनक

अणु शास्त्रज्ञ डॉ. होमी भाभा यांचा जन्मदिन. अणुशक्तीचा वापर शांततेसाठी व मानवी कल्याणासाठी करावा असे डॉ. भाभांचे मत होते. म्हणूनच भारतात अणुभट्टी उभारून वीजनिर्मिती, आरोग्यासाठी अणु, अन्न-समृद्धीसाठी अणु अशी मानवी कल्याणाची मुहूर्तमेढ डॉ. भाभांनी रोवली. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या कार्याचा थोडक्यात घेतलेला आढावाष्ठ

डॉ. होमी भाभा यांचा जन्म ३० ऑक्टोबर १९०९ रोजी मुंबई येथे झाला. त्यांचे वडील उद्योगपती टाटा यांचे मुख्य कारभारी होते. उपजतच असामान्य बुद्धिमत्ता असलेल्या डॉ. होमी भाभांना लहानपणापासूनच वाचनाची आवड होती. वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांनी आइन्स्टाइनचा सापेक्षतावादाचा सिद्धांत अभ्यासला होता.

(आइन्स्टाइनच्या अणुशक्तीच्या शोधातून त्यांना अणुबॉम्बची प्रेरणा मिळाली) त्यांचे उच्च शिक्षण एलफिन्स्टन कॉलेज व रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या दोन संस्थेत झाले. १९३४ मध्ये वयाच्या पंचविसाव्या वर्षी त्यांनी केंब्रिज विद्यापीठाची पीएच.डी. मिळविली. १९३६ मध्ये त्यांच्या प्रबंधास ॲडम्स पारितोषिक मिळाले.

'अंतरिक्ष किरण' (कॉस्मिक रेज) हा त्या वेळचा कुतूहलाचा विषय डॉ. भाभांनी संशोधनासाठी निवडला. डॉ. भाभा व दुसरे शास्त्रज्ञ हायटलर यांनी अंतरिक्ष किरणावर संयुक्तपणे संशोधन करून सिद्धांत मांडला- 'अंतरिक्ष किरण कोणत्याही वस्तुरूप माध्यमातून जात असताना इलेक्ट्रॉनचा वर्षाव निर्माण करतात'. याच वेळी डॉ. भाभांच्या सुदैवाने अणुशक्तीचे जनक मानले गेलेल्या प्रा. रुदरफोर्ड व डॉ. नील्स भोर या शास्त्रज्ञांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

त्यांनी अणूचे अंतरंग व मेसॉन मूलकणाविषयी संशोधन करून जागतिक अणुशास्त्रज्ञ म्हणून कीर्ती मिळवली. वयाच्या ३१व्या वर्षी इंग्लंडच्या रॉयल सोसायटीने त्यांना फेलो हा सन्मान बहाल केला. डॉ. भाभांनी ज्या मेसॉन कणांवर संशोधन केले होते, ते संशोधन पुढे नेऊन जपानी शास्त्रज्ञ युकावा यांनी नोबेल पारितोषिक पटकावले.

इ. स. १९३९ मध्ये भाभा सुट्टीकरिता भारतात आले होते, परंतु त्यावेळेस दुसर्या महायुद्धाला सुरुवात झाल्यामुळे नंतर ते भारतातच राहिले. त्यानंतर डॉ. भाभा बंगलोरच्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स' या डॉ. रामन यांच्या नेतृत्वाखालील संस्थेत भौतिकशास्त्राचे अध्यापक म्हणून काम करू लागले. १९४० मध्ये याच ठिकाणी डॉ. भाभांनी अंतरिक्ष किरणांच्या अभ्यासाचे केंद्र स्थापन केले. अल्पावधीतच या केंद्राने इतकी कीर्ती मिळवली की, या केंद्रांमध्ये प्रसिद्ध अमेरिकन शास्त्रज्ञ बर्नार्ड पीटर्स संशोधनासाठी आले.

देशात अणुविज्ञानाचे संशोधन करणारी एखादी मोठी संस्था असावी, असे डॉ. भाभांना वाटत होते.



उद्योगपती टाटांच्या मदतीने १९४५ मध्ये मुंबई येथे ही संस्था स्थापन केली. तिचे पहिले संचालक म्हणून डॉ. भाभांची

**प्रा. विजय कोष्टी**

निवड झाली. अनेक भारतीय शास्त्रज्ञ येथे अणु विज्ञानावर संशोधन करू लागले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू व डॉ. भाभांची चांगली मैत्री होती. भावी काळात अणुशक्तीची व त्या माध्यमातून निर्माण होऊ शकणार्या विद्युत शक्तीची मोठ्या प्रमाणावर गरज निर्माण होणार आहे हे ओळखून १९५४ मध्ये पंडित नेहरूंच्या सरकारने अणुशक्ती मंडळ स्थापन केले. डॉ. भाभांना या मंडळाचे प्रमुख नेमले.

१९५१ मध्ये इंडियन सायन्स कॉंग्रेसच्या बेंगलोर अधिवेशनाचे डॉ. भाभांना अध्यक्ष करून त्यांचा गौरव केला गेला. त्यावेळी ते म्हणाले, 'अणुशक्तीच्या वापरातून अमाप विद्युतशक्ती मिळू शकेल. भारतात अणुशक्ती उत्पादनासाठी लागणारे किरणोत्सर्गी पदार्थांचे साठे भरपूर प्रमाणात आहेत. आण्विक विद्युत निर्माण करणे हेच भारतासारख्या खंडप्राय देशाला फायद्याचे ठरेल'. १९५४ मध्ये मुंबई शेजारी तुर्भे (ट्रॉम्बे) येथे डॉ. भाभांच्या मार्गदर्शनाखाली अणुशक्ती संशोधन केंद्र स्थापन केले गेले. शेकडो संशोधक व शास्त्रज्ञ येथे संशोधन करू लागले. १९५५ मध्ये 'शांततेसाठी अणुशक्ती' या विषयावरील जीनिव्हा येथील जागतिक परिषदेचे डॉ. भाभांना अध्यक्षपद देऊन गौरविण्यात आले.

अणुशक्तीपासून विद्युत निर्मिती म्हणजे अणुचा शांततेसाठी होणारा विधायक उपयोग. तथापि, त्यासाठी पायाभूत स्वरूपाची संशोधन यंत्रणा असावी लागते. त्यासाठी १९५५ मध्ये भारतातील पहिली अणुभट्टी बांधण्याचा निर्णय डॉ. भाभांनी घेतला व ४ ऑगस्ट १९५६ रोजी आशिया खंडातील पहिली अणुभट्टी ट्रॉम्बे येथे सुरू झाली.

भारतीय शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ यांनी ही अणुभट्टी बांधली होती. येथे अणुशक्तीवर मूलभूत संशोधन करणे भारतीयांना शक्य झाले.

# पिचलेला अन्नदाता!

हवामान बदलाच्या काळात नैसर्गिक संकटांमुळे होणारी मनुष्य अणि वित्तहानी तसेच शेत-बागायतीच्या होणाऱ्या नुकसानीचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. सरकारकडून समाधानकारक मदत मिळत नसल्याने कृषी क्षेत्र हे अधिक त्रासदायक क्षेत्र ठरत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण सर्वात गंभीर असून त्यांचे कुटुंबीयही वाऱ्यावर पडल्याचे दिसून येते. खर्च, मेहनत, अडचणी, अनिश्चिततेच्या भोवऱ्यात अडकलेल्या शेतकऱ्यांची उन्नती, प्रगती कधी होणार?

यंदा पंजाब, हिमाचल प्रदेश, जम्मू-कश्मीर, उत्तर प्रदेश, आसाम, राजस्थान, दिल्लीसह दक्षिणेतील बहुसंख्य राज्यांत सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. महाराष्ट्रातही काही भाग ओला दुष्काळाच्या छायेखाली आला आहे. या कारणांमुळे शेकडो गावे पाण्याखाली गेली आणि हजारो हेक्टरवरील पिकांची नासाडी झाली. या अस्मानी संकटामुळे शेतकऱ्यांचे लाखो-कोटय़वधी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. प्रामुख्याने पर्वतीय राज्यांत ढगफुटीच्या घटनांनी वित्तबरोबरच मनुष्यहानीदेखील झाली आहे. शिवाय लाखो हेक्टरवरील उभे पीक वाया गेले. केंद्र सरकारने पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, उत्तर प्रदेशसह ओल्या दुष्काळाचा सामना करणाऱ्या राज्यांना मदत केली असून आणखी सहाय्य केले जात आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना संकटातून बाहेर पडण्यासाठी मदत होईल, अशी अपेक्षा आहे. शेतकऱ्यांना थोडीफार मदत झाली असली तरी प्रत्यक्षातील नुकसान



आणि कुटुंबांना झालेल्या वेदना पाहता ते मुळापासून समजून घेण्याची कोणाचीही तयारी दिसत नाही. एकप्रकारे नैसर्गिक संकट हे आता शेतकऱ्यांच्या आयुष्यातील भागच बनला आहे की काय? असे म्हणावे लागत आहे. एक समस्या संपत नाही तोच दुसरी समस्या उभी राहताना दिसते.

**नवनाथ वारे**

गेल्या वर्षी वर्ल्ड वेदर एट्रिब्युशन (डब्ल्यूडब्ल्यूए) आणि लायमेंट सेंट्रलचा संयुक्त अहवाल जारी झाला. त्यांच्या मते, मानवी हस्तक्षेपामुळे हवामान बदलाला चालना मिळत असून त्याचा परिणाम वातावरणावर होत आहे. या कारणामुळे २०२४ मध्ये जगातील अनेक भागांना पीवादळ, महापूर, दुष्काळ, जंगलातील वणवा आणि उष्णतेच्या लाटा सहन कराव्या लागल्या. सुमारे २४ नैसर्गिक आपत्तींत ३७०० जणांचा मृत्यू झाला आणि लाखो लोक बेघर झाले. या अहवालावरून हवामान बदलाचे गंभीर परिणाम लक्षात येतात.

या वर्षी पाऊस, ढगफुटी व महापुराने झालेले नुकसान पाहता त्याचे अजूनही सरकारी पातळीवर सर्वेक्षण सुरू असून त्यासंदर्भात अंदाज बांधले जात आहेत.

खाद्य आणि कृषी संस्था (एफएओ) यांच्या अहवालानुसार, वाढत्या नैसगिक घटनांमुळे जगभरातील शेतकऱ्यांवर दरवर्षी आर्थिक, शारीरिक, मानसिक आणि सामाजिक परिणाम होत आहेत. ते अनेक आजारांना बळी पडत आहेत. हा फटका शेतकऱ्यांना एकप्रकारे उद्ध्वस्त करण्याच्या स्थितीत उभे करण्यास प्रवृत्त करत आहे.

शेतकऱ्यांचे नुकसान हे जागतिक पातळीवरील कृषी क्षेत्राच्या वार्षिक जीडीपीच्या सुमारे पाच टक्के एवढे आहे. नैसर्गिक संकटांच्या घटनांत गेल्या ३० वर्षांत प्रचंड वाढ झाली असून ती बाब चिंताजनक आहे. ऋतुपातील बदल हा अनेक प्रकारच्या समस्या, संकट, अडचणी आणि आजारपणाला निमंत्रण देत आहे. शास्त्रज्ञांच्या मते, हवामान बदलाच्या नैसर्गिक कारणामुळे जगभरात अनेक समस्या, आजारपण, संकट आणि ऋतुपा याविषयी व्यक्त केलेल्या अंदाजापेक्षा अधिक बदल पाहावयास मिळत आहे.

**हवामान बदल!**

हवामान बदलाला चालना देणाऱ्या घटकांचे आकलन केल्यास हवेतील प्रदूषण, सूर्यात बदल, ज्वालामुखीचे उत्सर्जन, कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण वाढणे, जीवाश्म इंधनाचा अधिक वापर, जंगलतोड, डोंगर फोडणे, औद्योगिक क्षेत्रातून विषाक्त कचरा बाहेर फेकणे, शेतीच्या बदलत्या पद्धतीवरून ग्रीन हाऊस गॅसमध्ये होणारी वाढ आणि वाहनांची वाढती संख्या या गोष्टींचा उल्लेख करता येईल. याव्यतिरिक्त सततच्या सैनिकी संघर्षामुळे वातावरणात पसरणारा विषारी गॅस, अण्विक कचरा, प्लॅस्टिक आणि मापोप्लास्टिकदेखील ऋतुपा आणि हवामानाला अडचणीत आणत आहे. शास्त्रज्ञांच्या मते, कार्बन डायऑक्साईड आणि मिथेन ग्रीन हाऊस गॅस या कारणामुळे ग्लोबल वार्मिंगची समस्या सतत वाढत आहे.

हवामान बदलाच्या काळात नैसर्गिक संकटांमुळे होणारी मनुष्य अणि वित्तहानी तसेच शेत-बागायतीच्या होणाऱ्या नुकसानीला जबाबदार कोण? असा प्रश्न निर्माण होत आहे. एवढेच नाही तर शेतकऱ्यांवर अन्नधान्य, फळे, भाजीपाला आणि दूध उत्पादनाचीदेखील जबाबदारी असून याखाली दबलेल्या शेतकऱ्यांची शोचनीय स्थिती आणखी किती दिवस राहणार? अशीही विचारणा होते.

# सकाळी रिकाम्या पोटी हे पाणी पिल्याने पचनशक्ती होईल मजबूत



**जिरे आणि ओवा हे आपण आपल्या स्वयंपाक घरात वापरले जातात. परंतु हे दोन्ही मसाले अन्नाची चव वाढवतात. याशिवाय हे दोन्ही पदार्थ आपल्या आरोग्यासाठी सुद्धा तितकेच महत्त्वाचे मानले जातात. ओवा पोटदुखी, अपचन यासारख्या समस्यांपासून आपल्याला आराम देते. तसेच जिरे देखील आपल्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे मानले जाते. जिरे आणि ओव्याचे पाणी हे आपल्या आरोग्यासाठी खूप लाभदायक आहे. म्हणूनच रिकाम्या पोटी जिरे आणि ओवा यांचे पाणी पिण्याचे प्रमाण हे वाढू लागलेले आहे.**

वजन कमी करायचे असल्यास, दररोज सकाळी रिकाम्या पोटी जिरे आणि ओव्याचे पाणी नक्की प्यायला हवे. जिरे आणि ओव्याचे पाणी पिल्याने शरीर डिटॉक्स होते. हे पाणी पिऊन पोटाची चरबी जळते. सकाळी रिकाम्या पोटी जिरे आणि ओव्याचे पाणी पिल्याने वजन कमी होण्यास मदत होते. म्हणून वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी हे पाणी प्यायला हवे.

जिरे आणि ओव्याचे पाणी पिण्यामुळे त्वचेला अनेक फायदे होतात. हे पाणी पिण्यामुळे, शरीरातील घाण सहज निघून जाण्यास मदत होते. यामुळे शरीर डिटॉक्स होण्यास मदत होते. दररोज सकाळी रिकाम्या पोटी जिरे आणि ओव्याचे पाणी प्यायल्याने त्वचेची चमक वाढते. या पाण्यामुळे डाग आणि मुरुमांच्या समस्येपासून देखील आराम मिळतो. म्हणून त्वचेचे सौंदर्य वाढवण्यासाठी हे पाणी आहारात समाविष्ट करायलाच हवे.

बद्धकोष्ठतेच्या समस्येने त्रस्त असाल तर, दररोज सकाळी जिरे आणि ओव्याचे पाणी प्यायला हवे. या पाण्यामुळे पचनक्रिया मजबूत होते. तसेच पोटदेखील सहज साफ होते. जिरे आणि ओव्याचे पाणी पिण्यामुळे गॅस, अपचन यासारख्या समस्यांपासून देखील आराम मिळतो.

जिरे आणि ओव्याचे पाणी पिल्याने, यकृताचे आरोग्य देखील सुधारते. हे पाणी पिल्याने यकृताचे डिटॉक्स होण्यास मदत होते. जिरे आणि ओव्याचे पाणी नैसर्गिक क्लीजर म्हणून काम करते. यामुळे आपल्या शरीरातून विषारी घटक बाहेर पडण्यास मदत होते.

जिरे आणि ओव्याचे पाणी कसे बनवायचे ?

यासाठी २ ग्लास पाणी घ्या. त्यात १ चमचा जिरे आणि अर्धा चमचा ओवा घाला. हे पाणी चांगले उकळवून घ्यावे. अर्धे पाणी शिल्लक राहते तेव्हा हे पाणी गाळून प्या. तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी जिरे आणि ओव्याचे पाणी पिऊ शकता.

# रोज फिश ऑइल सप्लिमेंट्स घेताय?



सध्या निरोगी जीवन शैलीकडे झुकणाऱ्या अनेक लोकांचा कल हेल्दी डाएट, योगा, व्यायाम, आणि विविध सप्लिमेंट्सकडे वाढताना दिसतो आहे. त्यात 'फिश ऑइल सप्लिमेंट्स' हे एक मोठं नाव बनलं आहे. शरीरातील ओमेगा-३ फॅटी ॲसिडच्या गरजेसाठी हे सप्लिमेंट खूपच लोकप्रिय झालं आहे. मात्र, अलीकडील संशोधनानुसार, हे सप्लिमेंट सर्वांसाठी सुरक्षित आहेच असं नाही.

**फिश ऑइल – फायदेशीर की हानिकारक?**

फिश ऑइलमध्ये असलेले ओमेगा-३ फॅटी ॲसिड हृदयासाठी फायदेशीर मानले जातात. रक्तदाब कमी करणे, कोलेस्टेरॉल नियंत्रित ठेवणे, आणि हृदयाच्या आरोग्यास मदत करणे, असे याचे फायदे सांगितले जातात. मात्र, अलीकडील अभ्यासांतून हे स्पष्ट होत आहे की कोणताही पूर्वीचा हृदयविकार नसलेल्या लोकांसाठी या सप्लिमेंट्सचा वापर उलट त्रासदायक ठरू शकतो.

तज्ज्ञांच्या माहितीनुसार, फिश ऑइल सप्लिमेंट्स घेणाऱ्या अशा व्यक्तींमध्ये — ज्यांना हृदयाशी संबंधित कोणताही आजार नव्हता — ॲट्रियल फायब्रिलेशनचा धोका सुमारे १३% वाढला आणि स्ट्रोकचा धोका ५% ने वाढलेला आढळला. विशेषतः महिलांमध्ये हा त्रास जास्त दिसून येतो.

दुसऱ्या बाजूला, हेच सप्लिमेंट्स हृदयविकाराच्या रुग्णांसाठी काही प्रमाणात फायदेशीर ठरते. तज्ज्ञांकडून सांगण्यात आलं की अशा रुग्णांमध्ये ॲट्रियल फायब्रिलेशनचा झटका गंभीर स्वरूप धारण करण्याचा धोका १५% ने कमी झाला. तसेच हृदयविकारामुळे मृत्यू होण्याची शक्यता सुमारे ९% ने घटली.

**डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय सप्लिमेंट घेणे टाळा**

कोणतीही अन्नपूरक गोळी, ती नैसर्गिक असली तरीही, प्रत्येकासाठी योग्यच असेल असे नाही. शरीरात ओमेगा-३ ची कमतरता असेल आणि आहारातून ती भरून न निघाल्यास वैद्यकीय सल्ल्यानेच फिश ऑइल सप्लिमेंट्सचा वापर करावा.

संपूर्णपणे निरोगी व्यक्तींनी फक्त 'प्रिव्हेंटिव्ह' उपाय म्हणून फिश ऑइल सप्लिमेंट्स घेणे टाळावे.

त्याऐवजी, ओमेगा-३ मिळवण्यासाठी नैसर्गिक स्रोत जसे की अक्रोड, जवसाचे बी, किंवा मासे यांचा यांचा आहारात समावेश करणे अधिक सुरक्षित ठरू शकते.कोणतेही सप्लिमेंट घेण्यापूर्वी वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे, विशेषतः जेव्हा त्याचा आपल्या आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो.

# 'घसा' खवखवत असेल तर....



जर तुमचा घसा खवखवत असेल तर कोमट पाण्यात अर्धा चमचा मीठ मिसळून दररोज अनेक वेळा गुळण्या करा. असे केल्यामुळे घशातील जळजळ कमी होते आणि घशातील जिवाणू कमी होण्यास मदत होते. शरीराला हायड्रेटेड ठेवणे महत्त्वाचे आहे. कोमट पाणी पिणे अधिक फायदेशीर ठरू शकते.

दालचिनीचा चहा किंवा गरम दूध पिणे घशाला आराम देऊ शकते. गरम पाण्यात मध आणि लिंबू घालून पिणे फायदेशीर ठरू शकते. गरम पाण्याची वाफ घेतल्याने श्वसनमार्ग साफ होतो आणि घशातील गुदगुदल्या कमी होतात. तुम्ही गरम शॉवरच्या वाफेचा वापर करू शकता.

# हे पदार्थ देतात दुधापेक्षा जास्त कॅल्शियम!

**आपण बहुतांशवेळा कॅल्शियम म्हटले की दुधाचा विचार करतो. खरं तर, बऱ्याच लोकांना वाटतं की कॅल्शियम मिळवण्यासाठी रोज दूध पिणं आवश्यक आहे. परंतु सत्य हे आहे की अनेक नैसर्गिक आणि फोर्टिफाइड अन्नपदार्थ असे आहेत जे दुधापेक्षा जास्त कॅल्शियम देतात.**



आपण बहुतांश वेळा कॅल्शियम म्हटले की दुधाचा विचार करतो. खरं तर, बऱ्याच लोकांना वाटतं की कॅल्शियम मिळवण्यासाठी रोज दूध पिणं आवश्यक आहे. परंतु सत्य हे आहे की अनेक नैसर्गिक आणि फोर्टिफाइड अन्नपदार्थ असे आहेत जे दुधापेक्षा जास्त कॅल्शियम देतात. शरीराच्या हाडांची घनता, दातांचे आरोग्य आणि एकूणच शारीरिक विकासासाठी कॅल्शियम अत्यावश्यक आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ नुसार, प्रौढ व्यक्तीला दररोज सुमारे १००० मिलीग्राम कॅल्शियमची गरज असते.

**१) दही:** दुधाच्या तुलनेत दह्यात अधिक कॅल्शियम असतो. एक कप साध्या दह्यात सुमारे ४८८ मिलीग्राम कॅल्शियम असतो. यामध्ये प्रोबायोटिक्स आणि प्रथिनांचाही चांगला स्रोत आहे. फळं घालून तुम्ही हे अधिक पौष्टिक बनवू शकता.

**२) फोर्टिफाइड संत्र्याचा रसः** संत्र्याच्या रसामध्ये नैसर्गिकरित्या कॅल्शियम नसतो, पण फोर्टिफिकेशनमुळे एक कप रसात ३४७ मिलीग्राम कॅल्शियम असतो. दूध न पिता रस प्यायचा पर्याय निवडणाऱ्यांसाठी हा एक चांगला पर्याय ठरतो.

**३) ओट मिल्क:** वनस्पती-आधारित दुधांमध्ये ओट मिल्क लोकप्रिय आहे. एक कप ओट दुधात ३५० मिलीग्राम कॅल्शियम असतो. यामध्ये प्रथिनं कमी असली तरी कॅल्शियम फोर्टिफिकेशनमुळे हे दूध उपयुक्त ठरतं.

**४) सॅल्मन मासाः** फॅटी फिश म्हणजे सॅल्मन हा आरोग्यासाठी अनेक प्रकारे फायदेशीर आहे. अर्धा कप सॅल्मनमध्ये ३१२ मिलीग्राम कॅल्शियम असतो. त्यासोबतच ओमेगा-३ फॅट्स आणि अनेक जीवनसत्त्वंही मिळतात.

**५) बदाम दूध :** वनस्पतीजन्य पर्यायांमध्ये बदामाचं दूध हे सर्वोत्तम आहे. फोर्टिफाइड बदामाच्या दुधात एक कपात ४४९ मिलीग्राम कॅल्शियम असतो. हे दूध लॅक्टोज इन्टोलरंट किंवा वेगन व्यक्तींसाठी उपयुक्त आहे.

**६) बदाम :** बदाम हे कॅल्शियमसाठी नैसर्गिक पर्याय आहे. एक कप बदामात ३८५ मिलीग्राम कॅल्शियम आढळतो. याशिवाय, हे हेल्दी फॅट्स, फायबर आणि अँटीऑक्सिडंट्सनी भरलेले असतात.

संपूर्ण आहार हा संतुलित असावा आणि कोणत्याही एकाच घटकावर अवलंबून राहू नये. दूध न पिणाऱ्यांसाठी वर उल्लेखलेले पर्याय उत्तम ठरू शकतात.

मात्र, कॅल्शियम शोषणासाठी व्हिटॅमिन डीही आवश्यक आहे, त्यामुळे सूर्यप्रकाशात थोडा वेळ घालवणं किंवा योग्य सप्लिमेंट घेणं उपयुक्त ठरतं.

# दाढदुखी होत असेल तर



दाढदुखी होत असेल तर काही घरगुती उपाय आहेत. कोमट पाण्यात मीठ मिसळून त्याने गुळण्या केल्यास सूज कमी होते आणि जंतूंचा संसर्ग होण्यास प्रतिबंध होतो. लवंगाचे तेल वेदना कमी करण्यासाठी प्रभावी आहे. दाढदुखीच्या दुखण्याच्या भागावर गालाच्या बाहेरच्या बाजूने थंड शेक लावल्याने सूज कमी होण्यास मदत होते. हायड्रोजन पेरॉक्साइडने गुळण्या केल्याने जंतू कमी होण्यास मदत होते, पण ते वापरण्यापूर्वी दंतवैद्याचा सल्ला घ्यावा.खाऱ्या पाण्याने स्वच्छ धुणे, लवंगाचे तेल, बर्फाचे पॅक आणि हर्बल टी यांसारखे अनेक घरगुती उपाय दाढदुखीच्या वेदनेपासून तात्पुरता आराम देऊ शकतात. आराम मिळेपर्यंत मऊ पदार्थ खा, सुन्न करणारे जेल वापरा किंवा हळदीची पेस्ट लावा, पण दोन दिवसांपेक्षा जास्त त्रास होत असल्यास किंवा ताप, सूज असल्यास त्वरित दंतवैद्याचा सल्ला घ्या. मोहरीच्या तेलात चिमूटभर मीठ घालून दात आणि हिरड्यांवर मसाज करा.

# फक्त एक महिना 'या' पिठाची भाकरी खा आणि गव्हाची चपाती विसरा



आजच्या धावपळीच्या जीवनात लोकांना स्वतःसाठी वेळ काढता येत नाही. त्यामुळे सकाळचा नाश्ता होत नाही, दुपारी जे मिळेल ते खाल्ले जाते आणि रात्री जड जेवण घेतले जाते. अशा चुकीच्या सवयींमुळे शरीरात चरबी साठते, वजन वाढते आणि त्यातून अनेक आजार उद्भवतात. अनेक जण वजन कमी करण्यासाठी महागड्या जिममध्ये जातात, महागड्या डाएट प्लॅनचे पालन करतात, विविध उपाय आजमावतात पण वजन काही केल्या कमी होत नाही.

परंतु, यावरचा सोपा उपाय तुमच्या स्वतःच्या किचनमध्येच लपलेला आहे. जर तुम्ही रोज गव्हाची चपाती खात असाल, तर ती बदला. तिच्या ऐवजी ज्वारी किंवा नाचणीची भाकरी खायला सुरुवात करा. हे दोन्ही पीठ शरीरासाठी पोषक असून, पचन सुधारते आणि अतिरिक्त चरबी कमी करण्यास मदत होते.

**ज्वारीची भाकरी -** फिटनेस आणि एनर्जीचा पॉवर हाऊस म्हणजे ज्वारी आहे. जे लोक जिममध्ये जातात आणि वर्कआऊट करून मसल्स बनवू इच्छीत आहेत त्यांच्यासाठी ज्वारीची भाकरी वरदान ठरू शकते. ज्वारीत प्रोटीनचे प्रमाण जास्त असते.त्यामुळे स्नायूंना ताकद मिळते आणि स्नायू कमजोर होण्यापासून वाचतात. ज्वारीत फायबर मोठ्या प्रमाणात असते. ज्यामुळे एक किंवा दोन भाकरी खाल्ल्यानंतर लगेच पोट भरते. त्यामुळे अनेक तास तुम्हाला भूक लागत नाही.त्यामुळे विनाकारण काहीही खाण्याला लगाम लागतो.

ज्वारी पचनासाठी चांगली असते. पोट फुगणे असा समस्यांपासून आपल्याला वाचवते. जर तुम्हाला वजन कमी करण्या सोबतच शरीराला फिट आणि एनर्जेटिक राखायचे असेल तर ज्वारी तुमच्यासाठी योग्य आहे.

नाचणीची भाकरी - नाचणीची भाकरी खाल्ल्याने तुम्ही बारीक होऊ शकता. आणि हाडे देखील मजबूत होतात. आयुर्वेदात नाचणीला पौष्टिक गुणांचा खजाना म्हटले आहे.ही केवळ वजन कमी करत नाही तर शरीराला आतून देखील मजबूत बनवते. नाचणीत दुधाहून अनेक पटीने कॅल्शियमचे प्रमाण जादा असते. नाचणीत ज्वारीपेक्षा जास्त फायबर असते. नाचणीची भाकरी खाल्ल्याने पोट असे भरते की तुम्हाला बराच काळ आणखी काही खाण्याची इच्छा होत नाही. ज्यामुळे कॅलरीचे इनटेक आपोआप कमी होते. वजन वेगाने कमी होते. तुम्ही जर केवळ बारीक न होता हाडांना देखील मजबूत करु इच्छीत असाल तर नाचणी तुमच्यासाठी महत्वाची आहे.

ज्वारी आणि नाचणी ही दोन्ही धान्ये चांगले पोषक आहेत. परंतू तुमचे लक्ष्य काय आहे ? जर वजन घटवणे आणि मसल्स टिकवून ठेवणे हे तुमचे लक्ष असेल तर ज्वारीच्या भाकरीची निवड करावी. जर लक्ष्य वजन घटवणे आणि हाडांना मजबूत करण्याचे असेल तर नाचणीची भाकरी तुमच्यासाठी योग्य पर्याय आहे. तर तुम्ही गव्हाच्या चपातीला काही काळ आराम द्यावा आणि हे दोन सुपरफूड भाकऱ्या ट्राय कराव्यात. काही आठवड्यातच तुम्हाला फरक जाणवेल.

# चेहरा सुंदर दिसण्यासाठी हे फूल वरदानापेक्षा कमी नाही



दिवाळीमध्ये बहुतांशी घराची सजावट करण्यासाठी झेंडूच्या फुलांचा वापर केला जातो. झेंडू केवळ देवासाठी किंवा सजावटीसाठी नाही तर, झेंडूचे फुल हे आपल्या सौंदर्यासाठी सुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे.

सौंदर्य टिकवण्यासाठी केवळ महागड्या वस्तू गरजेच्या नसतात. तर सौंदर्य टिकवण्यासाठी आपल्याकडे दूरदृष्टी आणि योग्य माहिती गरजेची असते. झेंडू हे एक असे फूल आहे जे प्रत्येक शुभ कार्यासाठी वापरले जाते. मुख्य म्हणजे झेंडूचे फूल हे बारमाही उपलब्ध असते. पूजा असो किंवा लग्न असो झेंडूच्या फुलाशिवाय सण समारंभ हा अपूर्ण असतो.

**झेंडूचे फुल त्वचेला लावण्याचे फायदे**

झेंडूच्या फुलात असलेले फ्लेव्होनॉइड्स सूर्याच्या हानिकारक किरणांपासून त्वचेचे संरक्षण करण्याचे काम करतात.

झेंडूच्या फुलात अँटीबॅक्टेरियल, अँटी-इंफ्लेमेटरी, अँटीऑक्सिडंट आणि सुखदायक गुणधर्म आहेत. यामुळे त्वचा निरोगी राहते.

झेंडूच्या फुलात त्वचेला उजळवण्याचे गुणधर्म आहेत. यामुळे त्वचेवरील काळे डाग, टॅनिंग आणि पिग्मेंटेशन कमी होतात.

झेंडूच्या पाकळ्यांपासून बनवलेले सीरम त्वचेला खोलवर हायड्रेट करते. पुरळ, लालसरपणा किंवा जळजळीची समस्या असेल तर हे फूल खूप फायदेशीर आहे.

आजकाल ताणतणाव, प्रदूषण, कमी झोप आणि सूर्याच्या अल्ट्राव्हायोलेट किरणांमुळे, अकाली वृद्धत्व सुरू होते. त्याचबरोबर त्वचेलाही नुकसान होते. अशा परिस्थितीत झेंडूची फुले त्वचेसाठी वरदानापेक्षा कमी नाहीत.

झेंडूच्या फुलांचा फेस पॅक करण्यासाठी ९-१२ पाकळ्या घ्या. त्या धुवून चांगल्या प्रकारे बारीक करा. आता त्यात १ चमचा बेसन, २ चमचे कच्चे दूध आणि १ चमचा गुलाबपाणी मिसळा. ही पेस्ट १५ मिनिटे चेहऱ्यावर लावा. सुकल्यानंतर चेहरा पाण्याने धुवा.

# ‘द ताज स्टोरी’ वादात



अभिनेते परेश रावल यांची प्रमुख भूमिका असलेला आगामी चित्रपट ’द ताज स्टोरी’ प्रदर्शनापूर्वीच वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. या चित्रपटाच्या आशयामुळे आणि त्याला सेन्सॉर बोर्डाने दिलेल्या प्रमाणपत्राविरोधात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने नकार दिला आहे. ३१ ऑक्टोबर रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे, मात्र ट्रेलर रिलीज होताच या वादाला तोंड फुटले आहे.

नेमकी याचिका कशासाठी?

’द ताज स्टोरी’ चित्रपटाच्या प्रदर्शनावर त्वरित बंदी घालावी आणि सेन्सॉर बोर्डाने (ण्ँइण) दिलेले प्रमाणपत्र रद्द करावे, अशी मागणी करणारी ही जनहित याचिका होती.

यासंदर्भात त्वरित सुनावणी व्हावी, अशी विनंती याचिकाकर्त्यांनी न्यायालयाला केली. मात्र, न्यायालयाने या केसमध्ये तातडीने सुनावणी करण्याची कोणतीही आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे, ही याचिका त्वरित सुनावणीसाठी यादीत (लिस्टमधील) समाविष्ट केली जाणार नाही, असा निर्णय न्यायालयाने दिला.

**इतिहासाची चुकीची मांडणी केल्याचा आरोप**

वकील शकील अब्दुल्ला यांनी दिल्ली उच्च न्यायालयात ही जनहित याचिका दाखल केली आहे. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी युक्तिवाद करताना सांगितले की, चित्रपटात इतिहासाची चुकीच्या पद्धतीने मांडणी करण्यात आली आहे. ज्यामुळे समाजात आणि दोन समुदायांमध्ये तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकार आणि सेन्सॉर बोर्डाला चित्रपटाच्या संभाव्य वाईट परिणामांची कल्पना असूनही त्यांनी कोणतीही कारवाई केलेली नाही, असा आरोपही याचिकाकर्त्याने केला आहे.

याचिकाकर्त्यांची मागणी काय?

याचिकाकर्त्याने सेन्सॉर बोर्डाला चित्रपटाच्या प्रमाणपत्राची पुन्हा एकदा समीक्षा करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी केली आहे. गरज पडल्यास चित्रपटाला ’अडल्ट सर्टिफिकेट’ द्यावे किंवा काही आक्षेपार्ह दृश्ये वगळण्याचा आदेश द्यावा.

तसेच, चित्रपटात ही कथा काल्पनिक असून ऐतिहासिक तथ्यांवर आधारित असल्याचा दावा करत नाही, असा ’डिस्क्लेमर’ (अस्वीकरण) जोडण्याची सूचनाही याचिकेत केली आहे.

**चित्रपटाची स्टारकास्ट आणि प्रदर्शनाची तारीख**

या चित्रपटाचा ट्रेलर १६ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित झाला होता आणि त्यानंतर लगेचच यावर वाद सुरू झाला.

# ‘बाहुबली: द एपिक’ सर्वात आधी परदेशात प्रदर्शित होणार



एसएस राजमौली यांचा ब्लॉकबस्टर ‘बाहुबली’ चित्रपटगृहांमध्ये येत आहे. परंतु हा चित्रपट आता एका आगळ्या शैलीत पाहायला मिळणार आहे.

‘बाहुबली: द एपिक’ नावाचा हा नवीन चित्रपट बाहुबली भाग १ आणि भाग २ ला असे मिळून करण्यात आलेला आहे. हिंदुस्थानातील चित्रपटगृहांमध्ये एकाच वेळी दोन भागांचा चित्रपट प्रदर्शित होण्याची ही पहिलीच वेळ आहे.

रविवारी, निर्मात्यांनी एक व्हिडिओ शेअर केला ज्यामध्ये प्रभासने गमतीशीरपणे प्रदर्शनाची तारीख जाहीर केली. तो म्हणाला, ‘हा चित्रपट ३१ ऑक्टोबर रोजी थिएटरमध्ये येईल.’ त्यानंतर तो हसत म्हणाला, ‘कदाचित.’ त्यानंतर स्क्रीनवर असे दिसले की, चित्रपटाचा परदेशात प्रीमियर २९ ऑक्टोबरला होणार आहे. हिंदुस्थानात प्रदर्शित होण्याच्या दोन दिवस आधी सुरू हा चित्रपट परदेशात रिलीज होणार आहे.

हा चित्रपट नवीन नसला तरी, त्याच्या पुनर्प्रदर्शनाबद्दल प्रचंड उत्साह आहे. इंडस्ट्री ट्रॅकर सॅकनिल्कच्या मते, जगभरात चित्रपटाचे आगाऊ बुकिंग ?५ कोटींपेक्षा जास्त झाले आहे. फक्त उत्तर अमेरिकेत ?२,००,००० किमतीचे तिकिटे (अंदाजे ?१.६ कोटी) आधीच विकली गेलेली आहेत. व्यापार तज्ञ म्हणतात की पुन्हा प्रदर्शित झालेल्या चित्रपटाला इतका जोरदार प्रतिसाद दुर्मिळ आहे आणि बाहुबलीचे चाहते अजूनही आहेत.

चित्रपटाचे सर्व मूळ कलाकार प्रभास, राणा दग्गुबाती, तमन्ना, अनुष्का शेट्टी, सत्यराज आणि रम्या कृष्णन परत मोठ्या पडद्यावर एकत्र दिसतील. पुन्हा रिलीज झाल्यामुळे, प्रेक्षकांना अमरेंद्र ते महेंद्र बाहुबली यांची संपूर्ण कथा एकाच वेळी, कोणत्याही व्यत्ययाशिवाय पाहता येईल. व्यापार तज्ञांच्या मते, हा अनुभव चित्रपटाला भावनिकदृष्ट्या अधिक प्रभावी बनवेल यात दुमत नाही.

‘बाहुबली: द एपिक’ हा चित्रपट हिंदुस्थानातील सर्वाधिक कमाई करणारा पुन्हा प्रदर्शित होऊ शकतो. काही तज्ञ असेही म्हणतात की हा चित्रपट स्वतःचाच विक्रम मोडू शकतो.

# सुपरहिट ‘कांतारा चॅप्टर १’ चित्रपट ओटीटीवर येण्यास सज्ज

ऋषभ शेट्टीची मुख्य भूमिका असलेल्या ‘कांतारा चॅप्टर १’ या चित्रपटाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या चित्रपटाने जगभरात दमदार कमाई केली आहे. बॉक्स ऑफिसवर मिळालेल्या यशानंतर, हा चित्रपट आता ओटीटी प्लॅटफॉर्मवर येण्यास सज्ज झाला आहे. ओटीटी प्लॅटफॉर्मच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवरून चित्रपटाच्या ओटीटी रिलीजची तारीख जाहीर करण्यात आली आहे.

ऋषभ शेट्टी दिग्दर्शित ‘कांतारा चॅप्टर १’ हा चित्रपट अमेझॉन प्राइम व्हिडीओ या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे.





# रजनीकांत यांना धमकीचा ई-मेल

रजनीकांत यांच्या पोएस गार्डन येथील घराच्या इथे बॉम्ब ठेवल्याचा धमकीचा ई-मेल आला. बॉम्ब असल्याची माहिती मिळताच पोलीस आणि बॉम्ब निकामी करणारे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

मात्र तपासणीनंतर हे ई-मेल खोटे असल्याचे निदर्शनास आले. तामीळनाडूतल्या डीजीपी कार्यालयाकडून हा ई-मेल घरात बॉम्ब ठेवण्यात आला आहे, असे लिहिले होते. पोलिसांनी ई-मेल खोटे असल्याचे जाहीर केले. यानंतर रजनीकांत यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली.

# ‘त्याने स्वतःच्या स्वप्नांची आहुती दिली’

बॉलिवूड अभिनेत्री आणि माजी मिस युनिव्हर्स सुष्मिता सेन तिच्या आत्मविश्वासपूर्ण आणि मोकळ्या स्वभावासाठी ओळखली जाते. आपल्या आयुष्यातील प्रसंग ती नेहमीच खुलेपणाने जगासमोर मांडते. अलीकडेच सुष्मिताने तिच्या पहिल्या बॉयफ्रेंडबद्दल एक भावनिक आठवण सांगितली, ज्यांनी तिच्या स्वप्नांसाठी स्वतःची स्वप्नं त्यागली होती.

ही गोष्ट आहे रजत तारा यांची. सुष्मिता सेनचे पहिले प्रेम. सुष्मिताने १९९४ मध्ये मिस युनिव्हर्स किताब जिंकला आणि पहिली भारतीय महिला म्हणून इतिहास घडवला. त्या काळात रजत तारा यांनी तिच्या आयुष्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. म्हणतात, सुष्मिताला यशस्वी होण्यासाठी त्यांनी स्वतःची नोकरी सोडली होती.



सुष्मिताने ‘जीना इसी का नाम है’ या फारूख शेख यांच्या लोकप्रिय टॉक शोमध्ये या गोष्टीचा खुलासा केला होता. तिने सांगितले, ‘मी मिस इंडिया जिंकल्यानंतर मुंबईत ट्रेनिंगसाठी जाण्याचा निर्णय घेतला होता, पण तो माझ्यासाठी अवघड होता. रजतने माझ्या कुटुंबाला विश्वास दिला की तो माझ्यासोबत जाईल, जेणेकरून मला एकटं वाटू नये.’

त्यावेळी रजत कपड्यांच्या प्रसिद्ध ब्रँड बेनेटन मध्ये काम करत होते. सुष्मिता म्हणाली, ‘त्यांनी आपल्या बॉसला सांगितलं की मला एका महिन्याची सुट्टी हवी आहे, नाही दिलीत तर काही हरकत नाही. आणि त्यांना नोकरीवरून काढून टाकलं गेलं. पण त्यांच्या आधाराशिवाय मी मुंबईत एक महिना सुद्धा टिकू शकले नसते.’

सुष्मिताने भावनिकपणे म्हटलं, ‘त्यांनी स्वतःच्या स्वप्नांची बळी दिली, जेणेकरून मी माझी स्वप्नं पूर्ण करू शकले. त्यांचं माझ्यावर असलेलं प्रेम आणि विश्वास मी कधी विसरू शकत नाही.

# कंगना रणौतला कोर्टाचा दिलासा

अभिनेत्री आणि भाजप खासदार कंगना रणौत हिला वादग्रस्त ट्वीट प्रकरणी कोर्टानं दिलासा दिला आहे. देशात झालेल्या शेतकरी आंदोलनाशी संबंधित एक ट्वीटमुळे अडचणीत आल्यानंतर भटिंडा न्यायालयाने तिला जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी २४ नोव्हेंबर रोजी होणार आहे.



एका वृद्ध महिलेनं कंगनावर चुकीच्या पद्धतीने तिची ओळख करून दिल्याचा आणि तिच्याबाबदल अपमानास्पद टिप्पणी केल्याचा आरोप केला होता.कंगना हिला शेतकरी आंदोलनाशी संबंधित एका ट्वीटमुळे कायदेशीर अडचणींचा सामना करावा लागला. या प्रकरणात महिंदर कौर यांनी कंगनावर खोट्या आरोपांचे आणि वक्तव्यांचे आरोप केले होते. या प्रकरणी दाखल झालेल्या तक्रारींनंतर, बथिंडा न्यायालयानं कंगनाला जामीन मंजूर केला आहे. कंगनाने न्यायालयात तक्रारदाराची माफी मागण्याची इच्छा व्यक्त केली होती. कारण हा वाद गैरसमजूतीतून झाला होता. मात्र महिंदर कौर आजारी असल्याने त्यांचे पती न्यायालयात उपस्थित होते. हा मुद्दा केवळ महिंदर कौर यांचाच नव्हता तर शेकडो आंदोलक शेतकऱ्यांचाही होता. त्यामुळं न्यायालयाने महिंदर कौर यांच्या विचारले असता. त्यांनी सांगितले की स्वतः निर्णय घेऊ शकत नाहीत आणि किसान युनियन व इतरांशी चर्चा केल्यानंतरच कळवतील असे सांगितले.

कंगनानं एक ट्वीट रीट्वीट केलं होत. यात लिहिलं होत की, ’हा हा हा, ही तीच आजी आहे. जी टाइम मॅगझीनमध्ये सर्वात प्रभावशाली भारतीय म्हणून आली होती. आता ती १०० रुपयांनाही आंदोलनासाठी उपलब्ध आहे’. या ट्वीटमध्ये ज्या वृद्ध महिलेचा फोटो होता त्या भटिंडा येथील रहिवासी महिंदर कौर होत्या. दुसरीकडं, किसान मजदूर मोर्चाचे नेते मनजीत राय यांनी कंगनाकडून महिंदर कौर यांची प्रत्यक्ष माफी मागण्याची मागणी केली आहे. शेतकरी नेत्यानं म्हटलं की , ’कंगनाने न्यायालयाकडून बोलावल्यावर माफी मागितली, पण आम्ही जेव्हा तिला माफी मागायला सांगितली तेव्हा तिनं मागितली नाही’

न्यायालयाबाहेर पत्रकारांशी बोलताना, कंगना रणौत म्हणाली की तिला भटिंडा इथं येऊन खूप आनंद झाला.

# प्रवासी नियमावली आली, पण सुरक्षिततेचे काय?

शयनयान बसमधल्या वाढत्या अपघातांमुळे सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. या अपघातात प्रवासी गंभीर जखमी होतात किंवा त्यांचा मृत्यू होतो, काही दिवसांपूर्वीच कर्नूल येथे दुचाकीला धडकल्यानंतर बसला आग लागून २० जणांचा मृत्यू झाला. शयनयान बसच्या अपघातांसाठी अनेक कारणे असतात, ज्यात बसची किचकट रचना, प्रवासी गाढ झोपेत असणे आणि आपत्कालीन परिस्थितीतून बाहेर पडण्यात येणाऱ्या अडचणीमुळे मानवी प्राणहानी मोठ्या प्रमाणात होते.

सध्या या गोष्टी चर्चेला येण्याची कारणे म्हणजे गेल्या दिवसात या बसच्या अपघातात झालेली वाढ ही आहे. १० ते २४ ऑक्टोबर या केवळ १२ दिवसांत देशभरात वेगवेगळ्या ठिकाणी १२ शयनयान बसला अपघात झालेत. कर्नूल अपघात घटनेत हैदराबादहून बंगळूरुला जाणारी स्लीपर बस एका दुचाकीला धडकली, त्यानंतर बसला भीषण आग लागली यात २० प्रवाशांचा मृत्यू झाला आणि अनेकजण जखमी झाले. कारण म्हणे तर अपघातानंतर बसमधील एका प्रवाशाच्या बॅटरीचा स्फोट झाला आणि बसमध्ये आग लागली. बसमधील प्रवासी गाढ झोपेत होते, ज्यामुळे ते आगीतून बाहेर पडू शकले नाही. आग्रा-लखनऊ एक्स्प्रेसवे अपघात (जुलै २०२४) एका स्लीपर बसने टँकरला धडक दिली. यात १८ जणांचा मृत्यू झाला. कारण काय तर जोरदार धडकेमुळे बसचे मोठे नुकसान झाले. स्लीपर बस अपघातांची कारणे शोधता, असे लक्षात येते की, अपघातावेळी प्रवाशांना बाहेर पडणे कठीण होते, कारण बसच्या डिझाइनमुळे आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग बंद होतात. काही



बसेसमध्ये एकावेळी ३० ते ४० प्रवासी बसू शकतात, ज्यामुळे बाहेर पडण्यात अडचणी निर्माण होतात.

शयनयान बसमध्ये प्रवासी झोपलेले असल्याने, अपघात झाल्यावर लगेच प्रतिसाद देणे शक्य होत नाही. अपघातानंतर आगीमुळे किंवा इतर कारणांमुळे लोकांना लगेच मदत मिळणे कठीण होते आणि प्राणहानी वाढते. सध्या वाहतूक मंत्रालय स्लीपर बसच्या डिझाइनमधील त्रुटी दूर करण्यासाठी विचार करत आहे. मात्र ही चर्चा केवळ एखादा मोठा अपघात झाला की होते आणि पुन्हा सर्व आहे तशीच होते. अपघाताच्या वेळी सुरक्षित बाहेर पडता यावे यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. बसची नियमित देखभाल करणे आणि टायरची तपासणी करणे हे अपघाताची शक्यता कमी करण्यासाठी महत्त्वाचे आहे. शयनयान (स्लीपर) बसच्या अपघातांची वाढ ही चिंतेची बाब आहे.अपघातांचे मुख्य कारण म्हणजे मर्यादित जागेमुळे प्रवाशांना आपत्कालीन परिस्थितीतून बाहेर पडणे कठीण होते, ज्यामुळे मृत्यू आणि दुखापतीची संख्या वाढते. याशिवाय, काही बसेसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आणि सीट बेल्ट सारख्या सुरक्षा उपकरणांचा अभाव आहे, ज्यामुळे अपघातांची जोखीम अधिक वाढत आहे. या बसेसच्या डिझाइनमध्ये त्रुटी असतात. काही डिझाइनमध्ये प्रवाशांना अपघाताच्या वेळी बाहेर पडण्यासाठी योग्य मार्ग नसतात, ज्यामुळे ते अडकून राहू शकतात.

आज स्लीपर बाबतीत म्हणायला गेलं तर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची काय स्थिती आहे. आज एसटीकडे एकूण २५० स्लीपर बस आहेत त्यात स्लीपर सीटर २०० असून संपूर्ण शयनयन बस या ५० आहेत. या संपूर्णपणे श्रेणी प्रकारातील आहेत मात्र या सर्व बस साध्या बस गाड्या आहेत त्या वातानुकूलित नाहीत. मात्र आज या बस गाड्यांची अवस्था पाहता या बसमध्ये बसावे की झोपावे हे काहीच कळत नाही इतकी बिकट अवस्था आज महामंडळाने या स्लीपर बस गाड्यांची करून ठेवली आहे यात सर्व आपत्कालीन दरवाजे हे पत्र ठोकून बंद करण्यात आले आहेत त्यामुळे एखाद्या कठीण प्रसंगी प्रवाशांच्या जीवावर बेतण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यात बसच्या पडद्यांची अवस्था वाईट असून तर काही बसला पडदेच नाहीत. प्रवाशांना आपत्कालीन दरवाजे तसेच त्या बाबत सूचना करण्याची कोणतीच यंत्रणा नाही या बस गाड्या रात्री प्रवास करून झाल्यानंतर साफसफाई केल्या जात नाहीत त्यामुळे आतमध्ये बस गाड्यांची अवस्था अत्यंत बिकट झालेली दिसते. एसटी महामंडळाच्या या बस गाड्या सध्या सर्रास दिवसा धावताना दिसतात, तर काही छोट्या व लोकल मार्गांवरही स्लीपर बस गाड्या पाठवल्या जातात रात्री प्रवास करून झाला की दिवसा या बस गाड्या लोकल बस मार्गावर चालवल्या जातात व पुन्हा रात्री चालवल्या जातात त्यामुळे बस गाड्यांची अवस्था अत्यंत बिकट होऊन बसली आहे. संपूर्ण पैसे मोजूनही व वारंवार तक्रारी करूनही एसटी महामंडळ त्याकडे लक्ष देत नाही विशेष म्हणजे या शयन यान बस गाड्यांचा एक वेगळा ब्रँड तयार करावयास व्हावा होता मात्र एसटीला ते जमले नाही.

**गेल्या अनेक दशकांपासून भारतात स्त्री - पुरुष प्रमाणातील वाढती दरी चिंतेचा विषय ठरत आली आहे. सरकारने अनेक जनजागृती मोहिमा राबवल्या, 'बेटी बचाओ – बेटी पढाओ' सारखी घोषवाक्ये दिली, कायदे केले, पण परिणाम फारसा दिसून आला नाही. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची घटती संख्या आजही समाजाच्या आरशात एक काळी सावली म्हणून उभी आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे भ्रूणहत्या, म्हणजेच गर्भातील बालिकेचा जन्म होण्यापूर्वीच तिचा अंत करणे. भारतात ही एक सामान्य सामाजिक प्रथा बनली आहे.**

# स्त्री-पुरुष प्रमाणातील वाढती दरी

मच्छिंद्रा ऐनापुरे



**आ**जचा भारत विज्ञान, तंत्रज्ञान आणि शिक्षणाच्या क्षेत्रात झपाट्याने प्रगती करीत असला तरी समाज रचनेच्या एका अत्यंत नाजूक पैलूवर अजूनही अंधार आहे, तो म्हणजे मुलगा-मुलगी लिंग गुणोत्तरातील वाढता असमतोल. ही केवळ आकड्यांची गोष्ट नाही. ही एका समाजाची विचारसरणी, संवेदनशीलता आणि मानवी मूल्यांच्या अधःपतनाची जिवंत कहाणी आहे.

गेल्या अनेक दशकांपासून भारतात स्त्री-पुरुष प्रमाणातील वाढती दरी चिंतेचा विषय ठरत आली आहे. सरकारने अनेक जनजागृती मोहिमा राबवल्या, 'बेटी बचाओ – बेटी पढाओ' सारखी घोषवाक्ये दिली, कायदे केले, पण परिणाम फारसा दिसून आला नाही. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची घटती संख्या आजही समाजाच्या आरशात एक काळी सावली म्हणून उभी आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे भ्रूणहत्या, म्हणजेच गर्भातील बालिकेचा जन्म होण्यापूर्वीच तिचा अंत करणे. भारतात ही एक सामान्य सामाजिक प्रथा बनली आहे, जी अत्यंत वेदनादायक आणि लज्जास्पद आहे.

'प्यू रिसर्च सेंटर'च्या अहवालानुसार, सन २००० ते २०१९ दरम्यान भारतात तब्बल ९० लाख भ्रूणहत्या झाल्या. यात ८६.७ टक्के हिंदू समाजात, ४.९ टक्के शिखांमध्ये आणि ६.६ टक्के मुस्लिम समाजात झाल्याची नोंद आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, ०-६ वर्षे वयोगटातील प्रत्येक हजार मुलांमागे केवळ ९१४ मुली होत्या, जे १९९१ मधील ९४५ प्रमाणापेक्षा कमी आहे. म्हणजेच मुलींचा जन्म दर सातत्याने घटतो आहे.

सरकारने भ्रूणलिंग चाचणीवर बंदी घालणारा कायदा पारित केला आहे. तरीदेखील हजारो दवाखान्यांत आजही गुप्तपणे भ्रूणलिंग चाचण्या होत आहेत. राज्य सरकारांकडे सर्व क्लिनिकवर नियंत्रण ठेवण्याइतके मनुष्यबळ आणि साधने नाहीत. परिणामी, हा बेकायदेशीर व्यवहार आजही फोफावत आहे. याहून अधिक चिंताजनक बाब म्हणजे पूर्वी जिथे मुलींचा आदर राखला जात होता अशा जम्मू-कश्मीर, हिमाचल किंवा ईशान्येकडील राज्यांतही आता ही प्रवृत्ती दिसू लागली आहे. श्रीनगर, पंजाब, हरयाणा, उत्तराखंड आणि राजस्थानसारखी राज्ये लिंग असंतुलनाच्या गर्तेत अडकत आहेत.

मुलींबद्दलची नकारात्मक मानसिकता ही या समस्येचे खरे कारण आहे. मुलीचा संघर्ष ती आईच्या गर्भात येते तेव्हाच सुरू होतो. तिच्या जन्माच्याच अधिकारासाठी तिला झगडावे लागते आणि ती जन्मली तरी जगण्याच्या प्रत्येक टप्प्यावर तिला समाजाच्या दृष्टिकोनाशी लढावे लागते.

वारंवार होणाया गर्भपातांमुळे स्त्रियांच्या आरोग्यावर घातक परिणाम होतात. त्यांच्या शरीरावर मानसिक आणि शारीरिक ताण वाढतो. याशिवाय मुलींची संख्या घटल्याने महिलांविरुद्ध हिंसाचार, अपहरण आणि बलात्काराच्या घटनांत वाढ होत आहे. अनेक ठिकाणी विवाहासाठी महिलांचे अपहरण, जबरदस्ती विवाह आणि मानहानीकारक प्रथा वाढताना दिसतात.

सरकारच्या लोकसंख्या नियंत्रण मोहिमांमध्येही काही गंभीर त्रुटी आहेत. आंध्र प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रासारख्या राज्यांमध्ये दोनपेक्षा जास्त मुले असलेल्या पालकांना काही सरकारी सुविधा किंवा नोकरीत प्रवेश नाकारला जातो. याचा परिणाम असा होतो की, काही कुटुंबांमध्ये मुलगा हवा ही मानसिकता अधिक घट्ट बसते.

कारण मुलगा झाला की, वंश चालू राहील, अशी भीती पालकांच्या मनात असते आणि त्यामुळे मुलींचा जन्म टाळण्याचा प्रवाह वाढतो. या चुकीच्या धोरणांचा एक अप्रत्यक्ष परिणाम म्हणजे अनेक राज्यांत तरुणांना विवाहासाठी वधू मिळेनाशा झाल्या आहेत. गरीब भागांतील मुलींची 'खरेदी-विक्री' करून विवाह करण्याच्या घटना वाढल्या आहेत. दलालांच्या माध्यमातून चालणारा हा मानवी व्यापार समाजाच्या मुळावर घाव घालतो आहे. ही स्थिती फक्त ग्रामीण नव्हे, तर शहरी भागातही झिरपत आहे.

लिंग गुणोत्तरातील हा असमतोल फक्त आकडेवारीत नाही; तो संपूर्ण सामाजिक संतुलन बिघडवणारा स्फ्हटक घटक आहे. जेव्हा समाजात पुरुषांची संख्या प्रचंड वाढते आणि महिलांची घटते तेव्हा गुन्हे, हिंसा, अपहरण, लैंगिक अत्याचार, बहुपत्नीत्व आणि स्त्रियांचा व्यापारी वापर वाढतो. एका संवेदनशील, न्यायप्रिय समाजासाठी ही स्थिती अत्यंत लाजिरवाणी आहे. स्त्री ही केवळ आई किंवा पत्नी म्हणून नव्हे, तर समाजाच्या उभारणीतील समान भागीदार आहे हे आपण विसरत चाललो आहोत.भ्रूणहत्या हा केवळ कायदेशीर गुन्हा नाही, तर तो नैतिक आणि मानवी गुन्हा आहे. या प्रवृत्तीवर मात करण्यासाठी प्रत्येक कुटुंब, प्रत्येक पालक आणि प्रत्येक नागरिकाने जागरूक होणे अत्यावश्यक आहे. आपण समाजात असा संदेश पोहोचवायला हवा की, मुलगी ओझे नाही, ती समाजाची आणि देशाची खरी ताकद आहे.

प्रत्येक मुलीच्या जन्माचा उत्सव साजरा करा. तिच्या शिक्षण, आरोग्य आणि स्वावलंबनाची जबाबदारी स्वीकारा. मुलगा आणि मुलगी यात भेद नाही ही भावना बालपणापासूनच रुजवली पाहिजे. सरकारनेही भ्रूणहत्या थांबवण्यासाठी कठोर अंमलबजावणी.

क्लिनिकवर नियंत्रण आणि समाज माध्यमांद्वारे जनजागृती अधिक प्रभावीपणे करणे आवश्यक आहे. शाळा, कॉलेज, पंचायत स्तरावर स्त्री समानतेचे शिक्षण देणे ही काळाची गरज आहे.

जर आपण मुलींचे रक्षण केले नाही, त्यांना शिक्षण आणि सन्मान दिला नाही तर समाजाचा कणा मोडेल.

# निम्म्या देशाची छाननी



**दे**शातल्या एकूण मतदारांपैकी साधारण निम्म्या मतदारांच्या मतदार याद्यांतील नोंदींची सखोल छाननी निवडणूक आयोगाने सोमवारी जाहीर केली. १२ राज्यांतल्या सुमारे ५१ कोटी मतदारांची छाननी या टप्प्यात होणार आहे. पहिला टप्पा केवळ बिहार राज्याचा झाला (आणि तो बराच गाजला!) निवडणुकीच्या ऐन तोंडावर २४ जून २०२५ रोजी निवडणूक आयोगाने तिथल्या मतदार याद्यांची छाननी जाहीर केली. ऑक्टोबर - नोव्हेंबरदरम्यान तिथे निवडणुका होणार हे आयोगाला माहीत होतं. तरीही त्यांनीही छाननी जाहीर केली आणि स्वतःलाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलं. विरोधक आधीच मतदानाचे वेगवेगळे आकडे मांडून प्रश्न उपस्थित करत होते. 'वोट चोरी'च्या मुद्द्यावरून निवडणूक आयोगाला लक्ष्य करत होते. त्या वातावरणात सगळ्यांचं लक्ष वळवण्यासाठी का होईना, पण आयोगाने घाईघाईने ही छाननी जाहीर केली. त्यासाठीचे निकष, कार्यपद्धतीबाबत अंतिम निर्णय झाले नसताना, मार्गदर्शक कार्यप्रणाली तयार नसताना झालेल्या घोषणेमुळे विरोधकांचं फावलं. त्यांनी आयोगाला जागोजागी खिंडीत पकडलं. मतदाराच्या नोंदणीसाठी ग्राह्य धरल्या जाणाऱ्या कागदपत्रात आधार कार्डाचा समावेश असणार की नाही, हा मुद्दा तर सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेला. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश आयोगाला मान्य करावे लागले. व्यक्तीची नागरिकता मान्य किंवा अमान्य करण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला असू शकतो का? हा प्रश्नही त्या छाननी दरम्यान उपस्थित झाला होता. पालकांच्या कागदपत्रांच्या आधारे त्यांच्या वारसांच्या नोंदी अधिकृत ठरविण्याचा मुद्दाही शेवटी न्यायालयातच पोहोचला. बिहारमध्ये अनाथाश्रमात वाढलेल्या अनेक मुलांनी आयोगाच्या या तरतुदीला आव्हान दिलं. हा मुद्दाच नोंद अधिकृत वा अनधिकृत ठरवण्याच्या यादीत वगळावा, अशी त्यांची मागणी होती. त्याची तड कशी लागली, ते समजलं नाही, त्यामुळे, दुसरा टप्पा सुरू होण्यापूर्वी आयोगाने पहिल्या टप्प्यात उपस्थित झालेले सर्व प्रश्न आणि त्यावर आयोगाने घेतलेली भूमिका आपल्या वेबसाईटवर सुस्पष्टपणे मांडावी; त्यातून पुन्हा कोणाला नवे प्रश्न उपस्थित करण्याची संधी मिळणार नाही, अशी सूचना केली जाते आहे.

या टप्प्यासाठी आयोगाने स्वतःला पुरेसा वेळ दिला आहे, ही समाधानाची बाब आहे. दुसऱ्या टप्प्यात ज्या केंद्रशासित प्रदेशांचा आणि राज्यांचा समावेश आहे, त्यात राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल ही मोठी राज्यं आहेत. तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल ही विरोधी पक्षांची सरकारं असलेली राज्यं आहेत. या दोन्ही राज्यातले सत्ताधारी पक्ष आणि त्यांचे नेते, म्हणजे तिथले मुख्यमंत्री किती आक्रमक आहेत, याची कल्पना पूर्ण देशाला आहे. बिहारच्या छाननीवेळी विरोधकांनी काही विशिष्ट मतदारांची नावं यादीतून घाऊकरीत्या वगळली जात आहेत, असा आरोप केला होता. पण, छाननी होऊन निवडणुका घोषित झाल्या, तरी त्या तक्रारीचा कोणी पुनरुच्चार केलेला दिसत नाही. तो आरोप किती पोकळ होता, हे यावरून लक्षात येतं.

# वाद टाळा...



**दे**शाच्या निवडणूक आयोगाने १२ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ४ नोव्हेंबरपासून मतदार याद्यांचे शुद्धीकरण, म्हणजेच एसआयआर प्रक्रिया राबवण्याची घोषणा केली आहे. या योजनेनुसार ९ डिसेंबर रोजी प्रारूप मतदार यादी जाहीर केली जाईल आणि ७ फेब्रुवारीला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. ज्या राज्यात मतदार याद्यांचे हे शुद्धीकरण होणार आहे, त्यामध्ये गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल अशा महत्त्वाच्या राज्यांचा समावेश आहे.

महाराष्ट्रात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्था होऊ घातल्याने तूर्त महाराष्ट्रात या टप्प्यात ही प्रक्रिया राबवली जाणार नाही. बिहारप्रमाणेच केवळ एका महिन्यात प्रत्येक राज्यात ही मतदार यादी शुद्धीकरण प्रक्रिया राबवली जाईल. ही सगळी मोठी राज्ये आहेत. बिहारमध्येही इतक्या मोठ्या राज्यात केवळ एक महिन्यात संपूर्ण मतदार यादींचे शुद्धीकरण कसे होईल असा आक्षेप घेतला गेला होता, तोच प्रकार येथेही होताना दिसत आहे. उत्तर प्रदेशात बिहारपेक्षाही अधिक मतदार आहेत. तेथेही एका महिन्यात ही प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. त्यामुळे तेथेही वादाला मोठा वाव राहणार आहेच. पश्चिम बंगालमध्येही हीच स्थिती आहे.

ही सगळी प्रक्रिया केवळ एका महिन्यातच उरकण्याचा निवडणूक आयोगाचा का आग्रह आहे असे आक्षेप आतापासूनच सुरू झाले आहेत. बिहारमध्ये जेव्हा ही एसआयआर प्रक्रिया राबवली गेली, त्यावेळी त्यात तब्बल ६५ लाख मतदार वगळण्यात आले होते. त्यातून प्रचंड गदारोळ झाला. विरोधकांनी थेट संसदेत यावर आवाज उठवत संसदेचे संपूर्ण अधिवेशन दणाणून सोडले, तरीही निवडणूक आयोगाने आपली प्रक्रिया तशीच पुढे रेटली. त्यामुळे हा विषय सर्वोच्च न्यायालयात गेला आणि सर्वोच्च न्यायालयाने अनेक बाबींना आक्षेप घेत निवडणूक आयोगाला वठणीवर आणण्याचा प्रयत्न केला.

आता पुन्हा असाच प्रकार या १२ राज्यांतही होणार आहे काय हा मुख्य प्रश्न आहे. मतदार याद्यांचे शुद्धीकरण करताना काही मूलभूत पथ्य पाळली पाहिजेत. यापूर्वी सन २००३ मध्ये पहिल्यांदा मतदार यादी शुद्धीकरण कार्यक्रम हाती घेतला गेला होता, पण त्यावेळी त्यासाठी काय निकष ठरवले त्याचे पत्रक दाबून ठेवले गेले. पण विरोधकांनी त्यावेळचे ते परिपत्रक मिळवले आणि बिहारमध्ये जी मतदार शुद्धीकरण प्रक्रिया राबवली गेली त्यात याचा अवलंब केला गेला नाही हे दिसून आले. ६५ लाख मतदार वगळताना नेमके काय निकष लावले याविषयी वेगवेगळी माहिती प्रत्येक टप्प्यावर पुढे केली गेली.

या प्रक्रियेमध्ये निवडणूक आयोगाचा बीएलओ प्रत्येक घरी जाणे अपेक्षित आहे. त्याने स्वतः मतदार यादीत ज्यांची नावे आहेत ते हयात आहेत का आणि ते नोंदवले गेलेल्या पत्त्यावरच राहत आहेत का याची शहानिशा करणे अपेक्षित आहे. पण बिहारमध्ये बीएलओ घराघरात गेलेच नाहीत, त्यांनी ऑफिसमध्ये किंवा घरी बसूनच मनमानी पद्धतीने ही यादी तयार केली. याचे स्टिंग ऑपरेशन एका वाहिनीने केले होते, ते खूप गाजले होते. पण यातल्या कुठल्याही आक्षेपाना धूप न घालता निवडणूक आयोग आपल्या पद्धतीनेच कार्यरत राहिला. शेवटी ज्या ६५ लाख मतदारांची नावे वगळली गेली आहेत त्यांची डिजिटल यादी सर्वच पातळ्यांवर प्रकाशित करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाला द्यावा लागला होता.

नुसती यादी जाहीर करून भागणार नाही तर संबंधित मतदारांची नावे का वगळली याचे कारणही तेथे नमूद करायला सांगितले गेले होते. आता हा सगळा मागचा अनुभव पाहता १२ राज्यांत ही जी शुद्धीकरण प्रक्रिया राबवली जाणार आहे त्यात कुठेही शंकेला वाव राहणार नाही याची काळजी घेण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची आहे. ही शुद्धीकरण प्रक्रिया राबवताना नेमके कोणते निकष लावले जाणार आहेत आणि प्रक्रिया नेमकी कशा पद्धतीने पार पडणार आहे याची सगळी माहिती निवडणूक आयोगाने आत्ताच दिली पाहिजे. मतदार यादीमध्ये कसा घोळ होतो याचे पुराव्यासह सादरीकरण अलीकडेच रोहित पवार आणि आदित्य ठाकरे यांनी सर्वांच्या पुढे केले आहे.

कोणाचेही बनावट आधार कार्ड तयार करणे सहज शक्य आहे आणि त्या आधारे कुठल्याही मतदारसंघात मतदार नोंदणी करणे पण शक्य आहे हे रोहित पवार यांनी पुराव्यासह दाखवून दिले होते. त्यावेळी त्यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या नावाने आधार कार्ड काढून त्यांची मतदार म्हणून नोंदणी केली होती आणि हे प्रात्यक्षिक त्यांनी सर्वांच्या पुढे सादर केले होते. त्यामुळे नव्याने होणारी एसआयआर प्रक्रिया निर्धोक असावी यासाठी निवडणूक आयोगाला प्रत्येक पातळीवर काळजी घ्यावी लागणार आहे.

प्रख्यात निवडणूक तज्ज्ञ योगेंद्र यादव यांचे असे म्हणणे आहे की ही नवीन प्रक्रियाही सुरक्षित नाही, उलट नेम धरून ठराविक मतदार, मतदार यादीतून काढण्यासाठी निवडणूक आयोग आता शार्प शूटर पद्धत अवलंबणार आहे.ही मतदार शुद्धीकरण प्रक्रिया नसून नागरिकांचे नागरिकत्व तपासण्याची प्रक्रिया आहे असेही योगेंद्र यादव यांचे म्हणणे आहे. त्यामुळे यातील प्रत्येक आक्षेपाला निवडणूक आयोगाने नेमकेपणाने उत्तर देऊन त्याबाबत काय दक्षता घेतली जाणार आहे याचा खुलासा जनतेपुढे वेळीच करायला हवा.

# अर्थव्यवस्थेत 'हाउ इज द जोश?'

हेमंत देसाई



**ए**कीकडे अतिवृष्टीमुळे कृषी उत्पादनास फटका बसणार असला, तरीदेखील कारखानदारी क्षेत्राचा विकास चांगला आहे, हे भारतीय अर्थव्यवस्थेसाठी शुभलक्षणच मानावे लागेल.

देशातील सरकारी बँकांमध्ये १९ टक्क्यांपर्यंत थेट परकीय गुंतवणुकीला परवानगी देण्याची योजना केंद्राकडून आखली जात आहे. सध्या ही मर्यादा २० टक्के असून, नव्या धोरणानंतर फार मोठ्या प्रमाणात परदेशी भांडवल भारतात येईल, असे दिसते. सध्या सर्वच, म्हणजे १२ राष्ट्रीयीकृत बँकांमधील सरकारची मालकी ५१ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. याउलट खासगी बँकांमध्ये ७४ टक्के मर्यादेपर्यंत परदेशी भांडवलास परवानगी आहे. त्यामुळे अलीकडेच दुबईतील एमिरेट्स एनबीडीने आरबीएल या खासगी बँकेतील ६० टक्के हिस्सा ३०० कोटी डॉलर देऊन खरेदी केला आहे. तर जपानच्या सुमितोमो मित्सुई बँकिंग कॉर्पने येस बँकेतील २० टक्के हिस्सा १६० कोटी डॉलरला विकत घेतला आहे.

सध्या राष्ट्रीयीकृत असलेल्या कॅनरा बँकेत, सर्वाधिक, म्हणजे १२ टक्के विदेशी भांडवल आहे. बँकांमधील परकीय गुंतवणुकीची मर्यादा वाढवली गेल्यानंतर अर्थव्यवस्थेतील तेजी वाढू शकते. भारताच्या अर्थव्यवस्थेची सुदृढ गती कायम असून, धोरणात्मक सुधारणा आणि काबूत आलेली भाववाढ यामुळे चालू आर्थिक वर्षात उत्तम प्रगती होईल, असे भाकित केंद्रीय आर्थिक कामकाज मंत्रालयाने आपल्या ताज्या अहवालात व्यक्त केले आहे. अमेरिका-चीन यांच्या दरम्यान व्यापारचर्चेत प्रगती दिसून आल्यामुळे तसेच भारत-अमेरिका व्यापार करार लवकरच होणार असल्याच्या शक्यतेमुळे उत्साहाचे वातावरण आहे.

देशांतर्गत आघाडीवर आर्थिक कामगिरी उत्तम असल्याचे दर्शवत, भारतीय रिझर्व्ह बँकेने चालू आर्थिक वर्षासाठी आर्थिक वाढीचा अंदाज ६.८ टक्क्यांपर्यंत वाढवला आहे. याआधीचा अंदाज ६.५ टक्के असा होता. सामान्य सरासरीपेक्षा अधिक झालेला पाऊस आणि जीएसटीकपातीचा परिणाम म्हणून महागाईदराचा अंदाजही २.६ टक्क्यांपर्यंत कमी केल्याचे रिझर्व्ह बँकेने जाहीर केले आहे. रिझर्व्ह बँकेने रेपोदर ५.५ टक्क्यांवर अपरिवर्तित ठेवण्याचा कौल दिला आहे.

मात्र त्याचवेळी अमेरिकेच्या ५० टक्के करआकारणीच्या धक्क्यातून अर्थव्यवस्थेला पाठबळ देण्यासाठी येत्या काही महिन्यांत व्याजदर कपातीची शक्यता असल्याचे संकेतही रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिले आहेत. म्हणजे तूर्तास गृहकर्ज व वाहनकर्जाचे हप्ते कमी होणार नसले, तरी नजीकच्या भविष्यकाळात दिलासा मिळणार आहे.अर्थव्यवस्थेने २०२५-२६च्या पहिल्या तिमाहीत उच्च वाढ नोंदवून, गतिशीलता कायम ठेवली आहे. अमेरिकेच्या शुल्कवाढीमुळे निर्माण झालेल्या आव्हानावर मात करण्यासाठी निर्यातदारांना मदत करण्याच्या दृष्टीने रिझर्व्ह बँकेने अनेक उपाययोजनाही जाहीर केल्या आहेत. निर्यातदारांच्या आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवाकेंद्रामधील परकीय चलनखात्यांमधून परतफेड करण्याची मुदत एक महिन्यावरून तीन महिन्यांपर्यंत वाढवण्यात आली आहे. रिझर्व्ह बँकेने बँकांच्या कर्जपुरवठ्याला चालना देण्यासाठी महत्त्वाच्या उपाययोजनाही जाहीर केल्या आहेत. भांडवली बाजारात सूचीबद्ध रोखे वा समभाग तारण ठेवून कर्जपुरवठ्याची कमाल मर्यादा आता प्रतिव्यक्ती वीस लाखांवरून एक कोटींवर नेण्यात आली आहे. त्याचबरोबर प्रारंभिक समभागविक्री, म्हणजेच आयपीओसाठी बँकांना प्रतिव्यक्ती सध्याच्या दहा लाखांवरून यापुढे २५ लाखांपर्यंत कर्जसाह्य करता येणार आहे. ताबा आणि विलीनीकरण या माध्यमातून भारतीय कंपन्यांच्या उद्योगविस्तार साधण्याच्या प्रयत्नांना पूरक भूमिका बँकांना आता बजावता येईल. बँकांना कर्जपुरवठ्याची संधी देणारा नवा मार्ग याद्वारे रिझर्व्ह बँकेने खुला केला आहे.

देशात सर्वत्र झालेला जोमदार पाऊस, करकपातीमुळे वाढलेली खरेदीक्षमता आणि बाजारातील आकर्षक योजनांमुळे सोनेखरेदीचा जल्लोष दिसून आला. वास्तविक चालू वर्षात आतापर्यंत सोन्याच्या किमती ५० टक्क्यांहून अधिक वाढल्या आहेत. दहा ग्रॅमचा भाव आता कधीच एक लाख रुपयांच्या पार गेला आहे. सोन्याची वळी, नाणी, सोने-चांदीची पदके आणि दागदागिने त्याचप्रमाणे बांगड्या तसेच हिर्यांच्या अलंकारांची मागणी भरपूर आहे. चांदीलाही तुफान मागणी आहे. याचा अर्थ, उपभोक्त्यांकडे या गोष्टी घेण्यासाठी अतिरिक्त पैसा आहे. सणासुदीला दुचाकी व चारचाकी वाहनांचीही तुफान खरेदी होत असून, यामुळे वाहननिर्मितीस चालना मिळणार आहे. वाहनक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होते, हे लक्षात घेतले पाहिजे. छोट्या चारचाकी वाहनांवरील जीएसटीचे ओझे कमी झाल्यामुळे ग्राहकांना सगळ्यात जास्त फायदा झाला आहे.

आयपीओच्या विक्रीत जागतिक स्तरावर भारताचे अग्रस्थान कायम आहे. २०२५च्या पहिल्या नऊमाहीत २४० हून अधिक लहान, मध्यम व मोठ्या आकाराच्या कंपन्यांनी आयपीओच्या माध्यमातून ८७,५०० कोटी रुपयांची निधी उभारणी केली आहे.